

# साहित्य चपराक

www.chaprak.com
ISSN-2455-4928

SAHITYA CHAPRAK

संस्थापक, संपादक
घनश्याम पाटील

थांबलेल्या पावलांना ध्यास दे रे विठ्ठला...
तू भुकेल्या माणसांना घास दे रे विठ्ठला...

आर्त हाकांनी विव्हळणे समजू दे त्यांचे मला
वेदना त्यांची कळाया त्रास दे रे विठ्ठला...

माणसाने माणसाला प्रेम द्यावे सर्वदा
भेदभावांच्या विचारा ऱ्हास दे रे विठ्ठला...

पेरलेले उगवू दे रे पिकवलेल्या भाव दे...
अन्नधान्याची सदा तू रास दे रे विठ्ठला

रोजच्या या दगदगीने जीव झाला घाबरा
स्वप्नपूर्तीचा नवा तू श्वास दे रे विठ्ठला!

– प्रशांत केंदळे

वर्ष–१९ । अंक– ७। जुलै २०२६ (मासिक) । मूल्य रु. ७०/– । पाने–५२ । वार्षिक वर्गणी रु. १०००/–
Pune | Vol. : 19 | Issue : 7 | Jully 2026 (Monthly) | Price : Rs. 70

एक परिपूर्ण मासिक
ISSN. No. 2455-4928

# साहित्य चपराक

चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

संस्थापक, संपादक घनश्याम पाटील

| | | |
|---|---|---|
| सहसंपादक | : | माधव गिर |
| उपसंपादक | : | सौ. चंद्रलेखा बेलसरे |
| सल्लागार | : | सुधीर गाडगीळ, ज्ञानेश्वर तापकीर |
| ऑनलाईन संपादक | : | ज्योती घनश्याम, वैभव कुलकर्णी |
| व्यवस्थापक | : | प्रमोद येवले |
| सजावट | : | संतोष शंकर खुटवड |
| अन्य सहकारी | : | अरुण कमळापूरकर, रवींद्र कामठे, सागर सुरवसे, सचिन सुंबे, दयानंद महापुरे |

मुखपृष्ठावरील छायाचित्र सौजन्य : अरुण कमळापूरकर.

**संपादकीय कार्यालय चपराक प्रकाशन**

**साहित्य चपराक**
४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, रयान स्कूलच्या मागे, मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१.
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०
वेबसाईट : www.chaprak.com. ईमेल : info@chaprak.com

**वर्गणी**
वार्षिक रु. १०००/–
त्रैवार्षिक रु. ३०००/–
पंचवार्षिक रु.५०००/–

आपली वर्गणी आमच्या
**७०५७२९२०९२**
या क्रमांकावर भीम ॲप, फोन पेद्वारे भरू शकता. वर्गणी भरल्यावर त्याचा तपशील आणि आपला संपूर्ण पत्ता याच क्रमांकावर द्यायला विसरू नका.

BHIM UPI
वर्गणी भरण्यासाठी क्युआर स्कॅन करा

'साहित्य चपराक' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी शिवानी प्रिंटर्स, कसबा पेठ, पुणे ४११०११ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक : घनश्याम वसंतराव पाटील**

# अंतरंग


## १. लोकशाहीचे वास्तव
घनश्याम पाटील ........ ५

## २. मराठी मालिकांचा घसरता दर्जा
ज्योती घनश्याम ........ ७

## 3. हे बोललेच पाहिजे!
संजय सोनवणी ........ १२

## ४. उत्कर्ष
प्रल्हाद दुधाळ ........ १६

## ५. पत्रकारिता म्हणजे घाईघाईतले साहित्य
डॉ. चंद्रशेखर जोशी ........ २३

## ६. अधोगती की प्रगती?
रवींद्र कामठे ........ २५

## ७. परीक्षा
चंद्रलेखा बेलसरे-जगताप ........ ३१

## ८. मराठी कवितेची साक्षेपी समीक्षा
डॉ. राजेंद्र थोरात ........ ३५

## ९. स्वरानंदच्या वाटचालीचा सुरेख मागोवा
अरुण कमळापूरकर ........ ३८

## १०. राष्ट्रीय हरित लवाद : पर्यावरणाचा प्रहरी
ॲड. स्वप्निल श्रोत्री ........ ४०

## ११. वैचारिक ढोंगांचा थिएटर शो
दत्ता पवार ........ ४८



'चपराक'ची' ग्रंथसूची

साहित्य चपराकचे ॲप
GET IT ON Google play




# लोकशाहीचे वास्तव



**संपादकीय**

घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२

आपल्या पक्षातून कोणी दुसऱ्या पक्षात गेला तर तो गद्दार आणि दुसऱ्या पक्षातून कोणी आपल्याकडे आला तर ते त्याचं हृदयपरिवर्तन, असे म्हणायचे दिवस आले. कपडे बदलावेत तसे नेते राजकीय पक्ष बदलू लागले. विचारधारा, निष्ठा हे सगळं मातीमोल ठरलं. उरला तो फक्त स्वार्थ. ''सरकार कुणाचेही असू द्या, मी मंत्रिमंडळात असतोच,'' असं सांगणाऱ्या रामदास आठवल्यांचं कुणाला वाईट वाटत नाही. त्यांनी केलेली तडजोड आणि प्रामाणिकपणे दिलेली कबुली हाही कौतुकाचा विषय झाला.

१९९९ साली 'विदेशीबाई पंतप्रधानपदी नको,' म्हणून शरद पवारांनी काँग्रेसमध्ये बंड केलं. पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली. शरद पवार, तारिक अन्वर आणि पी. ए. संगमा यांनी एकत्र येत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. 'अमर, अकबर, ॲन्थोनी' म्हणत माध्यमांनी त्यांची दखल घेतली. ज्या सोनिया गांधी यांना 'विदेशी' म्हणत पवारांनी बंड पुकारलं, त्याच काँग्रेसच्या ताटाखालचे मांजर बनत त्यांनी केंद्रीय कृषी मंत्रपद स्वीकारलं. दिवस इतके बदलले की पुढे ते सोनिया गांधी यांचे जवळपास सल्लागारच झाले. कोणत्याही बंडातून स्वार्थ साधता येतो, सत्तेचा वाटेकरी होता येतं हे आजवर अनेकदा, अनेकांनी कृतितून दाखवून दिलं आहे.

एका नेत्याला विचारलं, ''तुम्ही रातोरात पक्ष कसा बदलला?''

ते म्हणाले, ''आम्ही एका लग्नाला गेलो होतो. तिथं आमची चर्चा झाली. आमच्या खूप गप्पा रंगल्या. त्यातून आमचे विचार जुळले आणि आम्ही एकत्र यायचा निर्णय घेतला.''

''मग ते लग्न टिकलं की मोडलं?'' या प्रश्नावर ते म्हणाले, ''पक्षांचं लग्न जुळलं. सत्तेचा वाटा

**नारायण राणे हे एकेकाळचे कट्टर शिवसैनिक! एका मुलाखतीत विलासराव देशमुख यांना 'सर्वोत्तम प्रशासक' म्हटल्याने त्यांचे बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत काही मतभेद झाले आणि त्यांनी शिवसेना सोडली. 'बाळासाहेबांनी मला हाकलून दिलं' म्हणून ते सगळ्यांच्या समोर रडले. शिवसेनेत मुख्यमंत्री राहिलेल्या या नेत्याने काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बारा वर्षे तिथे संसार केल्यावर त्यांनी सांगितलं, 'इथं माझी किंमत नाही.' दोन्ही विचारधारा अनुभवल्यानंतर त्यांनी काय करावं? स्वतःचाच पक्ष काढला. त्याचं नाव काय ठेवलं? 'महाराष्ट्र स्वाभिमान!' अपेक्षेप्रमाणे तो सहा महिन्यात बंद पडला. मग त्यांनी भाजपशी जवळीक केली. 'पक्षांतरबंदी' या विषयावर बोलताना एका आमदारानं त्यांना उपहासानं सांगितलं, ''राणे साहेब, तुम्ही तीन लग्न केलीत!'' त्यावर क्षणाचाही विलंब न करता राणे म्हणाले, ''हो! पण माझ्या तिन्ही बायका चांगल्या निघाल्या. त्यांच्याकडं मला मुख्यमंत्रिपद, मंत्रिपद आणि खासदारकी मिळाली.''**
**म्हणून त्यांना 'बंडखोरांचे बादशहा' म्हटलं जाऊ लागलं.**

मिळाला. आम्ही दोघेही खूश आहोत.''

रामायणातली एक कथा सांगितली जाते. राम-रावण युद्धाची! देवी सीतेला रावणाच्या तावडीतून सोडवायचं, म्हणून रामानं सेना तयार केली. अनेक पराक्रमी वानर त्यांच्या सोबत होते. युद्ध पुकारलं गेलं. प्रत्यक्षात ते सुरू झालं. सर्व देवदेवता स्वर्गातून हे घनघोर युद्ध बघत होत्या. त्यांच्या हातात फुलांच्या टोपल्या होत्या. त्यातून कुणावर पुष्पवृष्टी करावं हे मात्र त्यांना ठरवता येत नव्हतं. जर रामावर फुले टाकली आणि रावण जिंकला तर? किंवा रावणावर फुले उधळली आणि प्रभू श्रीराम विजयी ठरले तर...? ८४ दिवस हे युद्ध सुरू होते आणि प्रभू श्रीराम जिंकणार याचा अंदाज देव-देवतांना आला. मग त्यांनी रामावर पुष्पवृष्टी करत त्यांचे गुण गायला सुरूवात केली. ८५व्या दिवशी रामाने रावणाचा वध केला आणि हे युद्ध संपले. म्हणजे देव-देवतासुद्धा कुणाची 'जिंकण्याची शक्यता' आहे हे पाहून कुणाला साथ द्यायची याचा निर्णय घेत असतील तर मग आजच्या नेत्यांच्या बदलत्या भूमिकांचे आश्चर्य वाटायला नको. जिथे स्वार्थ साधता येईल तिथे ते जाणारच! मग कुणी आईबाबाची शपथ घेत असेल नाही तर साईबाबाची! त्यांना फक्त सत्ता, पद, प्रतिष्ठा इतकेच दिसणार. जिथं मलिदा अधिक तिथं साहेबांचं बस्तान. मतदारांना काय वाटेल, ज्यांनी त्यांचे विचार, पक्ष, भूमिका बघून मतदार दिले ते काय म्हणतील याच्याशी त्यांना घेणं-देणं नसतं.

शरद पवारांनी वसंतदादांच्या पाठित खंजीर खुपसला. काँग्रेसला फाट्यावर मारत राष्ट्रवादीची स्थापना केली. छगन भुजबळ शिवसेनेचे नगरसेवक झाले, आमदार झाले. ते सेनेतून बाहेर पडले. नारायण राणे फुटले. 'नारायण आमचाच' असं 'सामना'चं मुख्य शीर्षक करत ज्या बाळासाहेबांनी राणेंवर विश्वास दाखवला ते राणे काँग्रेसमध्ये गेले. राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत महाराष्ट्र निवनिर्माण सेनेची स्थापना केली. ज्या विचारधारेच्या विरूद्ध बाळासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला, त्यांना बरोबर घेत, त्यांच्याच मदतीने उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवले. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत शिवसेनेला भगदाड पाडले. त्यातून ते मुख्यमंत्री झाले. त्यांच्यापासून प्रेरणा घेत 'गुरूची विद्या गुरूला' हे दाखवून देत स्वर्गीय अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. त्यांचा पहाटेचा शपथविधी महाराष्ट्राने बघितला. 'औट घटकेचा राजा' काय असतो ते दिसून आले. 'जो घायल है ओ घातक है' हे पुन्हा एकदा दिसून आले आणि दादांनी भाजपसोबत संसार थाटला.

मागे राज ठाकरे एकदा म्हणाले होते की, 'भाजपला देशात एकही प्रादेशिक पक्ष शिल्लक ठेवायचा नाही.' त्या दृष्टिने भाजपने देशभर ज्या तडजोडी केल्या, ज्या पद्धतीने सत्ता हस्तगत केली, प्रादेशिक पक्षांची धूळधाण उडवली ते पाहता राज यांचे म्हणणे तंतोतंत खरे ठरल्याचे दिसून येते. या सगळ्याला पर्याय काय? विरोधी पक्ष सक्षम नसणं, विकाऊ माणसांची फौज दिमतीला असणं, विचारधारा, ध्येय, मूल्य संपुष्टात येणं यातून दुसरं काय घडणार? शरद पवार नेहमी म्हणतात की, 'आम्ही राजकारणी आहोत, संत नाही. मग संतासारख्या विरक्तीच्या भावनांची अपेक्षा आमच्याकडून का ठेवता?' पवारांनी त्यांच्या अनेक कारनाम्यांच्या बचावासाठी हा जो प्रतिप्रश्न सामान्य माणसाला केला होता त्याच्या मुळाशी गेल्यावर अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला सहजपणे मिळतील.

महाराष्ट्रात सगळं काही सुरळीत सुरू असतानाच पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांनी स्फोट घडवला आणि शिवसेनेचे सहा खासदार फोडले. 'सत्तेत नसल्याने आमची कामे होत नाहीत, आम्हाला पुरेसा निधी मिळत नाही' असे त्यांचे म्हणणे आहे. आपल्या मतदारसंघाचा विकास व्हावा म्हणून आपण हा निर्णघ नाईलाजाने घेतल्याचे ते सांगतात. रावणाची लंका सोन्याची आणि रामाची अयोध्या मातीची! म्हणजे लंकेचा विकास जोरात झाला होता आणि रामराज्य  गरीब राहिले, असे त्यांना सूचवायचे असेल. मग रावणाला साथ देणे, त्याच्या पाठिशी उभे राहणे हे त्यांना त्यांचे कर्तव्यच वाटणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ हे खासदार जिथून फुटलेत तिथं रामराज्य आहे, असा मुळीच नाही. सध्याच्या काळात राम आणि रावण सारखेच झालेत आणि दोघांचेही राज्य मातीमोल आहे, एवढेच खरे!

१९९८-९९ साली शरद पवार यांनी सोनिया गांधी यांना पाच पानांचं पत्र लिहिलं होतं. त्यात ते म्हणाले होते, 'आपण जन्म ाने परदेशी असल्याने विरोधकांना मुद्दा मिळेल. त्यामुळे काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारू नये.'


त्या पत्रानंतर सोनिया गांधी यांनी सभेत सांगितलं, ''जर माझ्यामुळे पक्ष फुटत असेल तर मी राजीनामा देते!''

त्यावर एकदम शांतता पसरली आणि अचानक घोषणा सुरू झाल्या, 'सोनिया गांधी जिंदाबाद!'

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी मथळा केला, 'सानियांच्या अश्रुंनी पवारांना एकटं पाडलं.'

आजही हेच सुरू आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे म्हणाले, ''मी तुम्हाला नको असेल, तर माझा शिवसेनाप्रमुख पदाचा राजीनामा देतो. आपल्या कोणत्याही सामान्य शिवसैनिकाला या पदावर बसवा.'' लगेच सैनिकांनी रडारड केली. उद्धव ठाकरे यांच्या नावाच्या घोषणा दिल्या गेल्या. एका कवीनं सांगितलं, ''कांबळे कण्हतो पण रडत नाही.''

याचा अर्थ काय? काळ कोणताही असू द्या. राज्य कुणाचेही असू द्या. विरोधक कुणीही असू द्या. राजकारणात सगळ्यात महत्त्वाचं काय ठरतं तर तो स्वार्थ! तो स्वार्थ साधण्यासाठी ही राजकीय जमात काहीही करू शकते आणि आपण फक्त त्यांच्या सुरस, रम्य कथांची चर्चा करत राहतो. लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाच्या हाती इतकेच आहे.




# मराठी मालिकांचा घसरता दर्जा

**संध्याकाळचे आठ वाजतात. महाराष्ट्रातील घराघरांमध्ये एक यांत्रिक सोहळा सुरू होतो. रिमोटचे बटण दाबले जाते, टीव्हीची स्क्रीन उजळते आणि डोळे दिपवणारा भडक सेट आणि कानाचे पडदे फाडणारा पार्श्वसंगीताचा आवाज थेट दिवाणखान्यात आदळतो. पडद्यावर कुणाच्या तरी हातातून चहाचा ट्रे खाली पडतो. कॅमेरा अत्यंत हिंसकपणे त्या पात्राच्या चेहऱ्यावर झूम-इन आणि झूम-आऊट करतो; त्यानंतर घरातील इतर पाच जणांच्या चेहऱ्यांवर तो फिरतो. प्रत्येक झूमसोबत वाऱ्याच्या झोताचा आदळल्यासारखा आवाज येतो. सलग दोन मिनिटे कुणीही एक शब्द बोलत नाही; ते फक्त एकमेकांकडे डोळे विस्फारून बघत राहतात.**



**ज्योती घनश्याम**
९९०११६४४६८

आज आपण अशा एका काळात उभे आहोत, जिथे दूरचित्रवाणीवरील मालिकांचा दर्जा घसरत चालला आहे आणि हे एक बहुमान्य आणि उघड सत्य बनले आहे. एकेकाळी साहित्याला आणि दृश्य-कलेला जोडणारा हा दुवा आज एका चिंताजनक आणि कर्कश मेलोड्रामाच्या कारखान्यात रूपांतरित झाला आहे. मराठी टेलिव्हिजनचा तो सुवर्णकाळ आजच्या प्रेक्षकांसाठी केवळ एक सुंदर नॉस्टॅल्जिया म्हणून उरला आहे. आजच्या काळातील मालिका मग त्या पौराणिक असोत, ऐतिहासिक असोत, विनोदी असोत किंवा कौटुंबिक या नवीन मालिकांसोबत तो जुना जिव्हाळा आणि आत्मीयता अजिबात जाणवत नाही. असे का बरे? एवढी नापसंती आणि नीरसता असूनही या मालिकांचा एवढा सुळसुळाट कसा? आणि तरीही यांचा टीआरपी एवढा कसा? याच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कारणांचा धांडोळा आपण घेणार आहोत.

## मनोरंजनाचा हेतू आणि वास्तवाचा विरोधाभास

माध्यमांनी केवळ मनोरंजन करावे की समाजाला काही तरी दिशा द्यावी, हा वाद तसा जुनाच आहे. नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरदचंद्र पवार यांनी एका जाहीर सभेत एक विधान केले. ते म्हणाले की, ''दूरचित्रवाणीवर सतत रामायण किंवा महाभारतासारख्या मालिका दाखवण्याऐवजी, नागरिकांना भारतीय संविधान आणि त्याची मूल्ये दाखवून जागरूक केले पाहिजे.'' ही अपेक्षा अजिबात चुकीची नाही कारण टीव्ही हे तळागाळापर्यंत पोहोचणारे सर्वात प्रभावी माध्यम आहे! पण इथे एक विरोधाभास प्रकर्षाने मनाला बोचतो. त्यांच्याच कार्यकाळात

दूरदर्शनच्या राज्यसभा चॅनेलने संविधानाच्या निर्मितीप्रक्रियेवर आधारित, श्याम बेनेगल दिग्दर्शित 'संविधान - द मेकिंग ऑफ कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया' हा एक अप्रतिम आणि दर्जेदार कार्यक्रम प्रसारित केला होता पण तो सामान्य प्रेक्षकांपर्यंत किती पोहोचला? त्याला किती लोकांनी डोक्यावर घेतले? महाराष्ट्राला प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा आणि समृद्ध साहित्याचा मोठा वारसा आहे पण आजच्या मालिकांमध्ये हा वारसा कुठे दिसतो? महाराष्ट्रातील श्रमिक, शेतकरी, ग्रामीण, निमशहरी आणि विविध सांस्कृतिक समूहांचे खरे जगणे मालिकांमधून कधीच हद्दपार झाले आहे किंवा काही मालिकांमध्ये ते ग्रामीण जीवनही अतिशय भडकपणे दाखवण्यात येत आहे.

केवळ कौटुंबिक मालिकाच नाही तर ऐतिहासिक आणि चरित्रात्मक मालिकांची अवस्थाही चिंताजनक आहे. अलीकडेच महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित मालिका बंद पडणार असल्याची बातमी आली. त्यावर याच मालिकेत जोतीबांची भूमिका करत असलेले निर्माते आणि अभिनेते अमोल कोल्हे यांची एक प्रतिक्रिया आली. त्यांनी नाराजी व्यक्त केली की, २०१७ साली अनवधानाने नथुराम गोडसे यांची भूमिका साकारल्याबद्दल त्यांच्यावर प्रचंड टीका झाली होती मात्र सावित्रीबाई फुले मालिकेत जोतीबा फुले यांची भूमिका साकारताना त्यांना कोणत्याही प्रकारचे कौतुक किंवा समर्थन मिळाले नाही. शिवाय ही मालिका बंद झाली म्हणून अनेक जण सोशल मीडियावर रील्समधून गळे काढत आहेत पण इथे एक प्रश्न विचारणे गरजेचे आहे ती मालिका जर बंद झाली नसती तरी एखाद्या महापुरुषावर आधारित या मालिकेचा दर्जा खरोखर उच्च होता असे म्हणता येईल का? स्वतः त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करणारे, इतिहासाची जाण असणारे वाचक या मालिकेला तथ्यांच्या पारड्यात किती गुण देतील? कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वावर कलाकृती साकारताना भक्कम संशोधन आणि तथ्यांची जोड असणे ही प्राथमिक अट असते पण या मालिकेत क्रिएटिव्ह स्वातंत्र्याच्या कुबड्या घेऊन अनेक तथ्यहीन आणि तर्कहीन प्रसंग दाखवले गेले. या समाजसुधारक दाम्पत्यावर खऱ्या अर्थाने प्रेम करणाऱ्या लोकांनी अशा सादरीकरणावर नक्कीच आक्षेप घ्यायला हवा. इतिहासाची मोडतोड करून आणि नाट्यमय रंगात बुडवून महापुरुषांचे विचार प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नसतात, हेच यातून सिद्ध होते.

या सगळ्या गदारोळात एका मोठ्या प्रेक्षकवर्गाने डिश टीव्ही आणि केबल कनेक्शनला वाळीत टाकून, आपल्या मनोरंजनाच्या गरजा ओटीटीसारख्या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे. आजकाल 'आम्ही टीव्ही सिरिअल्स बघत नाही,' हे सांगणे 'आम्ही चहा घेत नाही' असे सांगण्यासारखे प्रतिष्ठेचे झाले आहे. इतकेच काय, जे अद्याप टीव्ही बघत आहेत त्यांनी फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवर 'मराठी सिरियल्सला वैतागलेली मंडळी' असा एक ग्रुपच काढला आहे. या ग्रुपचे तब्बल ३६ हजारपेक्षा जास्त सभासद आहेत! या मंचावर सुरू असलेल्या मालिकांमधील कन्टेन्टवर, निर्मितीतील चुकांवर आणि पात्रांच्या उथळ अभिनयावर ज्याच्या त्याच्या वैताग लेव्हलनुसार मुद्देसूद समाचार घेतला जातो. कथानकातील विसंगतींवर बनणारे भन्नाट मीम्स हे प्रेक्षकांच्या साचलेल्या संतापाचेच रूप आहे. प्रेक्षक आता बंड करत आहेत पण वाहिन्यांच्या बंद खोल्यांमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांना हा आवाज कितपत ऐकू येतो की ते ऐकू येऊनही दुर्लक्ष करतात? की त्यांना या आवाजाची शब्दशः भाषाच कळत नाही.

### कथेची शिस्त

दूरचित्रवाणीवरील कोणत्याही कलाकृतीचा मूळ गाभा म्हणजे तिचे लिखाण. लिखाणापासूनच मालिका निर्मितीला सुरुवात होते आणि नेमका इथेच आजच्या मालिकांचा पाया ढासळलेला आहे. पूर्वीच्या काळी मराठी मालिकांचे एक ठरावीक, शिस्तबद्ध आणि व्यावसायिक गणित असायचे. आजच्यासारख्या वर्षानुवर्षे रबरासारख्या ताणल्या जाणाऱ्या मालिका तेव्हा नव्हत्या. पूर्वी आठवड्यातून एकदा, ठरावीक दिवशी प्रसारित होणाऱ्या मालिकांना १३, २६ किंवा जास्तीत जास्त ५२ भागांचे मर्यादित कंत्राट असायचे. कथेला किंवा मालिकेच्या संकल्पनेला एक निश्चित सुरुवात, मध्य आणि तितकाच प्रभावी शेवट असायचा. भाग मर्यादित असल्यामुळे कथेचा वेग कमालीचा असायचा आणि प्रत्येक एपिसोडमध्ये प्रेक्षकाला खिळवून ठेवण्याची ताकद असायची. लेखकाला प्रत्येक भागावर प्रचंड मेहनत घ्यावी लागायची कारण तिथे कथा भरकटायला वावच नव्हता. खऱ्या आयुष्याशी साधर्म्य असलेले तर्कशुद्ध प्रसंग आणि त्यातून अलगद पेरली जाणारी जीवनमूल्ये यांची सुरेख मांडणी लेखक करत असत. आपल्याला दूरदर्शनवरील बंदिनी, गोट्या, युगंधरा, विधाता, श्रीयुत गंगाधर टिपरे सारख्या कौटुंबिक मालिका किंवा हसा चकट फू आणि कोपरखळी सारखे मार्मिक विनोद असलेले कार्यक्रम आजही आठवतात. लोक आजही युट्यूबवर या मालिका शोधून शोधून आपल्या मनोरंजनाची तहान भागवतात. त्या वेळच्या मालिकांच्या लिखाणात नातेसंबंध, भावभावना आणि माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीचा एक सुंदर समतोल असायचा. विनोदी कार्यक्रमांमधील सामाजिक परिस्थितीवरील व्यंग्य हे निर्मळ, मार्मिक आणि तर्कशुद्ध असायचे. आजच्या

मालिकांमधून ही निर्मळता आणि साहित्यिक वजन पूर्णपणे हरवले आहे. त्या दिवसेंदिवस केवळ भडक आणि उथळ होत चालल्या आहेत.

गेली अनेक वर्षे ऐतिहासिक मालिकांचे लिखाण करणारे लेखक युवराज पाटील म्हणतात ''स्वराज्य सौदामिनी ताराराणी, उदे गं अंबे अशा ऐतिहासिक, पौराणिक मालिकांसाठी मी लेखन केले. या दरम्यान मला जाणवलं की प्रेक्षकांची अभिरुची म्हणून ऐतिहासिक तथ्यांशी तडजोड करावी लागेल का? असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा त्या तथ्यांचा मूळ गाभा हरवू नये यासाठी लेखकाने आग्रही असावं. चॅनल आणि निर्मिती संस्था यांच्या मध्ये त्यासाठी सुसंवाद हवा. आवडी निवडीसाठी आपण इतिहास नाही बदलू शकत. ज्यांचा इतिहासाशी कसलाही संबंध नाही किंवा इतिहासाबद्दल आस्था नाही अशा लोकांच्या हाती सूत्रे असतील तर बऱ्याच अडचणीना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे कुठलीही ऐतिहासिक गाथा मालिकेच्या माध्यमातून मांडताना व्यावसायिक गणितांच्या पलीकडे त्या इतिहासावर प्रेम असणारी माणसं त्या कलाकृतीशी जोडली जावीत एवढी अपेक्षा आहे.''

## सर्जनशीलता आणि मालिका

मालिकांच्या सुवर्णकाळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेशभूषेत असलेला साधेपणा. रंगभूषा प्रसंग आणि पात्राला साजेशी असायची. त्यामुळे प्रेक्षक पात्राशी सहज एकरूप होऊन मालिका बघायचा. त्यावेळी आठवड्यातून एकदा प्रसारित होणाऱ्या मालिकांना जाहिरातीतून फारशी मोठी कमाई मिळत नव्हती. त्यामुळे यातील कलाकार आणि तंत्रज्ञांनी मालिका हे केवळ कमाईचे साधन असे गृहीत धरले नव्हते. ती त्यांची आवड होती, कला होती आणि या आवडीतूनच ते आपले १००% द्यायचे.बजेट कमी आणि कल्पकता (कलात्मकता) जास्त हे त्या काळाचे मुख्य सूत्र होते. भव्य-दिव्य सेट, अवाढव्य खर्च किंवा परदेशातील चित्रीकरण यासाठी चॅनेल्सकडे पैसे नसायचे पण याच आर्थिक मर्यादेने तंत्रज्ञांना आणि दिग्दर्शकांना अधिक विचार करायला भाग पाडले. पैसा कमी पडला तरी चालेल पण कन्टेन्ट आणि सादरीकरणात कुठेही तडजोड न करण्याची एक सुजाण प्रगल्भता तेव्हाच्या निर्मिती संस्थांमध्ये होती. तिथे निर्णय घेणारे क्रिएटिव्ह हेड असे असायचे ज्यांना साहित्य आणि कलेची जाण होती. त्यात आजच्या मालिकांसारखी मार्केटिंग हेडची लुडबुड नसायची. हे क्रिएटिव्ह लोक दिग्दर्शकाचे निर्णय समजून घेऊन त्याला स्वातंत्र्य देणारे असायचे. आज कथा कशी असावी, हे मार्केटिंग टीम आणि जाहिरातदार ठरवतात, दिग्दर्शक नाही हे दुर्दैव. नारबाची वाडी, जत्रा, झेंडा यांसारख्या २५ हून अधिक हिट चित्रपटांचे आणि श्रीयुत गंगाधर टिपरे, जस्सी जैसी कोई नही सारख्या गाजलेल्या मालिकांचे ज्येष्ठ छायादिग्दर्शक (डीओपी) राहुल जनार्दन जाधव यांनी दैनिक मालिकांचे चित्रीकरण सोडण्यामागचे कारण सांगताना सद्यस्थितीवर थेट बोट ठेवले आहे :

''मराठी मालिकांचा एकूणच दर्जा कमालीचा घसरला आहे. पूर्वी गंगाधर टिपरेमध्ये आबांच्या एका छोट्याशा एन्ट्री शॉटसाठीही आम्ही कॅमेऱ्याच्या पातळीवर प्रचंड मेहनत घ्यायचो; तेव्हा लेखनात ताकद होती आणि प्रयोगांना मोकळीक होती. आज मात्र विनोदाच्या नावाखाली होणाऱ्या कमरेखालच्या करमणुकीमुळे या मालिका कुटुंबासोबत, विशेषतः स्वतःच्या मुलीसोबत बसून पाहण्यासारख्या राहिलेल्या नाहीत. अशा आशयाचा भाग होणे मला कधीच आवडणार नाही.

सध्याच्या कौटुंबिक मालिकांमध्ये प्रत्येक सीनचे शॉट्स आधीच साचेबद्ध ठरवून दिलेले असतात, जिथे छायादिग्दर्शकाच्या सर्जनशीलतेला शून्य वाव असतो. अत्यंत यांत्रिक पद्धतीने होणाऱ्या या टीव्ही चित्रीकरणाच्या अनुभवाला चित्रपटसृष्टीतही काहीच मूल्य उरलेले नाही. म्हणूनच या दर्जाहीन तडजोडींचा भाग होण्यापेक्षा मी मालिकांचे चित्रीकरण पूर्णपणे थांबवून आता फक्त प्रोमोज चित्रित करणे पसंत करतो.''

## मालिका विरुद्ध चित्रपट - कलाकारांचे आत्म परीक्षण गरजेचे

निर्मिती संस्थेच्या या ढासळत्या रचनेसोबतच, आजच्या मालिकांमधील कलाकारांची मानसिकताही बदलली आहे. मध्यंतरी अलीकडच्या काळातील डेली सोपमध्ये काम करणारे काही कलाकार अशी तक्रार करत होते की, ''मराठी चित्रपटसृष्टी आम्हाला महत्त्व देत नाही, आम्हाला चित्रपटात घेत नाही.''

त्यांचे हे रडगाणे ऐकल्यावर हसू येते. यामागे चित्रपट निर्मात्यांची दृष्टी दोषी नाही तर या कलाकारांच्या मालिकांचा आणि त्यांच्या अभिनयाचा खालावलेला दर्जा हे प्रमुख कारण आहे, हे त्यांना कोण सांगणार? जर ते हे समजण्याइतकेही सुजाण नसतील तर कलाकार म्हणून त्यांना गंभीर आत्मपरीक्षणाची नक्कीच गरज आहे. रोजच्या रोज तेच कृत्रिम हावभाव, रडारड आणि ओढून-ताणून केलेली संवादफेक बघून कोणताही चित्रपट दिग्दर्शक अशा पात्रांना मोठ्या पडद्यावर घेण्याचे धाडस करणार नाही. पूर्वीच्या काळात क्रिएटिव्ह टीम आणि तंत्रज्ञांसोबत सेटवर कलाकारही आपल्या भूमिकेवर प्रचंड मेहनत घेत असत मग ती भूमिका कितीही छोटी का असेना! कलाकारांचा प्रत्यक्ष लेखकाशी संवाद असायचा. ते दिग्दर्शकाचा पॉईंट ऑफ व्ह्यू समजून घ्यायचे. पात्राचा आलेख कसा उंचावतोय, याचा ते अभ्यास करायचे. आज शूटिंगच्या काही मिनिटे आधी हातावर



स्क्रिप्ट टेकवली जाते आणि कलाकार यंत्रासारखे संवाद पाठ करून कॅमेऱ्यासमोर उभे राहतात. रिटेकवर रिटेक होतात तरीही त्यात जीव नसतो. असतो तो फक्त भडकपणा किंवा पॅरिस फॅशन शो च्या मॉडेलसारखे भाव असलेले 'पोकर फेस' चेहरे. अनेक हाडाचे कलाकार आणि पट्टीचे तंत्रज्ञ ज्यांनी काही काळासाठी मालिकांसाठी काम केले ते चित्रपटासाठीच्या आपल्या परिचयाम ध्ये मालिकांचा अनुभव लिहिणे टाळतात.

### स्त्रीप्रधान मालिकांचा सुळसुळाट

बालाजी टेलिफिल्मच्या एकता कपूर निर्मित मालिकांनंतर टीआरपी मिळवून देणाऱ्या मालिकांचे एक सूत्र तयार झाले. ते वापरले आणि कथा, पटकथा, संवाद, पात्रे त्या सूत्राच्या भोवती गुंफली की झाली तयार एक पैसा कमवून देणारी कमर्शियल मालिका. मग हिंदी मालिकांचे हे फॅड आले मराठीत आणि इतर भारतीय भाषांमध्ये. फक्त संवाद मराठी करायचे आणि टीआरपी जास्त असलेल्या जसेच्या तसे मराठी प्रेक्षकांसमोर आणायचे. तर्क आणि बुद्धिच्या परिमाणांना खाली मान घालायला लावणाऱ्या आणि कधी कधी नैतिक मूल्यांना देखील वेशीवर टांगणाऱ्या या मालिकेत स्त्री स्वातंत्र्य सबलीकरणाच्या नावाने का ही ही होते. आपल्याकडे म्हटले जाते की पुत्र कुपुत्र होऊ शकतो पण माता कुमाता कधीच नसते पण एकदा आईची माहिती सांगणाऱ्या मालिका पाहा भ्रम दूर होईल. एक अतिसंवेदनशील नायिका विशेषतः सून आणि एक (किंवा अनेक) अतिशय दुष्ट खलनायिका विशेषतः सासू, नणंद किंवा चक्क सख्खी बहीण (दोन तीन किलोचा मेकअप आणि दागिने घालून) आणि त्यांच्या तालावर नाचणारे सेमी-खलनायक पुरुष रोज वेगवेगळी कटकारस्थाने करून नायिकेला छळणार आणि ती सगळ्यातून अनैसर्गिक चांगुलपणाचा आव आणत या सगळ्यातून चमत्कारिकरित्या (अगदी गोगलगायीच्या गतीने) सुटणार. असे कुठे? कुठल्या घरात असते राव? यात कसले आलेय स्त्री सबलीकरण?

### मानसिक विळखा

प्रेक्षकाला हेच हवे आहे असे सांगून तोच तोच विखारी फॉर्म्युला वापरला जातो पण याचे समाजमनावर काय परिणाम होतात याचा मानसशास्त्रीय अभ्यास पण पुढे आला आहे.

आजची डेली सोप संस्कृती म्हणजे वेळेविरुद्ध लागलेली एक जीवघेणी शर्यत आहे. रोज एक भाग प्रसारित करण्याच्या या दबावामुळे कथेतील जिवंतपणा ती प्रगल्भ होण्यापूर्वीच संपून जातो. या दबावाच्या कुकरमध्ये सर्जनशीलता वाफेसारखी उडून जाते आणि मालिका म्हणजे केवळ दृश्यांची जुळवाजुळव करणारी एक असेम्ब्ली लाईन बनून राहते. नेमकी याच वळणावर आजच्या मराठी मालिका आपली भावनिक प्रामाणिकता गमावून बसतात. पात्रांना अविरत यातना दिल्या जातात; महिलांना एक तर सती-सावित्री तरी दाखवले जाते किंवा थेट क्रूर खलनायिका. कथा पुढे

## मानसोपचार तज्ज्ञ काय सांगतात? अविरत पुनरावृत्तीचा मनावर होणारा परिणाम

भावनांनी माखलेल्या आणि एकाच साच्यात बसवलेल्या या दृश्यांचा भडिमार प्रेक्षकांच्या मानसिक आरोग्यावर हळूहळू आघात करतो. बिंग-वॉचिंग (सतत टीव्ही पाहणे) आणि मालिकांच्या व्यसनाधीनतेवर झालेल्या जागतिक संशोधनातून असे समोर आले आहे की, अशा प्रकारच्या साहित्याचा मानवी मनावर थेट परिणाम होतो. सातत्याने नकारात्मक आणि ताणतणाव निर्माण करणाऱ्या गोष्टी पाहिल्याने तणाव, अस्वस्थता, नैराश्य आणि झोपेच्या समस्या उद्भवू शकतात. हे संशोधन केवळ मराठी मालिकांवर झालेले नसले, तरी ते हे स्पष्ट करते की, रोज रात्री घराघरात चालणारा हा कलहाचा खेळ प्रेक्षकांना विरंगुळा देण्याऐवजी मानसिकदृष्ट्या अधिक थकवून सोडतो.

मानवी मेंदूचा एक स्वभाव आहे, तो पुढील प्रसंगाचा अंदाज लावू लागतो. आता सासू रडणार, आता सुनेवर आळ येणार, आता ती खलनायिका काही तरी कारस्थान करणार आणि झालेला गैरसमज पुढील तीन आठवडे सुटणार नाही हे प्रेक्षकाला पक्के ठाऊक असते. सुरुवातीला यात कुतूहल असते पण काळानुरूप याचे रूपांतर चिडचिड, थकवा आणि मानसिक उद्वेगात होते. हा भावनिक थकवा काल्पनिक नाही. जेव्हा मेंदू सातत्याने अशा तणावपूर्ण परिस्थितीला सामोरा जातो तेव्हा शरीरातील स्ट्रेस हार्मोन्स वाढतात, ज्यामुळे झोप उडते आणि दैनंदिन जीवनातील निर्णयक्षमतेवर परिणाम होतो.

टीव्हीच्या पडद्यावरील विष हळूहळू रात्रीच्या जेवणाच्या टेबलावर, घरातील संवादांवर आणि कौटुंबिक वातावरणावर पसरू लागले आहे. जेव्हा मालिकेचा मुख्य गाभाच संशय, अविश्वास आणि अपमानावर आधारलेला असतो तेव्हा घरातील रोजचा ताण हा अपवाद न राहता एक नियम बनून जातो. आधीच वैयक्तिक आयुष्यात तणावाचा सामना करणाऱ्या व्यक्तिंसाठी या मालिका विरंगुळा ठरण्याऐवजी त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारख्या ठरतात. काही लोक म्हणतात, ''आम्ही फक्त टाईमपास म्हणून बघतो'' पण मानवी मज्जासंस्था ती दृश्ये केवळ टाईमपास म्हणून स्वीकारत नाही. आपण जे पाहतो, त्यातील भावनिक कंपने आपल्या मनात साठत राहतात. मानसशास्त्रातील अभ्यासानुसार अनेकदा लोक आपल्या खऱ्या आयुष्यातील दुःखातून पळ काढण्यासाठी टीव्हीचा आधार घेतात; परंतु तिथेही जर नकारात्मकता मिळाली तर ते मानसिक आरोग्य सुधारण्याऐवजी अधिक खालावते. थोडक्यात सांगायचे तर जे माध्यम विरंगुळा म्हणून सुरू झाले होते, ते शेवटी एक मानसिक ओझे बनून संपते.

समस्या फक्त मालिका दर्जेदार नसणे एवढीच नाही. समस्या ही आहे की, या मालिका प्रेक्षकांना अविश्वास, निष्क्रियता आणि आघातांच्या एका दुष्टचक्रात जगण्याची सवय लावतात. जेव्हा कथानक केवळ छळ, चहाडी, पात्रांचे अचानक गायब होणे आणि न्यायाला होणारा अंतहीन उशीर यावरच अवलंबून असते तेव्हा ते कुटुंबाबद्दल आणि नात्यांबद्दल प्रेक्षकांच्या मनात एक विकृत दृष्टिकोन तयार करते. याचा अर्थ असा नाही की टीव्हीमुळे मानसिक आजार होतात पण संवेदनशील मनातील तणाव वाढवण्यास या मालिका नक्कीच खतपाणी घालतात.

---

नेण्यासाठी नाही तर केवळ चॅनलचे भाग वाढवण्यासाठी संघर्ष लांबवला जातो. प्रेक्षक कदाचित प्रॉडक्शनच्या तांत्रिक भाषेत हे बोलणार नाहीत पण त्यांना हा खोटेपणा लगेच जाणवतो. ती मालिका मग मनाला स्पर्श करत नाही तर केवळ एका सवयीचा भाग बनून राहते.

### प्रेक्षकांची खरी गरज

टीआरपीचे आकडे, ओटीटीचा वेगवान विस्तार आणि प्रेक्षकांची बदलती चव हे सगळे आपल्याला एकच गोष्ट ओरडून सांगत आहेत माध्यम वेगाने बदलत आहे. मराठी मालिकांना पुन्हा उभे राहायचे असेल तर या काही गोष्टी निर्णायक ठरतील. प्रथमतः रबरासारख्या मालिका ताणण्याऐवजी मर्यादित भागांची शिस्त पाळणे आवश्यक आहे. पटकथेला साहित्याचा आणि संशोधनाचा भक्कम पाया हवा. महाराष्ट्राचे बहुविध वास्तव, श्रमिक वर्ग, नव्या पिढीचे प्रश्न आणि खऱ्या स्त्री-सक्षमीकरणाचे प्रामाणिक चित्रण पडद्यावर यायला हवे. टीआरपीला अंतिम देव मानण्याऐवजी, आशयाला अग्रक्रम दिला गेला पाहिजे.

जर मराठी मालिकांनी वेळेवर या वास्तवाचे भान ठेवले नाही आणि बदलांशी जुळवून घेतले नाही तर उद्याच्या पिढीसाठी मराठी टेलिव्हिजन हा केवळ एक नॉस्टॅल्जिया बनून राहील. प्रेक्षक आता मूर्ख राहिलेला नाही, तो सजग झाला आहे. जोपर्यंत मालिकांचे निर्माते आपल्या प्रेक्षकांच्या बुद्धिमत्तेचा, त्यांच्या मानसिक शांतीचा आणि सांस्कृतिक वारशाचा आदर करायला शिकत नाहीत तोपर्यंत रिमोटचे पॉवर बटण दाबून टीव्ही बंद करणे, हाच प्रेक्षकांचा सर्वात मोठा आणि मूक उठाव असेल.

वेळ अजूनही गेलेली नाही, फक्त कॅमेऱ्याची  दिशा आणि लेखणीची धार बदलण्याची नितांत गरज आहे.

# हे बोललेच पाहिजे!

**लेखक-विचारवंत आणि इतिहासकार यांना स्वतंत्र मते असावीत की नाही? हा प्रश्नच सध्याच्या काळात बाद झालेला आहे कारण ते जी मते मांडतात किंवा मांडायचे टाळतात त्यामागे सांस्कृतिक आणि राजकीय दबाव आहेत असा प्रचार केला जातो. काही प्रमाणात ते खरेही असेल, म्हणून स्वत:ची सांस्कृतिक आणि राजकीय मते असू नयेत आणि ते मांडू नयेत असा होत नाही. येथे हिटलरच्या नाझीवादाविरुद्ध उभे राहिलेले थॉमस मान, स्टालिनच्या राजवटीचा पर्दाफाश करणारे जॉर्ज ऑरवेल किंवा अलेक्झांडर सोल्झेनित्सिनसारख्या जागतिक लेखकांचे नाव घेत असतानाच आपल्याकडील शरदचंद्र चटर्जी, बंकिमचंद्र तसेच मराठीतील अण्णा भाऊ साठे, अरुण साधू, नामदेव ढसाळ यासारखे समाज, संस्कृती आणि राजकारण यावरच प्रश्न उभे करणारे लेखक झालेले नाहीत असे नाही पण अलीकडे गेल्या काही दशकांत ही परंपरा आटत आटत आता एवढी क्षीण झालेली आहे की तिचे अस्तित्वही लक्षात येऊ नये.**




**संजय सोनवणी**
साहित्यिक आणि संशोधक
७७२१८७०७६४



याच काळात नेमक्या संस्कृतीवर, समाजव्यवस्थेवर एवढे राजकीय आणि सांस्कृतिक आघात होऊ लागलेले आहेत आणि तरीही त्यांचा नेमका वेध घेत त्यांच्या मुळाशी जात त्याचे प्रलयंकारी चित्रण मात्र केले जाऊ नये हे आश्चर्य आहे. काही लोक सत्तानुकुल लिहितात किंवा जी विचारधारा प्रबळ आहे त्याचे समर्थन होईल अशा कृती लिहितात वा चित्रपट निर्माण करतात आणि सहसा तेच यशस्वी होत असताना दिसत असल्याने त्या विचारधारेच्या विरोधात कोणी लिहिले अथवा चित्रपट निर्माण करणे आजकाल सहसा होत नाही. त्यात कोणी विरोधी सूर लावला तरी त्यामागील सत्यासत्यता पडताळून पाहण्याऐवजी 'लेखकांना राजकीय मते असू नयेत...' असे वावदूक सल्ले दिले जातात.

विचारवंत आणि इतिहासकार आजकाल सत्तेची जी हिंदुत्ववादी (पक्षी वैदिकवादी) विचारधारेलाच समर्थन मिळेल असे विचार आणि इतिहास मांडताना दिसतात. इतिहास चुकीचा असेल तर तो सत्यस्वरूपात मांडणे अथवा नव्याने आकलन करणे ही एक जगन्मान्य लेखन परंपरा आहे पण विशिष्ट विचारधारेचे प्राबल्य पाहून सरकारदरबारी स्थान मिळवण्यासाठी आपले मूळ विचार बाजूला सारत इतिहासाचेच मुडदे पडतील असे काही लेखन प्रकाशित होत असेल आणि नावाजले जात असेल तर मग इतिहास कोठे राहिला? भारताचा इतिहास मुळात भ्रामक झाला आहे, मिथकात्मक झाला आहे तो याच प्रवृत्तीमुळे. आपण आपली ज्ञानपरंपरा त्यागून अंधारयुगाचेच समर्थन करतो आहोत की काय असा आता गंभीर प्रश्न पडतो आहे.

बरे, हा इतिहास ग्रंथांपुरताच मर्यादित राहिला असता तरी ठीक होते पण आता चक्क तो अभ्यासक्रमातही घुसवला जातो आहे. त्याचे ताजे उदाहरण आपण नंतर पाहूच पण मुळात केंद्र सरकारनेच अभ्यासक्रमातील इतिहास बदलण्यासाठी अवाढव्य प्रकल्प सुरु केले आहेत, त्याविरुद्ध मात्र कोणी आवाज उठवलेला दिसत नाही. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसइ) इयत्ता अकरावी आणि बारावीच्या इतिहास आणि राज्यशास्त्र या विषयांच्या अभ्यासक्रमातून शीतयुद्धाच्या काळातील अलिप्ततावादी चळवळ, आफ्रिका आणि आशियातील काही देशांत झालेला इस्लामी साम्राज्यांचा उदय, मुघलकालीन न्यायव्यवस्था अशा इतिहासाला कातरी लावली तर दहावीच्या अभ्यासक्रमातून अन्नसुरक्षेबाबतचा संपूर्ण धडाच काढून टाकला आहे. उर्दूतील प्रसिद्ध कवी फैज अहमद फैज यांच्या दोन कवितांचे अंशही काढून टाकण्यात आले आहेत. जे वगळले आहे ते बव्हंशी नेमके नेहरू आणि इस्लामच्या संदर्भातील आहे.

भाजप सरकारने गेल्या बारा हजार वर्षांचा इतिहास लिहिण्यासाठी समिती नेमली आहे. त्या समितीत केवळ उत्तर भारतीय ब्राह्मण आहेत. विशेष म्हणजे ते सर्व संघ विचारांचे आहेत. वेदकाळ मानला जातो त्यापेक्षा प्राचीन ठरवणे, रामायण-महाभारत खरेच घडले होते हे सिद्ध करणे आणि महत्त्वाचे म्हणजे वेद सिंधु संस्कृतीच्या पूर्वीच लिहिले गेले आणि त्या संस्कृतीचे जनक वैदिक धर्मीयच होते हे दाखवणे आणि हेच वैदिक आर्य भारतातील हरियानातून पश्चिमेकडे पसरत इंडो-युरोपियन भाषा आणि संस्कृतीचे वाहक कसे झाले हे दाखवणे हा या समितीचा इतिहासलेखनामागील हेतू होता. यात द्रविड संस्कृती, जैन-बौद्ध संस्कृती, उत्तरपूर्वेची संस्कृती, आदिवासी







संस्कृती याला स्थानच नाही कारण या समितीत यातील एकालाही प्रतिनिधित्व नाही. प्राकृत आणि पाली भाषा त्यांच्या दृष्टीने अस्तित्वातच नाहीत आणि विशेष म्हणजे हा नवा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे सूतोवाच तत्कालीन सांस्कृतिक व पर्यटनमंत्री प्रल्हाद पटेल यांनी केले होते.

याचा तत्काळ झालेला परिणाम असा की जगात कोणीही पुरातत्त्वज्ञ किंवा इतिहासकाराने मान्य न केलेले दावे सांस्कृतिक अभिनिवेशाच्या भरात अभ्यासक्रमात आणले गेले. घग्गर नदीचे नामकरण सरस्वती नदी केले गेले. एवढेच नव्हे तर सिंधू संस्कृतीचे नाव 'सिंधू-सरस्वती संस्कृती' असेही सरकारी पातळीवर केले गेले. अलीकडेच याचे ताजे आणि विदारक उदाहरण म्हणजे NCERTच्या नववीच्या पुस्तकात घडलेला प्रकार. हडप्पाकालीन नर्तकीच्या जगप्रसिद्ध मूर्तीच्या चित्रातील तिचा छातीखालचा भाग धूसर केला गेला आहे. तिचे मूळचे नग्न रूप विद्यार्थ्यांना दिसू नये असला दिव्य विचार NCERT ने केलेला आहे पण ही सांस्कृतिक इतिहासाशी सरळ-सरळ बेईमानी आहे. भारतीय सिंधुकालीन सौंदर्यशास्त्र आजच्या नजरेतून पाहणे ही संस्कृतीच्या मुळाशी बेईमानी आहे हे यांच्या लक्षात आले नाही. भारतात पुरातन काळापासून आजही लिंगपूजा आणि योनीपूजा होते आणि त्यात काही वैदिक सोडता कोणालाही अश्लील वाटलेले नाही. उलट सृजनाचे प्रतीक म्हणून त्याचा स्वीकार केला गेला आणि जनमानसाची त्या प्रतीकांवर अढळ श्रद्धा आहे. असे असताना नर्तकीच्या प्रतिमेला धूसर करून कोणते संस्कृतीरक्षण झाले? ही नर्तकीची प्रतिमा मुळात तंत्रशास्त्रातील आहे असे मत अनेक पुरातत्त्वविद्वान मांडत असतात आणि अशी नग्नता भारतात असंख्य शैव आणि शाक्त मंदिरात प्रतीकात्मकरित्या चितारली वा खोदलेली आपल्याला जिवंत रूपात दिसते. खजुराहो, अजंठा आणि मार्कंडा मंदिर ही याची जगप्रसिद्ध उदाहरणे आहेत. ही नर्तकीची मूर्ती पुरातन शिल्पशास्त्रामधील सौंदर्याचे एक मूर्तिमंत उदाहरण मानले जाते. या प्रतिमेत योनी ठळक असल्याने ती मातृदेवता असू शकेल असेही अनेक पुरातत्त्वविदांचे म्हणणे आहे. ते काहीही असले तरी ती मूर्ती सिंधुकालीन जीवनपद्धतीचे, प्रगत धातूशास्त्राचे आणि सौंदर्यदृष्टीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

नग्नतेची एवढी लाज वाटत असेल तर या मूर्तीचे चित्रच का ठेवले? काढून टाकायचे ना ते पुस्तकातून! पण त्या चित्राला धूसर करून कोणते शहाणपण विद्यार्थ्यांना दिले गेले? अनेक इतिहासकारांनी आक्षेप घेतल्यावर NCERTने पुस्तकाच्या डिजिटल आवृत्तीत मूळ चित्र प्रसिद्ध केले असले तरी छापील आवृत्तीत 'नंतर करू' असे त्यांचे उत्तर आहे. मुळात हा शहाजोगपणा का केला गेला? हे संस्कृतीचे आणि इतिहासाचे विकृतीकरण नाही असे कोण म्हणेल? इतिहासकार अशा निवडक बाबीबद्दल तरी बोलले हे स्वागतार्ह असले तरी याच पुस्तकात

घग्गर नदीचे नाव सरस्वती केले गेले, सिंधू संस्कृतीला 'सिंधू-सरस्वती' म्हटले त्याबाबत मात्र कोणी आवाज उठवलेला नाही. किंबहुना या नव्या सोळा सदस्यांच्या इतिहासलेखन समितीबाबत मी सोडलो तर महाराष्ट्रात कोणी साधा उच्चारही केलेला दिसत नाही.

मराठी लेखक आणि विचारवंत किती बोटचेपे असावेत याचे उदाहरण दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातच दिसून आले. उद्घाटन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी बिनदिक्कतपणे म्हणाले की, मराठी भाषा संस्कृतमधून निर्माण झालेली आहे. येथे पंतप्रधान हे विसरले की नुकताच त्यांनीच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. मराठी अभिजात आहे याचा अर्थ ती कोणत्याही भाषेपासून निर्माण झालेली नसून तिची निर्मिती स्वतंत्र आहे. या कार्यक्रमात जवळपास हजारभर मराठी साहित्यिक, विचारवंत, पत्रकार आणि आजी-माजी संमेलनाध्यक्ष उपस्थित होते. यातील एकालाही पंतप्रधानांच्या विधानावर आक्षेप घ्यावा असे वाटले नाही की साधा विरोधही नोंदवता आला नाही. मीच फक्त तेथेच झालेल्या परिसंवादात याचा सविस्तर जाहीर निषेध केला परंतु महाराष्ट्रातील फक्त दोन वृत्तपत्रांनी त्याची नोंद घेतली, बाकी वृत्तपत्रे गप्प बसली. मग यांचे भाषेवरील प्रेम कोठे गेले होते? की तेही मिंधे झालेले होते? की त्यांना कसली तरी भीती वाटत होती?

भारतातील सध्याचा संघर्ष राजकीय कमी आणि सांस्कृतिक जास्त आहे याचे भान ना पुरोगामी लेखकांना आहे ना प्रतिगामी मानल्या गेलेल्या लेखकांना. अशा पद्धतीने चुकीचा इतिहास प्रसृत करून आपण आपल्या भावी पिढ्यांचे कसे अतोनात नुकसान करत आहोत याचे भान सरकार वा त्यांच्या कट्टर समर्थकांना नसले तरी त्यातून ज्ञानवंतांची पिढी निर्माण होणे अशक्य आहे याचे भान येणार कसे? याचे सर्वांनीच गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. विद्यमान सरकार हे उजव्या विचारसरणीचे व पुनरुज्जीवनवादी असल्याने हे घडले आहे हे सहज कोणाच्याही लक्षात येईल.

काही इतिहासाचे पुनर्लेखन करणे खरेच आवश्यक बनून जाते कारण नवीन पुरावे समोर येत असतात, जुनी मते बदलावी लागतात किंवा आकलन बदलावे लागते. पाश्चात्य इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास परिपूर्ण नाही, त्यात अनेक त्रुटी आहेत हे मान्यच कारण भारतीय समाज-संस्कृतीचे त्यांचे भान बाह्यात्कारी घटक म्हणून होते. तरीही त्यांनीच येथील लेणी शोधली, ब्राह्मी-खरोश्ती लिपी वाचली आणि जमिनीत गाडून पडलेला इतिहास उजेडात आणला, शेकडो संस्कृत आणि प्राकृत ग्रंथांचे इंग्रजीत आणि जर्मन भाषेत अनुवाद करून जगासमोर तो ठेवला. हे त्यांचे ऋण विसरता येत नाही. आता त्यांच्याकडून राहून गेलेल्या त्रुटी दूर करायला हव्यातच पण त्या शास्त्रशुद्ध पद्धतीने. आपल्या प्रांतीय, राष्ट्रीय आणि धार्मिक अभिनिवेशातून नाही पण याचे भान सध्या पूर्णपणे सुटलेले दिसते. गतकाळात आमचेच सारे श्रेष्ठ होते हा अहंकार सुखावणारा असला तरी तो बौद्धिक उन्नतीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा असतो याचे भान नको?

अशा स्थितीत लेखक, इतिहासकार आणि विचारवंतांची जबाबदारी मोठी असते. ती पेलण्यासाठी धाडस तर लागतेच पण तेवढाच सखोल अभ्यास लागतो. मांडणी लागते. भयभीत किंवा सरकारी विचारधारेचे लांगुलचालन करणारे लोक असे धाडस करू शकत नाहीत हे आपण देशातील सर्वच सांस्कृतिक घटनांवरून पाहू शकतो. राम मंदिर हवे म्हणून बाबरी पाडली. बाबरीची जागा हिंदुंना मिळाली ती वहिवाटीच्या तत्त्वावर, हिंदुंची खरेच मालकी होती आणि तेथे राममंदिर खरेच पूर्वापार होते याचे पुरातत्त्वीय पुरावे मिळाले म्हणून नाही पण ठीक आहे. राम मंदिर झोकात उभे राहिले! आता राममंदिराला मिळालेले दानच चोरी झाल्याच्या बातम्या गाजत आहेत. तेथे तर घोरी किंवा बाबर आला नव्हता ना? पण त्याबाबत सर्व स्तरातून शांतता आहे. ही आमची खरी संस्कृती आहे? संस्कृतीरक्षक म्हणवणाऱ्यांनी यावर विचार करायला नको? लेखक-विचारवंतांनी याचे समाज-मानसिक विश्लेषण करायला नको? ज्या समाजातील नवविचार-प्रेरणा मरते तो समाजच मेल्यासारखा असतो हे आम्हाला कोणी तरी सांगायची गरज आहे.

सांस्कृतिक मते राजकीय मतांना सोडून असू शकत नाहीत याचीही नोंद घेतली पाहिजे. सांस्कृतिक मत हेही राजकारणाचा अपरिहार्य भाग असते. म्हणूनच हे वैदिकवादी सरकार अस्तित्त्वात आल्यापासून वैदिकीकरणाचा चंग बांधलेला आहे. सत्तेवर येताच स्मृती इराणी यांनी शपथविधी होऊन काही दिवस उलटतात न उलटतात तोवर त्यांनी अभ्यासक्रमात वैदिक विज्ञान-गणित वगैरे सामील करणार असे घोषित करुन धुरळा उडवून दिला होता आणि या सरकारचे प्राधान्यक्रम काय असेल याचेच जणू सुतोवाच केले होते. त्यानंतर लगेचच स्मृती इराणींनी अभ्यासक्रमात जर्मनीऐवजी संस्कृतचे पिल्लू सोडले. लागोपाठ सुषमा स्वराज यांनी 'भगवतगीतेला राष्ट्रीय ग्रंथ घोषित करावे!' अशी मागणी केली होती. जागतिक विज्ञान परिषदेत वैदिक विमानांवर प्रबंध आला आणि अवघ्या जगात भारताचे हसे झाले. त्यात खुद्द पंतप्रधान मोदींनी भारतात वैदिक काळात प्लास्टिक सर्जरीचा

शोध लागला होता हे विधान चक्क वैद्यकीय तज्ज्ञांसमोर केले. अशा प्रकारांना पुनरुज्जीवनवादी म्हटले जात नाही तर आपल्या सामान्य बुद्धिचाही किती विचका उडालेला आहे एवढेच त्यातून सिद्ध होते. याला इतिहासलेखनही म्हणत नाहीत तर विकृतीकरण म्हणतात. खरा पुनरुज्जीवनवाद इतिहासातील विसंगती शोधून, त्यातील त्रुटी शोधून पुराव्यानिशी आणि सप्रयोग सादर करणाऱ्या संशोधनास म्हणतात हे आमच्या गावीही नसावे?

बरे, हे फक्त इतिहासाबाबत घडते असे नाही. आमचे जागतिक स्थान, एकूण अर्थस्थिती याबाबतही असेच खोटेपण मिरवले जाते आहे. साधी जीडीपी घ्या. ही मंडळी फेक आकडेवाऱ्या फेकण्यात जेवढी वस्ताद आहे तसेच त्यांनी साधे जीडीपी मोजण्याचे जुने मापदंड बदलून खोटी टक्केवारी जाहीर करण्यात आणि भारत आता महासत्ता होणारच किंवा झालीच आहे हे टिऱ्या बडवत घोषित करण्यात हे लोक वस्ताद झालेले आहेत. मुळात जीडीपी वाढला असला समजा तरी तो सर्व लोकांची क्रयशक्ती संतुलित प्रमाणात वाढली म्हणून नव्हे तर मोजक्या उद्योजकांच्याच उत्पन्नात अनैसर्गिक अवाढव्य वाढ झाली आहे म्हणून! हे अर्थशास्त्रीय सत्य कोण उलगडून दाखवतो? म्हणजे समजा एका घरात पाच माणसे आहेत. त्यातील चार बेरोजगार आहेत. एके वर्षी एकाला लाख रुपयाची नोकरी लागली आणि ती घरातील पाचही लोकांत वाटली तर घरातील प्रतिमाणसी उत्पन्न वीस हजार दिसेल... पण त्याला वीस हजार मात्र प्रत्यक्षात मिळत नाहीत. म्हणजे घराचे म्हणून उत्पन्न वाढले असे दिसले तरी ते सर्वांचेच वाढलेले नसते. सध्याच्या अमेरिका-इराण युद्धात भारताचा शत्रू पाकिस्तानने बाजी मारून मध्यस्थी केली. इराण भारताचा प्राचीन मित्र पण आम्हाला इस्राएलशी सलगी करण्याची अवदसा आठवली. परिणामी तेलही गेले, तूपही गेले आणि हाती धुपाटणे आले. समजा आले नसेल तर आम्ही काय मिळवले याचे तरी सविस्तर विश्लेषण होतेय का? तर नाही. आम्ही सरकारचीच री ओढतो आहोत आणि बेइज्जतीला सन्मान समजतो आहोत.

लेखक-विचारवंतांना राजकीय किंवा सांस्कृतिक मते नसावीत आणि असली तरी ती आमच्या मतासारखीच असली पाहिजेत अशा दबाव आणणाऱ्या प्रवृत्ती खूप बोकाळल्या आहेत हे खरे आहे पण या सर्वांना तोंड देत समर्थपणे आपले मत, संशोधन मांडणे यालाच तर 'अभिव्यक्ती' म्हणतात. विचारधारा-शरण लेखन म्हणजे अभिव्यक्ती नव्हे तर ती शरणागती असते.

लेखकांना सांस्कृतिक आणि राजकीय मते असतातच. ती साध्या भिकाऱ्यालाही असतात पण ती मते व्यक्त करण्याचे, प्रामाणिकपणे प्रत्येक घटनेचे विश्लेषण करण्याचे स्वातंत्र्य लेखकांना, विचारवंतांना आणि इतिहासकारांना असले पाहिजे आणि ते झाकोळले जाते आहे असे वाटले तरी ते जगासमोर मांडण्याचे धैर्य असले पाहिजे. मग विचारधारा कोणतीही असो. कोणतीही विचारधारा परिपूर्ण नाही हा जगाचाच इतिहास आहे पण तिला काटेकोर बनवत नेण्याचे काम विचारवंतांचे असते आणि त्यांनी ते स्वातंत्र्य कोणत्याही बाह्य शक्तिला न भिता वापरलेच पाहिजे तरच तो जिवंत समाज निर्माण करू शकतो. सध्याचा समाज जवळपास मेल्यासारखाच झाला आहे पण त्यात सारेच मिळून प्राण फुंकू शकतात. त्यासाठी अतुलनीय धैर्य हवे. शेवटी भेकडांच्या हातून विजयाची कामना करणे व्यर्थच असते.

हे सारे मी केवळ टीका करण्यासाठी लिहित नाही तर आम्ही अंधाराची दिशा पकडली आहे की प्रकाशाची हे दाखवण्यासाठी. मी केवळ मोदी सरकारवर टीका करतो, असा समाजमाध्यम जगातील बहुतेकांचा समज आहे पण त्यांना हे माहीत नाही की राजीव गांधी लोकप्रियतेच्या शिखरावर असताना मी 'गुडबाय प्राईम मिनिस्टर' ही त्यांची अक्षरश: खिल्ली उडवणारी कादंबरीच लिहिली होती. नरसिंहरावांनी देशांतर्गत खुलेपण आधी न आणता विदेशी कंपन्यांना भारतात जागतिकिकरणाच्या नावे मुक्त द्वार दिले आणि आधी समाजवादात वाढलेल्या देशी कंपन्यांना त्या प्रगत कंपन्यांशी स्पर्धा करायला लावले. त्यामुळे देशी कंपन्यांना शरणांगती पत्करावी लागली. आपले व्यवहार बंद करावे लागले किंवा विदेशी कंपन्यांत विलीन करावे लागले. याचा विरोध करण्यासाठीच १९९४ साली 'सव्यासाची' नावावी अवाढव्य कादंबरी लिहिली. हे केवळ आर्थिक संकट आले म्हणून जाहीर केलेले उदारीकरण भारतात नीट यशस्वी होऊ शकणार नाही, हे मी त्या कादंबरीतून केलेले भाकित नंतर सत्यात आलेले आपल्याला दिसते आहे. सोनिया गांधींनी आणलेल्या अन्नसुरक्षा विधेयकावर मी 'हा लोकांना दुबळे करणारा प्रकार आहे...' अशी कठोर टीका केली होती. माझ्या बहुतेक राजकीय थरार कादंबऱ्या भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाची चिकित्सा करतात. मग रशियाचा भारतावरील प्रभाव असो की अगदी अलीकडचे पुलवामा प्रकरण असो की ऑपरेशन सिंदूर. साम्यवाद्यांनी लिहिलेल्या इतिहासाची आणि तशीच संघवादी इतिहासकारांचीही मी चिरफाड करत राहिलो आहे. माझे संशोधन, आकलन मांडत राहिलेलो आहे. तेही गेल्या पंचेचाळीस वर्षांपासून. तेव्हा केवळ हे सरकार आहे म्हणून मी त्याचा विरोधक आहे असे समजण्याचे काहीएक कारण नाही. आम्हाला इतिहासाच्या मिथकांत जगत अंधाराकडे जायचे आहे की मिथकांचे जाळे तोडत नवा सूर्य उराशी कवटाळायचा आहे एवढाच काय तो माझ्यासमोरचा प्रश्न आहे.



**प्रल्हाद दुधाळ**
पुणे
९४२३०१२०२०



# उत्कर्ष

**नव्या सोसायटीत** मनासारखे घर मिळाल्याने आम्ही दोघेही खूश होतो. घरात आवश्यक असलेले फर्निचर करणे चालू होते. दोन महिन्यांत कामे उरकली आणि धुमधडाक्यात वास्तुशांती केली.

इथे राहायला आल्यावर एक अनोखी ऊर्जा अंगात संचारल्यासारखे वाटत होते. आयुष्यात प्रथमच सगळ्या गोष्टी मनासारख्या घडत होत्या त्यामुळे आमचा आनंद द्विगुणित होत होता आणि तो आनंद नाही म्हटलं तरी आम्हा दोघांच्या वागण्या बोलण्यात जाणवत होता. मधल्या काळात ज्यांची समोरासमोर भेट झाली नव्हती असे लोक भेटल्यावर त्यांच्याकडून आम्हाला एक वाक्य हमखास ऐकायला मिळत होते,

''तुम्हा दोघांना रिटायरमेंट आणि नवे घर चांगलेच मानवले आहे बरं का!''

ते ऐकून छान वाटत होते; पण एक दिवस मात्र आमच्या या आनंदी आयुष्यात वादळ उठले. झाले असे की, एक दिवस आमच्या खालच्या मजल्यावर बंद असलेल्या घरात कुणीतरी राहायला आले.

आता तुम्ही म्हणाल यात विशेष काय? ज्याचे कुणाचे ते घर असेल तो राहायला आला असेल किंवा त्याने भाडेकरू ठेवला असेल!

हो बरोबर... मला आमच्या खाली कुणी तरी राहायला आले याचा आनंदच झाला. माझ्या खिडकीतून खालची बाल्कनी व्यवस्थित दिसते त्यामुळे सकाळी उठल्या उठल्या मी तिकडे नजर मारली तर माझ्या नजरेचे स्वागत त्या बाल्कनीत ओळीने मांडून ठेवलेल्या सात-आठ बियरच्या बाटल्यांनी केले!

त्या बाटल्या पाहून खाली राहायल्या आलेल्या, न पाहिलेल्या त्या व्यक्तिबद्दल थोडासा अंदाज आला; पण आपल्याला काही त्रास झाला नाही तर तो कोण आहे आणि तो काय खातो पितो याच्याशी मला काही घेणे देणे असायचे कारण नव्हते. मी दुर्लक्ष करुन माझ्या कामाला लागलो.

साधारण अर्धा तास गेला आणि खालच्या बालकनीतून स्पिकरचा प्रचंड मोठा आवाज यायला लागला. मी खिडकीतून खाली पाहिले तर कुठेलेसे पंजाबी गाणे फुल वॉल्युमवर लाऊन एक टी शर्ट बरमुडा घातलेला पंचविशीचा तरुण हातातली बियरची बाटली नाचवत स्वतःही आडवा तिडवा नाचत होता!

त्या आवाजाने आधीच मी वैतागलेला होतो, त्यात हा मद्यधुंद तरुण नाचतोय हे पाहून मी वरुनच ओरडलो, ''हॅलो आवाज कमी करा!''

आधी त्या तरुणाचे लक्ष दिले नाही; पण मी पुन्हा आवाज दिल्यावर त्याने वर पाहिले. नाचता नाचता त्याने हातवारे करत विचारले, ''क्या?''

''अरे पहले आवाज कम करो, इधर लोग रहते है''

''क्यू?''



''क्यू क्या? आवाज से तकलीफ हो रही हैं, पहले वॉल्यूम कम करो''

''मेरा घर हैं, मै कुछ भी कर सकता हू। मै क्यू आवाज कम करू?''

त्याचे नाचणे आणि मग्रुरीत बोलणे चालूच होते.

आता मला त्याचा चांगलाच राग आला होता. मी त्याच्यावर अजूनच जोरात ओरडलो, ''तो तुम्हारे घर के अंदर आवाज आयेगा उतना ही आवाज रखो, बाकी लोगोंको क्यू तकलीफ दे रहे हो? स्पीकर घर के अंदर रखो, और आवाज कम करो.''

''मै नहीं करेगा, जो उखाडना हैं उखाडो!''

बाप रे, तो तर आवाज वाढवून माझ्यावर खेकसत होता. आता मात्र माझी सटकली होती. एकदा वाटले खाली जाऊन गचांडे पकडून त्याच्या कानाखाली वाजवावी; पण मग लक्षात आले अरे आपण आता त्रेसष्ट पार केले आहे! थोडे ज्येष्ठ नागरिकासारखे वागायला हवे!

मग मी सोसायटी व्हाट्स ॲप ग्रुपवर या घटनेबद्दल लिहिले. बिल्डिंग प्रतिनिधीलाही फोन करुन ही घटना सांगितली.

बहुतेक माझ्या वरच्या मजल्यावरच राहात असलेल्या बिल्डिंग प्रतिनिधीने माझे आणि त्याचे बोलणे ऐकले असावे कारण त्याने त्याच्या परदेशात असलेल्या फ्लॅट मालकाला लगेच फोन केला.

आणि काही क्षणातच स्पीकर बंद झाला.

मी निश्वास टाकला आणि झोपी गेलो.

सकाळी नेहमीप्रमाणे उठून फिरायला गेलो.

घरी येऊन दैनंदिन कामे करत असतानाच बेल वाजली.

दार उघडल्याबरोबर प्रथम बियरचा उग्र दर्प नाकात शिरला. बघितले तर समोर तो कालचा तरुण एकदम केविलवाणा चेहरा घेऊन उभा!

मी नाखुशीने त्याच्याकडे बघु लागलो. तो अचानक माझ्या पायावर झुकला. पाया पडून गयावया करत बोलू लागला, ''सॉरी अंकल, मेरी वजह से आपको तकलीफ हूई.''

त्याचा तो अवतार बघून नाही म्हटलं तरी माझा अहम सुखावला. मला त्याची दया आली.

''आओ, अंदर आओ, बैठो'' मी त्याला घरात बोलावले.

तो आत आला आणि सोफ्यावर बसला. ''सॉरी अंकल फिरसे माफ करना. वो मै रातको बियर पिया था ना...''

''ठीक है.''

सुबह का भूला शाम को घर वापस आयें तो उसे भूला नहीं कहते. कुठे तरी ऐकलेला डायलॉग आठवला आणि मनोमन त्याला माफ करुन टाकले!

सौ. ने त्याला पाणी आणून दिले, त्याने ते घेतले.

''नाम क्या हैं आपका?''

''उत्कर्ष.''

''अच्छा नाम है!'' मी त्याला थोडा हरभऱ्याचा झाडावर चढवला. तो अजूनच बुजला.

***

काल माझ्याशी नशेत मजुरीने बोलणारा तो तरुण – उत्कर्ष आता माझ्या समोरच्या सोफ्यावर बसला होता.

डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा, अंगावर फिकट्या पिवळट कलरचा चुरगळलेला टी शर्ट, मुळचा हिरवा कलर असलेली पण आता विटलेली बर्मुडा, चेहऱ्यावर बावळटपणाची झाक असलेला उत्कर्ष माझ्यासमोर बसून पाणी पीत होता.

''उत्कर्ष... तुम्हारा नाम तो बढ़िया है, फिर ऐसा बिगाडा क्यूं है भाई?''



काल त्याने केलेला उद्धटपणा अजून माझ्या डोक्यातून गेलेला नव्हता.

''अंकल सॉरी बोला ना मै. कभी कभी बियर पिया तो होता है गलती!''

''वैसे आप क्या पढ़े हैं? क्या करते हो?''

''मैं ने इंजिनियरिंग किया है..''

उत्कर्ष इंजिनियर होता, बायजुस कंपनीत काम करतोय म्हणाला.

मी प्रश्न विचारत होतो आणि तो उत्तरे देत होता.

त्याचे वडील अमरावतीला सावकारी करायचे. प्रचंड पैसा ठेवून ते अकाली वारले होते. माझ्या खालच्या मजल्यावर असलेला फ्लॅट त्याच्या विवाहित बहिणीचा होता, जी सध्या अमेरिकेत आयटी कंपनीत काम करत होती. आपल्या वयस्कर आईला घेऊन उत्कर्ष इथे राहायला आला होता. लवकरच तोही अमेरिकेला जायची स्वप्ने तो बघत होता.

काल मला झालेल्या त्रासाबद्दल पुन्हा पुन्हा माफी मागून तो निघाला.

एकंदरीत उत्कर्ष 'बडे बाप की बिगडी हुई औलाद' होती तर!

'ठीक आहे त्याने माफी मागितली आहे, आपल्याला यापुढे त्रास झाला नाही म्हणजे झाले' असा मी विचार करतच होतो पण जाता जाता त्याने एक बॉम्ब टाकलाच. ''अंकल कल मेरा बर्थडे है, रात को मेरे फ्रेंड्स आनेवाले है, तो थोड़ा हंगामा हो सकता है, गाना बजाना भी

होगा, आपको परेशानी होगी, मेरा बर्थडे है तो पार्टी तो होगी ही!''

बाप रे, उत्कर्ष आज रात्रीसुद्धा त्रास देणार तर!

''आवाज कम रखो, दुसरे को परेशान मत करो. ये सोसायटी है'' मी त्यातल्या त्यात होणाऱ्या संभाव्य त्रासातून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करत होतो!

मी माझे समाधान जरी करून घेत असलो तरी आज रात्री समोर काय वाढून ठेवले आहे या बाबतीत साशंक झालो होतो. कुणाशी तरी या विषयावर बोलायला हवे म्हणून बिल्डिंग प्रतिनिधीला कॉल केला. आयटी इंजिनिअर असलेल्या बिल्डिंग प्रतिनिधीने माझा फोन घेतला नाही.

तशीही अजून त्याची आणि माझी फारशी ओळख नव्हती.

पोलिसात तक्रार करण्याचा एक मार्ग होता पण त्याशिवाय अजून काय काय करता येईल यावर विचार करत असतानाच माझा फोन वाजला.

''काय म्हणताय काका?''

बिल्डिंग प्रतिनिधींचा कॉल होता.

उत्कर्षचे काय करायचे यावर आम्ही चर्चा केली.

'रात्री त्रास झाला तर उत्कर्षला दम देऊन सोसायटीच्या बाहेर काढूया' असे आश्वासन त्याने दिले.

संध्याकाळ झाली. मी वरून त्याच्या बाल्कनीत नजर ठेवून होतो. दिवसभरात चार-पाच बियरच्या रिकाम्या बाटल्या बाहेर येऊन पडल्या होत्या!

संध्याकाळी त्याच्याकडे कुणी मित्रमंडळी आल्याचे दिसत नव्हते तरीही मी झोपताना कानात घालण्यासाठी कापसाचे बोळे तयार ठेवले होते.

अकरा वाजेपर्यंत तरी कोणताही आवाज नव्हता. थोडे हायसे वाटले. आम्ही झोपायला गेलो. मध्यरात्री अचानक फुल व्हॉल्यूमवर स्पीकर सुरू झाला!

मी उठून खाली नजर मारली. उत्कर्ष हातात बाटली घेऊन एक एक घोट घशात ओतता ओतता आपल्याच धुंदीत नाचत होता! अख्खी बिल्डिंग हादरवणाऱ्या त्या आवाजाने माझ्यासारखेच इतर रहिवाशीही जागे झाले होते.

बिल्डिंग प्रतिनिधी आणि अजून दोघा तिघांनी त्याचा दरवाजा वाजवला पण तो जाम दाद देईना!

बिल्डिंग प्रतिनिधीने उत्कर्षच्या बहिणीला (जी अमेरिकेत होती) कॉल केला आणि दररोज होणाऱ्या या त्रासाबद्दल तिची बरीच कानउघडणी केली. हा प्रकार बंद झाला नाही तर पोलिसात तक्रार करण्याची धमकी दिली.

पंधरा वीस मिनिटे हा गोंधळ चालू होता. नंतर मात्र स्पीकर बंद झाला. बहिणीला फोन केल्यामुळे उत्कर्ष चांगलाच पिसाळला होता, बाल्कनीत येऊन तो बिल्डिंग प्रतिनिधीला शिव्या देऊ लागला.

अशा मूर्ख माणसाच्या नादी लागण्यात अर्थ नाही. उद्या यावर काही तरी ठोस उपाय करायचे ठरवून जमलेले रहिवाशी पांगले. आम्ही दोघे कानात कापसाचे बोळे घालून आता झोपेची आराधना करू लागलो.

***

उत्कर्षने घातलेल्या गोंधळामुळे रात्री नीट झोप झाली नसल्याने दुसऱ्या दिवशी मी उशिराच उठलो. सकाळी आलेले वर्तमानपत्र वाचायला घेणार होतो तेवढ्यात घराची बेल वाजली. डोकावून बघतो तर समोर उत्कर्ष उभा होता! त्याच्या हातात भला मोठा चॉकलेटचा बॉक्स होता. मी थोडा नाराजीनंच दरवाजा उघडला. मी काही बोलण्यापूर्वीच उत्कर्ष सुरु झाला... ''सॉरी अंकल, कल मी






आपको मेरी वजह से तकलीफ हो गया, वो क्या है ना, कल मेरा बर्थडे था ना!''

आत येऊन तो माझ्या पायाशी झुकला.

खरं तर मला त्याचा खूप राग आला होता पण त्याचे ते केविलवाणे बोलणे ऐकून मी स्वतःवर नियंत्रण ठेवले.

या दुहेरी व्यक्तिमत्त्व असलेल्या तरुणाशी आपण नक्की कसे वागावे, तेच कळत नव्हते! रात्री नशेत असताना तो कशाचीच पर्वा करत नव्हता, उद्धटपणे वागत होता; मात्र दिवस उजाडताच शहाण्या मुलासारखा झालेल्या चुकीची कबुली देऊन माफी मागत होता. 'याचे नाव ठेवताना त्याच्या आई-बापाने नक्कीच हा आपल्या खानदानाचे नाव उत्कर्षाला नेईल असा विचार केला असेल पण प्रत्यक्षात मात्र तो असे गुण उधळून आईवडिलांचे संस्कार पार धुळीला मिळवत होता!'

माझे विचारचक्र असे फिरत असताना तो माझ्याकडे बघत दिलगिरी व्यक्त करत होता.

''सच में माफ करना अंकल. कल भी आपको तकलीफ हो गया, लीजिए आप दोनों के लिये मेरी तरफ से छोटासा गिफ्ट! ये मेरा आपके लिये बर्थडे गिफ्ट है.'' माझ्या हातात डेअरी मिल्कचा तो जंबो बॉक्स ठेवत तो बोलला.

मी तिरक्या नजरेने त्याच्यावर डाफरलो. ''मुझे नहीं चाहिये तुम्हारा गिफ्ट, वापस ले जाओ, एक तो रातभर तकलीफ देते हो, और सुबह आकर माफी मांगते हो, कैसा आदमी हो रे तुम?''

त्याचा चेहरा अजूनच केविलवाणा दिसायला लागला.

''अंकल, आजसे मैं बियर नहीं पिऊंगा. मैंने अपनी माँ को भी ये वचन दिया है. आपको भी वचन देता हूं... इसके बाद आप लोगों को बिलकुल तकलीफ नहीं होगी, मेरा विश्वास करो.''


तो गयावया करत बोलत होता! मला प्रश्न पडला होता.

'रात्रीचा तो उच्छाद मांडणारा उत्कर्ष खरा, की सकाळी वाढदिवसाच्या निमित्ताने गिफ्ट घेऊन येऊन त्रास दिल्याबद्दल माफी मागणारा उत्कर्ष खरा?

उत्कर्ष जरी बिअर सोडल्याचे म्हणत होता तरी दोन दिवस दिलेल्या अनुभवाने माझा त्याच्यावर विश्वास बसत नव्हता.

मी परत त्याच्या हातात दिलेला चॉकलेटचा बॉक्स माझ्या घरातल्या डायनिंग टेबलवर ठेवून पुन्हा पुन्हा 'सॉरी अंकल' म्हणत उत्कर्ष निघून गेला.

व्यसन मुक्ती केंद्र चालवणाऱ्या तुषार नातू यांचे 'नशा यात्रा' आणि 'बेवड्याची डायरी' ही त्यांच्या स्वानुभवावर आधारित पुस्तके मी नुकतीच वाचलेली होती. त्यात त्यांनी लिहिले होते - 'कोणताही व्यसनी माणूस आपले व्यसन सहजासहजी सोडत नाही. व्यसन म्हणजे एक प्रकारचा आजार आहे आणि व्यसनी माणूस आपल्या व्यसनासाठी काहीही करू शकतो. तो



खोटे बोलू शकतो, चोरी करू शकतो, मारामारी करू शकतो, अगदी कोणत्याही थराला जाऊ शकतो...'

उत्कर्ष सुद्धा असाच मानसिकदृष्ट्या आजारी असल्याचे जाणवत होते. त्याला खरे तर मानसोपचाराची गरज होती पण या बाबतीत मी काहीच करू शकणार नव्हतो. सध्या तरी तो म्हणतो त्याप्रमाणे वागत आहे की नाही हे पाहणे, एवढेच माझ्या हातात होते. बिल्डींगमधले बाकी रहीवाशीही 'परत आज त्रास दिला तर पोलिसांना बोलावून उत्कर्षला धडा शिकवण्याच्या' निर्णयापर्यंत आले होते.

गेल्या दोन दिवसात आमच्या



झोपेचे पार खोबरे झाले होते. आमच्या दैनंदिन शांत जीवनात हे छोटे वादळ पुढे किती दिवस चालणार होते काय माहीत! 'आज काही तरी निर्णय घेऊन या उत्कर्ष प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायचाच' असे मी मनाशी ठरवले होते.

रात्री झोपायला गेल्यावर आम्ही याचा स्पीकर कधी लागतो याची नकळत वाट पाहत होतो! काय विचित्र गोष्ट आहे ना? जी गोष्ट आम्हाला त्रास देत होती तीच गोष्ट घडण्याची मी चक्क वाट बघत होतो! त्या दिवशी खरोखरच उत्कर्ष शांत होता. रात्री उशीरापर्यंत त्याचा बिलकुल आवाज आला नाही. ही ब्याद सोसायटीतून निघून गेली असेल तर खूप बरे होईल असा टोकाचा विचार करत मध्यरात्री बाराच्या

दरम्यान मी पायऱ्या उतरून खालच्या मजल्यावर गेलो. फ्लॅटच्या दरवाजाला कुलूप नव्हते. याचा अर्थ उत्कर्ष त्याच्या घरातच होता.

उरलेल्या रात्रीत तो अजून काय काय गोंधळ घालणार, याबद्दल एक प्रकारची भीती मनात ठेवूनच रात्री झोपायला गेलो. उशाशी आपत्कालीन व्यवस्था म्हणून कापसाचे बोळे मात्र तयार ठेवले होते!

***

आम्ही झोपायला गेलो. आज तरी झोपेचं खोबरं होऊ नये म्हणून प्रार्थना करून झोपी गेलो. गाढ झोपेत असताना अचानक कसलाशा आवाजाने झोप चाळवली गेली. डोळे चोळत उठून कानोसा घेतला. संपूर्ण बिल्डिंग दणाणून सोडणाऱ्या व्हॉल्यूममध्ये कुठल्या तरी पंजाबी गायकाच्या गाण्याच्या आवाजाने मी जागा झालो होतो. उत्कर्षचा उपद्रव चालू झालेला दिसत होता! आता स्वतःला फार त्रास करून घेण्याच्या फंदात न पडता मी उशाला ठेवलेले कापसाचे बोळे कानात सरकवले, तरीही तो आवाज येतच होता. मी घड्याळात बघितलं, रात्रीचे दोन वाजले होते. त्या दणाणणाऱ्या आवाजाने बहुतेक सगळी बिल्डिंग आता जागी झाली होती. बिल्डिंगमधील बरेच रहिवासी हळूहळू वैतागत उत्कर्ष राहत होता त्या फ्लॅटसमोर जमा होऊ लागले होते.

सगळे मिळून त्याचा दरवाजा वाजवत होते. दरवाजावरची बेल बहुतेक त्याने बंदच केली असावी. उत्कर्ष आपल्या धुंदीत तोंडाने मोठ्या मोठ्या आवाजात ओरडत त्या कर्कश संगीतावर नाचत असावा कारण त्याचा आवाज बाहेरपर्यंत येत होता. जर त्याचा आवाज बाहेर येऊ शकत होता तर दरवाजा वाजवण्याचा आवाज त्याला नक्कीच जात असावा, तो मात्र जाम दाद देत नव्हता! तो दाद देत नाही हे पाहून महिलांनी व काही लोकांनी १०० नंबर डायल करून पोलिसांची मदत मागितली होती.

आमच्या बिल्डिंग प्रतिनिधीने उत्कर्षच्या अमेरिकेत असलेल्या बहिणीला फोन लावला आणि उत्कर्षला समजावण्यास सांगितले. तिने बहुधा लगेच उत्कर्षला फोन केला असावा कारण स्पीकर बंद करून उत्कर्ष फोनवर बोलण्याचा आवाज यायला लागला. दोन पोलीस हवालदारही तेथे आले. त्यांनीही



दरवाजा वाजवला. खूप वेळाने एकदाचा दरवाजा उघडून उत्कर्ष बाहेर आला. त्याच्या हातात बिअरची बाटली होती. शिव्या देतच तो बाहेर आला. बाहेरची गर्दी आणि पोलीस बघून उत्कर्ष घाबरून आत जायला लागला पण पोलिसांनी त्याला बाहेर खेचले. आता उत्कर्ष केविलवाणा दिसायला लागला. पोलिसांनी त्याच्या बहिणीला फोन करायला लावला आणि तिची चांगलीच कानउघाडणी केली. पुन्हा लोकांना त्रास झाला तर उत्कर्षला अटक केली जाईल अशी धमकी दिली.

आधी उर्मटपणे बोलणारा उत्कर्ष आता जाग्यावर आला होता. काही रहिवासी त्याला मारायला धावत होते पण पोलिसांनी त्यांना थांबवले नाही तर आज उत्कर्षची काही खैर नव्हती! पोलिसांनी समजूत घातल्यानंतर रहिवासी आपल्या आपल्या घरी गेले. ती रात्र अशा गोंधळात संपली.

या उत्कर्ष प्रकरणाचा लवकर निकाल लागणे आवश्यक होते. दुसऱ्या दिवशी घरातल्या काही कामाच्या निमित्ताने मी खाली निघालो होतो, बाराव्या मजल्यावर लिफ्ट थांबली, लिफ्टमध्ये उत्कर्ष आला. आज तो जरा उत्साहात दिसत होता. कदाचित दाढी व अंघोळ केली असावी, शिवाय कालची नशाही पूर्ण उतरलेली दिसत होती.

मला समोर पाहून तो थोडासा बुजला. त्याच्यामुळे आमची रात्रीची झोप पार खराब झाली होती तरी मी आता त्याच्यावर चिडलो नव्हतो, उलट 'वाट चुकलेला तरुण' म्हणून मला त्याची काहीशी कीव वाटत होती. मी त्याला चिडवण्याच्या दृष्टीने म्हणालो, ''उत्कर्ष कसा आहेस तू?''

''ठीक हूँ अंकल, आज बहुत काम करना है, कल मेरी सिस्टर बहुत दिन के बाद इंडिया आ रही है । उसके स्वागत

के लिये सोसायटी में ढोल बजेगा, फूल बरसेंगे, नाचगाना होगा, मैंने पूरी तैयारी करी है।''

''अच्छा, कितने दिन के बाद आ रही हैं आप की सिस्टर?''

''पाच साल के बाद आ रही हैं, सिलेब्रेशन तो करना ही पडेगा, हैं ना अंकल?''

कालचा उत्कर्ष खरा की आजचा खरा? मी विचार करत होतो. मी हसत मान डोलावली आणि मी लिफ्टमधून बाहेर पडलो. आता बहिणीच्या स्वागताच्या निमित्ताने उत्कर्ष इथे अजून काय काय गोंधळ घालणार होता काय माहिती!

फार विचार न करता उद्या काय काय बघायला मिळेल ते बघायचं! आत्ता मनाचा निर्णय झाला होता.

***

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर मी गॅलरीतून उत्कर्षचा अंदाज घेत होतो. मी पहिले की सकाळी उठून उत्कर्ष त्याच्या गॅलरीतला त्याने करून ठेवलेला पसारा आता आवरत होता. थोड्या वेळात कुणी तरी कामवाली मावशीही आता त्याच्या मदतीला आली होती. तिच्या मदतीने तो घर आवरत होता. उत्कर्ष कामवालीला देत असलेल्या सूचना मला माझ्या घरात ऐकू येत असल्याने मला घरात बसून खाली त्याच्याकडे काय चालले आहे याचा अंदाज येत होता.

उत्सुकता म्हणून सहज खाली मजल्यावर डोकावले तर उत्कर्षने दरवाज्याच्या बाहेर ओळीत मांडून ठेवलेल्या पंधरा-वीस बिअरच्या बाटल्या आणि घरातला जमा केलेला खूप सारा कचरा दरवाज्याच्या जवळ ठेवलेला दिसला.

उत्कर्ष कामवालीला सांगत होता, ''दोपहर के पहले ये सब बोतल और कचरा लेकर जाना, मेरी दीदी कभी भी आ सकती है।''

काल उत्कर्ष मला भेटला तेव्हा जे सांगत होता त्यात तथ्य होते तर! खरंच त्याची दीदी अमेरिकेहून येणार होती. दिवसभर उत्कर्षची बहीण येणार असल्याने काही ना काही धावपळ चालू असल्याचे जाणवत होती. त्याचे सारखे सोसायटीच्या आत बाहेर येणे जाणे चालू असल्याचे दिसत होते.

नेहमी प्रमाणे संध्याकाळी आम्ही दोघे बाहेर फिरायला निघालो असताना दिसले की उत्कर्ष मस्त तयार होऊन गेटवर कुणाची तरी वाट बघत होता. तेव्हढ्यात एक रिक्षा आली आणि त्यात बसून तो कुठेतरी गेला. रात्री उशीरापर्यंत त्याच्या फ्लॅटचा लाईट बंदच होता. बहुधा तो त्या रात्री बाहेरच थांबला असावा. त्या रात्री खाली कसलीच हालचाल जाणवली नाही. तीन दिवसानंतर आम्हाला त्या रात्री शांत झोप लागली.

सकाळी उठून मी खाली अंदाज घेतला, बहुतेक उत्कर्ष अजूनही घरी आला नव्हता. या तीन दिवसात त्याची आई मला एकदाच दिसली होती. नंतर उत्कर्षने दोन रात्री घातलेला गोंधळ बघून बहुतेक ती निघून गेली असावी कारण त्याच्या घराला आज चक्क कुलूप घातलेले दिसत होते.

दोन-तीन दिवस उत्कर्षने घातलेल्या गोंधळामुळे असेल पण नकळत मन सतत खालच्या फ्लॅटमधील हालचालींचा मागोवा घेत होते. जणू आता मनाला तो चाळाच लागला होता! आश्चर्य म्हणजे तो दिवसही शांततेत पार पडला. रात्री कधी तरी उशीरा उत्कर्ष घरी परत आला असावा. सकाळी तो एक-दोन वेळा गॅलरीत येऊन गेल्याचे दिसले.

उत्कर्षमध्ये झालेला सकारात्मक बदल मला नक्कीच आतल्या आत सुखावत होता. 'त्याने खरंच बियर पिणे सोडले असेल तर छानच होईल,' असा विचार मनात आलेला असतानाच दुपारी चारच्या दरम्यान बाहेर सोसायटीच्या गेटवर जोरात ढोलबाजा वाजवल्याचा आवाज येऊ लागला आणि पावले आपोआप गॅलरीतून गेटवर काय चालले आहे ते बघण्यासाठी वळाली.

गेटच्या आतल्या बाजूला दोन ढोलवाले, एक ताशावाला आणि उत्कर्ष हातात एक मोठी पॉलिथिन बॅग घेऊन कुणाची तरी वाट बघत उभा असलेला दिसत होते. ढोलवाले बहुतेक त्यांच्या वाद्यांची वाजवून ट्रायल घेत होते.

तेवढ्यात गेटवर एक कॅब आली आणि थांबली. उत्कर्ष ढोलवाल्यांना वाजवायचा इशारा करत तिकडे धावला. ढोलीबाजा जोरात वाजायला लागला. त्या कॅबमधून एक तरुणी उतरली. उत्कर्ष तिच्या पाया पडला आणि हातातल्या बॅगेतून काढलेला झेंडूच्या फुलांचा हार बहिणीच्या गळ्यात घातला. तिने त्याला जवळ घेतले आणि त्याच्या पाठीवर हात फिरवला. उत्कर्षने तिला पुन्हा कॅबमध्ये बसवले आणि स्वतः कॅबच्या समोर नाचू लागला. पुढे ढोलताशा, त्यांच्या मागे हातात फुलांची पिशवी घेऊन नाचणारा उत्कर्ष आणि त्यामागे ती कॅब अशी मिरवणूक गेटपासून आमच्या बिल्डिंगच्या दिशेने सरकू लागली. मध्येच नाचता नाचता उत्कर्ष थांबायचा, हातातल्या पिशवीतून चार-पाच फुले घेऊन कॅबवर टाकायचा आणि पुन्हा नाचायचा!

हे नक्की काय चालले आहे हे माहीत नसणारे लोक ही मजेशीर मिरवणूक बघून प्रश्नार्थक चेहऱ्याने एकमेकांकडे बघत होते. हळूहळू ही मिरवणूक आमच्या बिल्डिंगपर्यंत आली. आवाज ऐकून आजूबाजूला जमलेले सगळे जण उत्सुकतेने पुढे काय होते आहे ते बघत होते. उत्कर्षची बहीण कॅबमधून उतरली. तिच्या अंगावर उत्कर्षने फुलांच्या उरलेल्या पाकळ्या उधळल्या.

आता ढोल ताशा वाजायचे थांबले, बॅगा खाली उतरवल्या गेल्या. उत्कर्षने आधीच एका लिफ्टमध्ये फुले पसरवून लिफ्ट सजवून ठेवली होती. उत्कर्षने बहिणीला त्या सजवलेल्या लिफ्टमधून वर आणले. अशा प्रकारे उत्कर्ष आज उत्साहाने आपल्या बहिणीचा स्वागतसोहळा साजरा करत होता. बहीण घरात गेली आणि दरवाजा बंद झाला.

***

त्या नंतरच्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत खालच्या फ्लॅटमधून कसलाही आवाज नव्हता. काल उत्कर्षची बहीण घरी आल्यानंतर सगळं कसं शांत शांत होतं. कसलाच आवाज नाही! अकराच्या दरम्यान मी काही कामानिमित्त खाली गेलो होतो. योगायोगाने माझी आमच्या बिल्डिंग प्रतिनिधीशी गाठ पडली. मला पाहून त्यानेच मला हाक दिली.

''काय म्हणताय काका?''

''काही नाही बघा, मग काय म्हणतोय तुमचा उत्कर्ष?'' आमच्या बिल्डिंगमधे सध्याचा चर्चेचा विषय म्हणजे उत्कर्षने दोन-तीन दिवस घातलेला गोंधळ हाच होता. मी तो विषय काढताच बिल्डिंग प्रतिनिधी खुलला.

मध्यल्या दोन-तीन दिवसात घडलेल्या परंतु मला माहीत नसलेल्या बऱ्याच गोष्टी मला आमच्या बिल्डिंग प्रतिनिधीने सांगितल्या. त्या दिवशी उत्कर्षची पोलिसात तक्रार झाली होती, त्याच्या दुसऱ्या दिवशी बिल्डिंगमधील काही रहिवासी तसेच सोसायटी ऑफिसने पोलिसांशी संपर्क साधून फॉलोअप घेतला होता. उत्कर्षला पोलीस स्टेशनवर बोलावून पोलिसी भाषेत समज दिली गेली होती तसेच त्याच्या बहिणीला फोन केला गेला होता. आधीच केलेल्या नियोजनानुसार त्याची बहीण भारतात यायला निघालेलीच होती.

काल संध्याकाळी बहिणीचे स्वागत करताना उत्कर्ष आधीएवढा उत्साहात का दिसला नाही, तसेच त्याच्या आधीच्या दिवशी उत्कर्षने गोंधळ का घातला नाही त्याचे खरे कारण हे होते!

संध्याकाळी उत्कर्ष लिफ्टमध्ये दिसल्यावर मी त्याला थांबवले.

''क्यूँ उत्कर्ष, आ गयी आपकी सिस्टर?''

''हां अंकल, आपने ढोल बजते हुआ सुना नहीं क्या?''

''हां सुना और देखा ना मैने उपरसें, क्या यार उत्कर्ष... तुम अकेलेही डांस करता था, कम से कम आठ-दस दोस्त तो बुलाना चाहिये ना डांस करने के लिये!'' मी चेष्टेच्या सुरात बोललो.

''हां अंकल, बुलाये तो थे बहुत सारे दोस्त लेकिन कैंसल करना पड़ा सब प्रोग्राम, सोसायटीवाले बहुत गुस्सा हो गये ना मेरी सिस्टर को भी ऑफिस में बुलाकर बहुत कुछ सुनाया अंकल, मैं वापस जा रहा हूं, अब पुणे में नहीं रहना है मुझे!''

त्या दोन दिवसात बरंच काही घडलेलं दिसत होतं. पुढच्या दोन-तीन दिवसात उत्कर्ष आणि त्याची बहीण सोसायटीच्या ग्रुपवर घरातल्या वस्तू, फर्निचर विकण्याबद्दल मेसेजेस टाकत होते. टीव्ही, फ्रिज, म्युझिक सिस्टिम, सोफा, टेबल, खुर्च्या असे बरेच सामान दोन दिवसात विकून उत्कर्षची बहीण निघून गेली.

आता उत्कर्ष घरातल्या उरलेल्या एका एका वस्तूची विक्री करत होता. मला त्याच्याकडे उरलेला एक सोफा हवाय का? विचारू लागला. मी नको आहे असे सांगितल्यावर तो म्हणाला - '' ठीक है अंकल, आप पोएटरी लिखते हैं मुझे पता है, मेरे पास बहुत सारे पेपर्स पडे हैं। वह आप रख लीजिए।''

मी नको सांगितलं; पण तो ऐकेना. त्याने मला बळेच दोन कागदाचे गठ्ठे आणून हातात दिले. त्याच्या त्या निरागस आग्रहाला मी नकार देऊ शकलो नाही.

वर तो म्हणत होता, ''अंकल मैंने आपको बहुत तकलीफ दिया, मुझे माफ करो, अब यहाँ से जा रहा हूं, मैं जल्द ही यू एस जानेवाला हूँ, मुझे आपका आशीर्वाद चाहिए।''

उत्कर्ष आमच्या दोघांच्या वारंवार पाया पडत होता. उत्कर्षचे हे रूप मी प्रथमच बघत होतो. त्याच्याबद्दल आता कणव वाटत होती. कुठला कोण उत्कर्ष, अचानक आला काय, दोन-चार रात्री आमची झोप उडवली काय आणि त्याच्याबद्दल तिरस्कार वाटत असतानाच नकळत त्याने हृदयाला हात घातला काय?

एखादा माणूस आपल्या जीवनात येऊन अल्पकाळ वादळ उठवून अचानक आला तसा निघून जाऊ शकतो? जाता जाता पुन्हा कदाचित भेट होणार नाही या जाणीवेणे अचानक कातर झालेला उत्कर्ष, एकदम गंभीर, सगळंच कल्पनेच्या पलीकडचे होते! नकळत माझ्या डोळ्यात पाणी आले.

माझ्या पायावर आशीर्वादासाठी झुकलेल्या उत्कर्षला पाठीवर थाप मारत मी उठवले. ''औक्षवंत हो, यशस्वी हो'' नकळत ओठांवर आशीर्वादाचे शब्द उमटले!

''चलता हूँ.''

जाता जाता हात जोडून उत्कर्ष पटकन निघून गेला.

दुसऱ्या दिवशी बहुतेक पहाटेच उत्कर्ष सोसायटी सोडून निघून गेला होता. मी सकाळी उठल्यावर दरवाजा उघडला... दरवाजासमोर कोऱ्या पेपर्सचे चार-पाच गठ्ठे पडलेले होते!

१३०१, श्री ज्वेल्स, टिळेकर नगर, कोंढवा पुणे ४११०४८.



डॉ. चंद्रशेखर जोशी

cajoshiji@yahoo.co.in

# पत्रकारिता म्हणजे घाईघाईतले साहित्य

**पत्रकारितेनंतर चित्रपट निर्मितीचा अभ्यास करताना कथात्मक चित्रपटांबरोबरच अनुबोधपटांचेही अध्ययन झालं. त्यावेळी एक गोष्ट आवर्जून लक्षात आली ती म्हणजे वस्तुस्थितीवर आधारित असणारा अनुबोधपट वास्तवाचं एक प्रतिभावान प्रतिनिधित्व असतो. अरेच्च्या! हे तर पत्रकारिता करताना आपण करत होतो आणि इतर अनेकांनीही केलेलं पाहत होतो. पत्रकारांना बातम्या लिहिण्यासाठी, वेळेची पूर्तता करण्यासाठी घाई करावी लागते.**

बातम्यांसाठी लेखन प्रक्रिया अत्यंत जलद गतीने होत असल्याने चालू घडामोडींचे त्वरीत वृत्तांकन करण्याची आवश्यकता असते. मात्र तरीही साहित्यिक लेखनाची कला आणि कौशल्य अवगत करून आपल्या वाचकांपर्यंत माहिती प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ते प्रयत्न करत असतात. चर्चेचा भाग म्हणून, साहित्य आणि पत्रकारिता यांच्यातील फरक करताना सांगितले जाते की साहित्य अक्षर असते. साहित्यिक निर्मितीमध्ये काही तरी कायम स्वरूपाचे असते परंतु वृत्तपत्रीय लेखन दुसऱ्या दिवशी शिळे होते. लेखकाला किंवा कवीला आपली कला पूर्ण करण्यासाठी कोणतीही अंतिम मुदत नसते. तो एक कलाकार असतो आणि तो घाईघाईत काम करू शकत नाही. त्याच्या भावना शांततेत आठवल्या जातात. त्याच्या अगदी उलट पत्रकार आहे. त्याच्यासाठी घड्याळाच्या काट्याबरोबर धावणे महत्त्वाचे असते. शिवाय पत्रकारिता आणि साहित्यातील फरक मुख्यतः लक्ष्यित वाचकांच्या स्वरूपामुळे आहे. आपण ज्याप्रमाणे बातम्या वाचतो त्याचप्रमाणे कविता किंवा कथा, कादंबरी वाचत नाही.

वाचकांना गुंतवून ठेवण्यासाठी कथानक, रचना आणि वर्णनात्मक भाषा यासारख्या साहित्यिक तंत्रांचा पत्रकार वापर करतात आणि यातून साहित्याचा एक प्रकार उद्भवतो, साहित्यिक पत्रकारिता. चित्रा सुब्रमण्यम (बोफोर्स घोटाळ्यावर) आणि एस. हुसेन झैदी (१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांवर) यांचे लेखन अनेकदा वृत्तपत्र मालिकेत प्रकाशित केले गेले. या लेखांमध्ये जटिल वास्तव उघड करण्यासाठी तपशीलवार



**पत्रकारितेतील विलक्षण अनुभव**

कथाकथन, पात्र विकास आणि कथानक रचना वापरली जाते, जी सामान्यतः साहित्याशी संबंधित असते, जी प्रत्यक्षात साहित्यिक पत्रकारिता दर्शवते. या व्यतिरिक्त, पत्रकारितेतील साहित्याचे प्रमुख उदाहरण म्हणून सांगता येतील असे काही प्रमुख भारतीय पत्रकारांचे आत्मचरित्र आणि त्यांच्या लेखांचे संग्रह प्रकाशित झाले आहेत. उदाहरणार्थ, विनोद मेहता यांचे लखनऊ बॉय किंवा खुशवंत सिंग यांचे ट्रुथ, लव्ह अँड अ लिटिल मॅलिस सारख्या पुस्तकांमध्ये सुरुवातीला वर्तमानपत्रे आणि मासिकांसाठी 'घाईघाईत' तयार केले गेलेले असे लेखन संकलित केले होते परंतु त्यांचे साहित्यिक मूल्य कायम राहिले. त्वरेने बातमी लिहिण्याचा दबाव कधीकधी चुका करू शकतो परंतु चांगली पत्रकारिता वेळेच्या मर्यादा असूनही साहित्यिक मानके राखण्याचा प्रयत्न करते. म्हणूनच पत्रकारितेच्या अभ्यासक्रमामध्ये शिकलेलं ब्रिटिश कवी आणि समीक्षक मॅथ्यू अर्नोल्ड (१८२२-१८८८) यांचं सुभाषित 'जर्नालिझम इज लिटरेचर इन ए हरी' अर्थात पत्रकारिता म्हणजे घाईघाईतले साहित्य महत्त्वाचं ठरतं.

मानसिक संतुलन बिघडल्यामुळं बेफाम गाडी चालवून अनेकांच्या मृत्युला जबाबदार असलेल्या वाहनचालक संतोष माने याला न्यायालयानं फाशीची शिक्षा सुनावताच 'मानेला फास', अवकाशसंशोधकांनी बुध ग्रहाचे ग्रहपद काढून घेतल्यानंतर 'बुधाचे ग्रह फिरले', एका पावसाळ्यात पंढरपुरात प्रचंड प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यामुळं पेठांतून जाण्यासाठी होड्यांचा वापर करावा लागल्यावर 'पंढरपूरचे व्हेनिस', संजय लीला भन्साळी यांचा बाजीराव मस्तानी (२०१५) चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काही कालावधीतच रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांच्या विवाहाची बातमी देण्यासाठी 'मस्तानी अखेर बाजीरावचीच' या मला अतिशय आवडलेल्या काही हेडलाईन्स, मॅथ्यू अर्नोल्ड यांच्या सुभाषिताची साक्ष आहेत.

क्रिकेट सामन्याच्या वेळी सुद्धा, जिंकणाऱ्या खेळाडूंबद्दल

विजयाचे शिल्पकार तसेच रटाळ खेळ करणाऱ्या संघाबद्दल कंटाळवाण्या खेळांचे राजे असाही उल्लेख करून बातमीचे साहित्यिक मूल्य वाढवलेलं मी वाचलं आहे. त्याचप्रमाणं प्रचंड मर्यादा असूनही २०१८ या वर्षी विम्बल्डन तसेच फिफा सामन्यांचं अतिशय प्रतिभाशाली वृत्तांकन केल्याबद्दल द हिंदू दैनिकाचं कौतुक करण्यात आलं होतं.

महाविद्यालयीन शिक्षणाच्या पहिल्या वर्षानंतर मी अर्थशास्त्र विषयाला हात लावलेला नव्हता. तरीही मी 'इकॉनॉमिक टाइम्स' विकत घेत होतो कारण एकच, त्यांच्या बातम्यांचे मथळे. अगदी उदाहरण द्यायचं झालं तर एका विमान कंपनीची विशिष्ट योजना अपेक्षित वेळेत सुरू होताना दिसेना तेव्हा 'इकॉनॉमिक टाइम्स'ने 'एअर इंडियाची ती योजना अजून जमिनीवरच' असा उड्डाण न करता धावपट्टीवरच राहिलेल्या विमानाशी साधर्म्य दाखवणारा मथळा दिला होता. अशा प्रकारचे मथळे 'इकॉनॉमिक टाइम्स' मध्ये जवळपास रोजच येत असत आणि ते मला खूप सृजनात्मक तसेच मनोरंजक वाटत असत. अशा प्रकारे मथळे द्यायची पद्धत नंतर अनेक वृत्तपत्रांनी अंगिकारली.

इकॉनॉमिक टाइम्सच्या पान क्रमांक दोनवर राजकीय बातम्या छापल्या जात. त्यासाठी पानाच्या वरच्या बाजूला मोठ्या अक्षरांत एक भन्नाट मथळा असे : फॉर द कॅनॉयझर्स ऑफ इंडियन पॉलिटिकल थिएटर अर्थात भारतीय राजकारणमंचाच्या रसिकांसाठी. राजकारणातले छक्के-पंजे, कुरघोड्या, घराणेशाही याबद्दलच्या बातम्या या स्तंभामध्ये खूप रंजक मजकुरात प्रसिद्ध केला जात असत.

'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये येणारी व्यंग्यचित्रे ही खास आर्थिक क्षेत्राशी जवळीक साधणारी असत. मला आठवतं की एका 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी छापलेले व्यंग्यचित्र अफलातून होतं. त्यामध्ये एक मोठ्या पदावरील व्यावसायिक आपल्या सहकाऱ्याला सांगत आहे - दहा वर्षांपूर्वी मी फक्त पन्नास रुपये गुंतवून बॉसच्या मुलीला गुलाबाचं फूल दिलं आणि आज मी पन्नास कोटीची उलाढाल असलेल्या व्यवसायात मुख्य भागीदार आहे. आर्थिक क्षेत्रात अशा पल्ल्याची कल्पक मांडणी फक्त इकॉनॉमिक टाइम्समध्येच होऊ शकली.

दैनिकात छापल्या जाणाऱ्या व्यंग्यचित्रांतून तर असंख्य वेळा सृजनता विखरली जाते. २६/११च्या मुंबई हल्ल्यानंतर त्यामध्ये आपला काहीही हात नाही असं सांगून पाकिस्तानने उलट पुरावा मागितला होता. कसाबला पकडल्यावर ती बातमी तेथील वृत्तपत्रांतूनही प्रकाशित झाली होती. ती पाहून कसाबच्या बापानं 'हा माझा मुलगा असल्या'चं सांगितल्यावर त्यालाही पाकिस्तानने 'काय पुरावा आहे?' असं प्रस्तुत करून व्यंग्यचित्रकार मंजुळ यांनी धमाल केली होती. माझ्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत मॅथ्यू अर्नोल्ड यांचं सुभाषित जणु कोळुन प्यालो होतो. त्यामुळे शक्य आणि बहुतेक ठिकाणी अलंकृत भाषेचा उपयोग अगदी आपसूक झाला. आता वर्ष आठवत नाही पण १९९०चं दशक असावं. तेव्हा पुण्यात कचरा उचलण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची यंत्रे आणली होती. त्याचं नेमकं स्वरुप दाखवण्याकरिता या यंत्रांची मंडई ते मनपा अशी मिरवणूक काढण्यात आली होती. त्यावेळी पुण्यातील पुढारी मंडळी पुढं आणि त्यांच्यामागं कचरा उचलण्याची यंत्रे असं ते मिरवणुकीचं स्वरूप होतं. मी तंतोतंत तसाच उल्लेख बातमीत केला.

वरवर पाहता मिरवणुकीची ही एक दृश्य रचना होती पण आत खोलवर त्यात एक गर्भितार्थ लपला होता आणि तो म्हणजे ही नवीन यंत्रे आपल्यापुढं चालत राहिलेला कचरा उचलण्यासाठी सज्ज होती. ही बातमी मी मिड डे साठी लिहिली होती. त्यावेळी माझे मित्र मायकल गोंसाल्विस संपादकपदी होते. ते म्हणाले, ''यावर विरोधी प्रतिक्रिया येतील.''

''आल्याच तर मी त्या झेलीन!'' मी उत्तरलो. प्रस्तुत बातमी मिडडेने जशीच्या तशी छापली पण प्रतिक्रिया द्यायला या त्या पुढाऱ्यांना तितकं इंग्रजी समजलं असतं तर ना?

विजय कोंडके निर्मित-दिग्दर्शित 'माहेरची साडी' जुलै १९९३ प्रदर्शित झाला आणि त्या रात्रीच्या पार्टीमध्ये आम्ही पत्रकारांनी दादा कोंडके यांना एक गंमतशीर प्रश्न विचारला की ''पुतण्याने माहेरची साडी केली आता तुम्ही काय करणार आहात?'' दादा खूपच हजरजबाबी. त्यांनी तात्काळ उत्तर दिलं, ''सासरचं धोतर!'' आणि काही महिन्यांतच दादांनी आपला पुढचा चित्रपट खरंच याच शीर्षकाचा जाहीर केला. सासरचं धोतरचं छायाचित्रण कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओच्या आवारात करण्यात आले. त्यासाठी पत्रकारांना निमंत्रित करण्यात आलं होतं. जयप्रभा स्टुडिओत कलावंत आणि तंत्रज्ञ यांच्या लगबगीनं रसरशीत वातावरण निर्माण झालं होतं. याचं वर्णन मी या शब्दांत केलं : ''दादांच्या रुपातील ६१ वर्षांचा नायक पाहून ६६ वर्षांचा जयप्रभा स्टुडिओ शहारून गेला होता!''

मराठी अभिनेते सूर्यकांत यांच्या 'धाकटी पाती' आत्मचरित्राला महाराष्ट्र सरकारचा एक पुरस्कार मिळाला होता. अभिनय क्षेत्रात काम करीत होते तरी सूर्यकांत यांनी आपल्या पुस्तकात वापरलेली अलंकारिक भाषा, प्रतिमा, उपमा तसेच वाक्प्रचार, म्हणी यामुळे 'धाकटी पाती'तील अर्थालंकार अत्युच्च दर्जाचं झाले होते. सूर्यकांत यांना भेटून मग या आत्मचरित्रावरील लेखाला मी शीर्षक दिलं : साहित्यिक सूर्यकांत. प्रस्तुत लेखासहित शीर्षकालाही चांगली पसंती मिळाली.

**साधारण एक–दोन वर्षे मी आणि बायको (वंदना) काही दिवस रोज एकाच विषयावर नियमितपणे चर्चा करायचो, की आपण आपलं धनकवडी येथील राहतं घर नव्हे वास्तू (गुरुसदन) विकून सहकारनगर भागात २ किंवा ३ बेडरूमचा फ्लॅट घेऊ! त्याला कारणही तसेच होते. पूर्वाचे मंदारबरोबर लग्न होऊन ती तिच्या घरी बिबवेवाडीला राहायला गेली होती.**

# अधोगती की प्रगती?

## एक अनोखा प्रवास




**रवींद्र कामठे**

पुणे

९४२१२ १८५२८


अंदाजे ३०–३५ वर्षे फक्त आमच्या शेजारी राहणारी नव्हे तर आमची जिवाभावाची जोगळेकर आणि पटवर्धन ही दोन कुटुंबे तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर नंबर २ येथे वर्ष झाले राहायला गेले होते. तेव्हापासून मी बायकोच्या पाठीमागे नुसता धोषाच लावला होता की आपणही जाऊ सहकारनगर येथे राहायला! आम्हाला धनकवडी येथे अजिबात करमत नव्हते. बंगल्यांची सोसायटी असल्यामुळे गरज पडेल तेव्हा संवाद होत होता पण तोही थोडा विरळच. विरंगुळा म्हणून तळजाईला रोज चालायला जाणे मात्र चालूच होते. अधुनमधून बावधनला 'चपराक'च्या कार्यालयात जाणे होत असे परंतु धनकवडीहून हे अंतर फार असल्यामुळे माझे जाणे तसे अगदीच कमी झाले होते.

त्यात आताशा आम्हाला खूप एकटे पडल्याची भावना मनात सारखी दाटून येत होती. आम्हा दोघांची नुकतीच साठी उलटून गेल्यामुळे व माझ्या तब्येतीच्या तक्रारींमुळे मला फारशी दगदग होत नव्हती. त्यात धनकवडीत वाहतुकीचा बोजवारा उडाल्यामुळे बाहेर कुठेही जाण्यासाठी फारच दमछाक होत होती.

आमची अडचण एकच होती, की आम्ही दोघेही स्वेच्छानिवृत्ती घेऊन घरी बसलो होतो व जमेल तसे आपापले छंद, आवडी निवडी जपत होतो. त्यात मला तर मुळात काहीच अर्थार्जन नव्हते. एलआयसीची जेमतेम दरमहा रुपये ३२००/– पेन्शन होती. वंदनाला दरमहा आमचे दोघांचे भागेल अशी पेन्शन मिळत होती. मुळात स्वेच्छानिवृत्ती घेतल्यापासून आम्ही आमच्या गरजा इतक्या कमी केल्या होत्या की आम्हाला महिन्याला १५ ते २० हजार रुपये, अगदी औषधांच्या खर्चासहित व्यवस्थित पुरत होते.

या पार्श्वभूमीवर इच्छा असूनही सहकारनगर येथे नवीन फ्लॅट घेण्याच्या दृष्टीने आमचे आर्थिक गणित अगदीच तुटपुंजे होते. नव्हे कुठल्याही विचाराने ते आमच्या आवाक्याच्या बाहेरचे होते. मला तर ते स्वप्नवतच वाटत होते परंतु माझ्या डोक्यातील नवीन फ्लॅटचे खूळ काही केल्या जात नव्हते. त्याला कारणेही तशीच वैयक्तिक, वैद्यकीय, भावनिक, व्यावहारिक, सामाजिक आणि प्रायोगिक होती. ते म्हणतात ना, तुमची इच्छा प्रबळ असेल तर मार्ग आपोआपच निघतात. त्यासाठी नुसते नशिबावर अवलंबून राहून चालत नाही हेही तितकेच खरे आहे! प्रयत्ने वाळूचे कण रगडीता, तेलही गळे, ही प्रचलित म्हण आमच्या बाबतीत अगदी तंतोतंत लागू पडली.

मुळात आमचे राहते घर नव्हे तर आमची अत्यंत लाडकी वास्तू म्हणजे आमचे 'गुरुसदन'. माझे सासू–सासरे (वंदनाचे आई वडील) यांनी स्वकष्टाने आणि जिकीरीने अतिशय कठीण परिस्थितीवर मात करून बांधले होते. त्यांच्या वयाच्या साठीत त्यांनी, स्वाती सोसायटीमधील २ गुंठ्याचा प्लॉट १९७२ साली ९९९ वर्षाच्या भाडेकरारपट्ट्याने घेतला होता. त्यावर ढोरमेहनतीने चार खोल्यांचे अतिशय टुमदार असे घर बांधले होते. त्याच्या आजूबाजूला सुंदरशी बाग फुलवली होती. १९७८ साली त्यांच्या आयुष्याचे हे स्वप्न पूर्ण झाले. त्यामध्ये त्यांची एकुलती एक मुलगी वंदनासोबत गुरुसदनात ते राहायला आले. त्यानंतर माझे आणि वंदनाचे १९८७ साली लग्न झाले. काळाची गरज आणि आमच्यावरील जबाबदारीच्या जाणिवेने आम्ही 'गुरुसदन' मध्येच आमचा संसार थाटला होता. (यामागेही फार मोठा इतिहास आहे, जो या लेखाचा विषय नाही म्हणून लिहित नाही.)

आमच्या सुखी संसारात आमच्या कन्यारत्नाचे आगमन झाले आणि आमचे विश्वच बदलून गेले. पूर्वागमनामुळे हळूहळू आमची आर्थिक परिस्थिती सुधारत गेली. आम्ही जसे जमेल तसे गुरुसदनचा कायापालट करत गेलो. अगदी एकदा सोडून दोनदा गुरुसदनची वास्तुशांत केली होती. सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळींचे आदरतिथ्य गुरुसदनने केले आहे. आमच्या इतकीच




गुरुसदन ही सर्वांच्या जिव्हाळ्याची वास्तू होती, हे मात्र तिचे खास वैशिष्ट्य होते. कधीही कोणाला गुरूसदनने परके मानले नाही. इतका तिच्यात सकारात्मकतेचा, आपलेपणाचा व जिव्हाळ्याचा भाव होता. येणाऱ्या प्रत्येकाला गुरूसदनमध्ये पाऊल ठेवले की एक प्रकारची सात्त्विक ऊर्जा जाणवायची. म्हणूनच तर ते आमचे सर्वांचे गुरुसदन होते.

गुरुसदनच्या कणाकणात, क्षणाक्षणात, वातावरणात, झाडांच्या पानांत, पक्ष्यांच्या किलबिलाटात, फन्टूश ह्या आमच्या श्वानाच्या आठवणीत, अनेक मांजराचे हक्काच्या असलेल्या घरात, अनंत स्मृती जतन करून ठेवलेल्या आहेत की काही विचारू नका! खूप साऱ्या अविस्मरणीय अशा क्षणांची सोनेरी खाण म्हणजे आमचे गुरुसदन. नियतीने जिव्हारी लागणारे घाव घालून, काळाच्या खलबत्त्यात कुटून सुद्धा, त्यातून तावून सुलाखून अलगद बाहेर काढलेलेही खूप प्रसंग आमच्या ह्या गुरुसदनने आणि आम्ही अनुभवले आहेत. गुरुसदनचे आणि आमचे काय, कसे, किती घट्ट ऋणानुबंध असतील ह्याचा विचारच न केलेला बरा! भावनांचा बांध फुटला तर प्रलय निश्चित आहे, त्यामुळेच त्याला आवरही घालावा लागतो, हे तुम्ही समजू शकता.

इतका वेळ मी गुरुसदनविषयी भूतकाळात बोलतो आहे, त्याचे कारणही तसेच आहे. अतिशय जड अंत:करणाने सांगावे लागते आहे की, तुळशीबागवाले कॉलनी सहकारनगर नंबर २ येथील नवीन फ्लॅट घेण्यासाठीचे आर्थिक पाठबळ आमच्याकडे नसल्यामुळे व काळाची गरज म्हणून सरतेशेवटी आम्हाला आमची लाडकी आणि अतिशय प्रिय अशी ही वास्तू गुरूसदन विकावी लागली व त्या अर्थाजनातून नवीन फ्लॅट विकत घ्यावा लागला.

आमच्यासाठी हा अतिशय कठीण व जोखमीचा निर्णय होता. माझ्यासाठी तर होताच होता परंतु वंदनासाठीही, जिच्या आईबाबांची ही वास्तूच एकमेव आठवण होती. तिने अक्षरशः काळजावर दगड ठेऊन 'गुरुसदन' विकण्याचा निर्णय घेऊन मला नवीन फ्लॅट घेण्यासाठीची अनमोल अशी मदत केली आहे. आम्ही दोघांनी अहोरात्र कष्ट करून आमची ही वास्तू जतन केली होती, तिच्यात आमच्या गरजेनुसार कायापालट केला होता. अर्थात, आमच्या वृद्धापकाळात लागणाऱ्या सर्व सुखसोयी सुद्धा करून घेतल्या होत्या परंतु एकाकीपणा, नसलेला शेजार, वृद्धापकाळाची लागलेली चाहूल आणि त्यानंतर येऊ घातलेल्या समस्या, इच्छा असूनही विरळ होत चाललेले आधाराचे हात आणि भविष्यात आमचे शरीर थकल्यानंतर न घेता येणाऱ्या घराच्या जपणुकीच्या व देखभालीच्या काळजीपोटी आम्हाला दिवसेंदिवस चिंताजनक वाटू लागली होती.

अर्थात ह्या निर्णयास येण्या अगोदरही पूर्वा, मंदार आणि मंदारच्या आईशी सविस्तर चर्चा करून विचारांचे आदानप्रदान करत होतो. भविष्यात येणाऱ्या परिस्थितीचे आकलन करत होतो. त्यावर तोडगा कसा आणि काय काढायचा ह्यावर बराच खल आम्ही सर्व जण जवळजवळ एक दीड वर्ष करत होतो.

आमच्यासाठी गुरुसदन विकून नवीन फ्लॅट घेणे म्हणजे आपल्या स्वार्थासाठी पोटच्या पोराला पाण्यात पायाखाली टाकून स्वतःचा जीव वाचवल्यागत वाटत होते. (इथे मला माकडिणीची कथा आठवत होती). असो.

आम्हालाही पूर्वा हेच एकमेव अपत्य. आमची जी काही मिळकत आहे तिच्यावर तिचाच अधिकार आहे. तो सुद्धा आम्हाला आमच्या हयातीत तिला सुपूर्त करायचा होता. आमची तशी एक प्रांजळ भावना होती. इथे आमचा नटसम्राट तर होणार नाही याची खातरी केलेली होती कारण आमची पोरं खूपच सद्गुणी आहेत हे मात्र नक्की. आमच्या सदसद्विवेक बुद्धिचा आणि भावनांचा योग्य आदर करूनच जो काही असेल तो निर्णय घ्यायचा असे ठरवले होते. ह्यासाठी माझी बायको वंदना हिचा मला फार हेवा वाटतो. तिने गेले ३७ वर्षे माझ्यावर डोळे झाकून विश्वास ठेवला आहे आणि तो ह्या निर्णयातही कायम होता हे विशेष आहे.

आम्ही सर्व बाबींची पडताळणी करून पाहत होतो. काही मित्रमंडळी आणि नातेवाईकांशी चर्चा करत होतो. पहिल्यांदा आम्हाला संमिश्र प्रतिक्रिया येत होत्या. इतके सुंदर बैठे घर अथवा बंगला विकून फ्लॅट घेणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे, इतपत आमच्यावर शेरेबाजी केली गेली होती. अर्थात ती आमच्यावरील प्रेमापोटी होती असे समजून आम्ही पुढे जात होतो. त्यातही मी काही जवळच्या लोकांशी घर घेण्याबाबत विचारणा करत होतो परंतु बऱ्याच लोकांचे आर्थिक गणित जमून येत नव्हते.

त्यात पूर्वा आणि मंदारने भविष्यात 'गुरूसदन'ची काळजी घेण्यास असमर्थता व्यक्त केली होती. त्यामागे त्यांची कारणेही अगदी योग्यच होती. मुळात आपली भावनिक मोलाची वास्तू जरी असली तरी तिचे भौगोलिक स्थान त्यांच्यासाठी फारच अयोग्य होते आणि भविष्यात ते ह्या वास्तूचा कितपत वापर करू शकतील अशी शंका व्यक्त करत होते. उत्पन्नाचे साधन म्हणून जरी पाहिले तरी त्यांच्या दृष्टीने ते फारच जिकीरीचे आणि जोखीमीचे होते व त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने ते बरोबरही होते.

हे सर्व एकाबाजूला चालू असताना पूर्वा आणि मंदारने सहकारनगर येथे ३ बेडरूमचा फ्लॅट बुक करून ठेवला होता, जो साधारण २ वर्षांनी ताब्यात येणार होता. त्यामागे त्यांचे आर्थिक नियोजन होते व ते अगदी योग्यही होते परंतु नंतर तेही नियोजन थोडेसे बदलले गेले. तसे पाहिले तर राहता बंगला विकून फ्लॅटमध्ये राहायला जाणे म्हणजे प्रगतीकडून अधोगतीकडे जाण्यासारखे होते. अर्थात प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टिकोन हा वेगळा असतो. अर्धा रिकामा ग्लास, त्याच्याकडे बघताना काही लोक अर्धा भरलेला आहे म्हणतात तर काही अर्धा रिकामा असे म्हणतात. असो.

सकारात्मक दृष्टीने पाहिले तर या जगात अशक्य असे काहीच नाही त्यामुळेच आमच्या इच्छाशक्तिमुळेच आम्ही हा अतिशय अवघड, जिकीरीचा, जोखमीचा व तितकाच संवेदनशील आणि भावनेने ओथंबून वाहणाऱ्या विचारांचा ताळमेळ घालून आमच्या मनाला पटणारा निर्णय घेतला होता. संवेदनशील माणसाच्या आयुष्यामध्ये जेव्हा निर्णय घ्यायची वेळ येते आणि तेव्हा तो खरोखरच न डगमगता निर्णय घेत असेल तर त्याच्यामागे नियती, त्याचे नशीब आणि परिवार अथवा कुटुंब नक्कीच उभे राहते हे आमच्या या अनुभवाने सिद्ध होते. मध्यंतरी मंदार आणि पूर्वाच्या संसारात थोडा कठीण काळ दारावर येऊन ठेपला होता. पोरांची सत्त्वपरीक्षाच पाहण्याचे नियतीने ठरवले होते. त्यांच्या आयुष्यात जी काही स्थित्यंतरे येत होती, ती पाहून आमचे मन थोडे विषण्ण होत होते. आमच्याही आयुष्यावर ज्याचा कितीही नाही म्हटले तरी परिणाम होत होता. शेवटी लग्न म्हणजे दोन परिवार एकत्र येऊन आपली सुख-दु:खे एकमेकांशी वाटत असतात. तसेच काहीसे आमच्याही बाबतीत घडत होते. आमच्या एकुलत्या एक मुलीच्या सांसारिक आयुष्यातील हा अजून एक अवघड टप्पा ती पार करताना आमच्याही जिवाची घालमेल होत होती. एकमेकांपासून दूर राहून काहीच करता येत नव्हते आणि तसे करणे शारीरिकदृष्टीने मनात असूनही शक्य होत नव्हते. आज त्यांना आधाराची गरज आहे, उद्या आपल्याला त्यांच्या आधाराची गरज भासणार आहे हे प्रकर्षाने जाणवत होते. नियती वयपरत्वे आता आमच्यातील सहनशक्तिचा अंत पाहत होती असे म्हणालो तर अतिशयोक्ती होणार नाही.

ह्या सर्व कठीण परिस्थितीत एक जमेची बाजू म्हणजे, पूर्वा आणि मंदारचे एकमेकांवरील प्रेम, विश्वास आणि त्यांची अनुभवातून आलेली परिपक्वता हे होय. नियतीच्या इतक्या निष्ठुर परिस्थितीतही ही पोरं एकमेकांच्या साथीत मजबूतपणे उभी होती आणि तीच त्यांच्या सुखी संसाराची कधीही न हलणारी एकदम मजबूत अशी पायाभरणी होती असे मला अगदी प्रामाणिकपणे जाणवले.

मंडळी, थोडे विषयांतर झाले असे तुम्हाला वाटले असेल परंतु तसे काही नाही. भावनांच्या ह्या विश्वाला अनंत कंगोरे असतात आणि हेच ते कंगोरे एक एक करून उलगडत जायचे असते, त्यालाच तर आपण आयुष्य म्हणतो. 'दुःख सांगितल्याने कमी होते आणि सुख वाटल्याने वाढते', असे म्हणतात म्हणूनच हा सगळा खटाटोप आहे. दुसऱ्याच्या अनुभवावरून आपण काही तरी घ्यायचे आणि त्यातून शिकायचे व आपले आयुष्य समृद्ध करायचे ह्यातच खरी गमंत आहे. म्हणूनच तर हा लेखप्रपंच!

तर त्याचे असे झाले, की सरते शेवटी सर्व बाबींचा उहापोह करून, जर-तरचा विचार करून, चांगल्या-वाईटाची चर्चा करून, हवे-नको त्याची सांगड घालून, भूतकाळाच्या अनुभवातून घडवलेल्या वर्तमानाचा विचार करत करत, भविष्याची तजवीज म्हणून केलेल्या चुकांची उजळणी करत, आपल्यातील दुर्गुणांचा अभ्यास करून, गुणांचा लेखाजोखा समोर ठेवत, आपल्यामधील कमकुवत बाजूंचा अथवा उणीवांचा आढावा घेत, कुटुंबातील सदस्यांच्या प्राबल्याचा विचार करत करत, तुझे नको, माझे नको असे म्हणत सर्व अहंकार आणि अतिविश्वासावर मात करत, स्वत:मधील सामर्थ्याचा व कौटुंबिक एकजुटीचा जो काही निर्णय होईल तो घ्यायचे ठरवले आणि तो जो काही येईल त्याची सर्वार्थाने अंमलबजावणी करायची हे नक्की करून आम्ही आमचे 'गुरुसदन' विकून आमच्यासाठी सहकारनगर येथे २ बेडरूम फ्लॅट घ्यायचे ठरवले.

तसेच पूर्वा आणि मंदारनेही ३ बेडरूम फ्लॅटचा हट्ट बाजूला ठेवून त्यांनीही २ बेडरूमचा फ्लॅट घेण्याचे निश्चित केले. अर्थात ह्याला एकच अतिशय महत्त्वाची बाजू आम्ही विचार केली होती, ती म्हणजे शक्यतो हे दोन्ही फ्लॅट शेजारी शेजारी हवेत. म्हणजे

भविष्यात आमच्या पोरांना मोठ्या घराची गरज भासली तर दोन्ही फ्लॅट एकत्र करता येऊ शकतील आणि आमच्या दोन्ही परिवारांना एकमेकांचा आधारही मिळेल. एकमेकांसाठीचा आधार हीच तर ह्या सर्व निर्णय प्रक्रियेतील जमेची आणि उजवी बाजू होती असे म्हणालो तर वावगे ठरणार नाही. तसेच भविष्यात गरज पडली तर एक फ्लॅट भाड्याने देऊन त्यातून उत्पन्नाचे एक साधन म्हणूनही विचार करून ठेवला होता. पोरांच्या माहिती तंत्रज्ञान व्यवस्थेमधील नोकऱ्या असल्यामुळे अगदीच नाईलाज झाला तरचा हा उपाय योजला होता. वेळ काही सांगून येत नसते. त्यानुसार भविष्याची थोडी तजवीज केलेली केव्हाही बरी, हा मी माझ्या अभ्यासातून आणि अनुभवातून आलेला विचार प्रत्यक्षात आणला होता, एवढेच काय ते त्याचे महत्त्व.

एक सांगतो, नियती काही एवढीही वाईट नसते. आमच्या मनात गेले दीड-दोन वर्षे चाललेले द्वंद्व तिने पाहिले होते आणि तिनेच त्यावर उपाय शोधून ठेवलेला होता, फक्त तो आमच्यापर्यंत तिने तो पोहोचवला नव्हता म्हणा किंवा ती आमची सत्त्वपरीक्षा पाहत होती असे मला वाटते. मुलांच्या आयुष्याच्या दृष्टीने त्यांचा निर्णय अगदी योग्य होता परंतु आमच्या वयाचा विचार करता, निवृत्तीनंतर म्हणजे साठीनंतरच्या आयुष्यात पुन्हा परत एकदा सगळ्याच बाबतीत आम्हाला नव्याने सुरुवात करायला भाग पाडणारी ही सगळी प्रक्रिया होती. अगदी आधार कार्ड, पॅनकार्ड, बँकांचे व्यवहार, ड्रायव्हिंग लायसेन्स, गाडीच्या कागदपत्रांवरील, पासपोर्टवरील पत्ते इत्यादी, इत्यादी. ह्याचा नंतर शांतपणे विचार केल्यावर आपल्याला हे सगळे झेपेल का? आणि जमेल का? असे काही क्षण वाटले पण एकदा निर्णय घेतला की तो परत फिरवायचा नाही असा निर्धार केल्यामुळे गुरुसदनचा विरह सहन करावा लागला. तत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी गुरुसदनचा त्याग करणे आमच्यासाठी खूप गरजेचे होते आणि ह्या प्रक्रियेमध्ये आपण निर्जीव समजत असलेल्या दगड, वाळू, सिमेंटच्या वास्तूनेही, सजीव होऊन आमच्या संकल्पास फार अनमोल अशी साथ दिली आहे, हे विसरलो तर ती कृतघ्नता होईल. आमच्या आयुष्यातील गुरुसदनचे भावनिक स्थान कदापि ढळणार नाही हे निश्चित आहे.

वर म्हटल्याप्रमाणे नियतीने साथ दिली आणि बहीण अश्विनीच्या ओळखीने आम्हाला सहकारनगरमध्ये नुकतेच बांधून तयार असलेले पाचव्या मजल्यावरील शेजारी शेजारी असलेले २ बेडरूमचे २ फ्लॅट बघायला मिळाले. नियतीने हे फ्लॅट आमच्यासाठीच तयार ठेवले होते की काय असे वाटले. अजिबात वेळ न दवडता आणि आधी केलेल्या सर्व चर्चा चर्वितचर्वणाचा परिपाक म्हणून एका रात्रीत आम्ही हे दोन्ही फ्लॅट विकत घेण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्याच दिवशी आम्ही विकसकाच्या कार्यालयात जाऊन आगाऊ रक्कम भरूनही आलो हे विशेष नमूद करतो आहे. विकसकाने आम्हाला उरलेले पैसे भरण्यासाठी फक्त ६० दिवसांची मुदत दिली होती, जी मला प्रथमतः फारच मुश्किल वाटली होती परंतु जीव तोडून प्रयत्न केला तर साध्य करणे अवघडही वाटत नव्हते. इथे माझ्या आत्मविश्वासाचा आणि आयुष्यातील चांगल्या-वाईट अनुभवाचा कस लागणार होता. जो की मला तारणार तरी होता किंवा मारणार तरी होता. आयुष्याचा फार मोठा जुगार मी खेळतो आहे, ज्यात मला जिंकण्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय नव्हता, हे इथे खास नमूद करावेसे वाटते. अशा वेळेस आपल्या श्रद्धास्थानास आठवावे, त्यापुढे नतमस्तक व्हावे. म्हणजे आपले सर्व प्रश्न चुटकीसरशी सुटतात हे नक्की. हो पण त्यासाठी आपण इमानदार असायला हवे बरं का!

ह्या भावनेच्या खेळात माझी अवस्था चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यूसारखी झाली होती पण माझ्या मागे माझ्या पूर्वजांची पुण्याई, माझी नीतिमत्ता, सचोटी, प्रामाणिकता, कुटुंबाप्रतीची आस्था, प्रेम, गुरुसदनवरची निष्ठा आणि शंकर महाराज व स्वामी समर्थांचे आशीर्वाद होते, जे मला यशस्वी करण्यासाठी सज्ज होते व तसे त्यांनी केलेही. पूर्वा आणि मंदारसाठी कर्जाचा पर्याय उपलब्ध होता, त्यामुळे त्यांना त्यांच्या फ्लॅटसाठीचे पैसे उभे करण्यास फारशी अडचण नव्हती. प्रश्न माझा आणि वंदनाचा होता. आता आमच्यासमोर गुरुसदन विकण्याशिवाय पर्यायच नव्हता आणि जो आम्ही फ्लॅट बुक करतानाच मनाशी पक्का विचार करून नंतरच आगाऊ रक्कम देऊन आलो होतो. तरीही आमच्या फ्लॅटची रक्कम खूपच मोठी होती. आयुष्याची सर्व कमाई आणि गुरुसदन विकून येणारी रक्कम एकत्र करून हे सगळे कसेबसे जमवायचे होते, ते कळत नव्हते. हीच तर खरी आमच्यासाठी तारेवरची कसरत होती. अगदी प्रांजळपणे सांगतो, सहकारनगरमध्ये फ्लॅट घेण्याचे स्वप्न पाहणारा मी जेव्हा विकसकाच्या कार्यालयात बसलो होतो आणि फ्लॅटच्या किमतीवरून चर्चा करत होतो तेव्हा थोडा हबकलोच होतो. फ्लॅटची किंमत ऐकून थोडा वेळ डगमगायला झाले पण मनाशी एक खूणगाठ बांधली होती की आता काही झाले तरी मागे हटायचे नाही. जे होईल ते पाहू. सरतेशेवटी शंकर महाराज आणि स्वामी समर्थ आहेतच की आपल्या पाठीशी! आणि खरंच महाराज आमच्या सदैव पाठीशी उभे होते ते पदोपदी जाणवत होते.

सर्वसाधारणपणे दोन बेडरूमचे दोन फ्लॅट सहकारनगरमध्ये आणि गुरुसदनची विक्री असे एकूण तीन व्यवहार केवळ ६० दिवसांत पार पाडायचे शिवधनुष्य आम्ही चौघांनी उचलले होते व ते अगदी आलेल्या सर्व अडचणींवर (त्याची यादी खूप मोठी आहे, त्यावर वेगळा लेख होईल) लीलया मात करून पेलवले होते हेही तितकेच खरे आहे. मंडळी, विकसकाला आगाऊ रक्कम देऊन आल्यावर, गुरुसदनच्या विक्रीसाठी मित्र मंडळी, नातेवाईक वगैरेंशी

चर्चा करताना एक जाणवले की गुरुसदनचा व्यवहार फारच मोठा होता आणि तो मला अपेक्षित असलेल्या किमतीत तसेच एका रक्कमेत पूर्ण करणाऱ्या गृहस्थाची (गिऱ्हाईक नाही म्हणणार) अथवा कुटुंबाची गरज होती. माझी तीच तर एकमेव अट होती. तसे मी स्वाती सोसायटीच्या चेअरमन यास सांगून ठेवले होते. सोसायटीमधील दोन प्रथितयश सदस्यांशी सल्लामसलतही केलेली होती. काही बाबतीत आपल्याला जर फारसे ज्ञान व अनुभवही नसेल तर योग्य व्यक्तिचे मार्गदर्शन व सल्ला घेतलेला बरा, हे न सांगितलेले बरे! त्यांच्या सल्ल्याचा मला पुढे खूपच चांगला फायदा झाला हे मात्र नक्की. गुरुसदन विकण्याच्या दृष्टीने माझी हालचाल सुरु झाली.  काही इस्टेट एजन्टपर्यंत ही बातमी गेली आणि रोज ३ ते ४ मंडळी घर बघायला येत होती. हा प्रवास जवळजवळ पुढील ४०-४५ दिवस न थकता चालू होता. माझ्या आयुष्यातील एवढ्या मोठ्या व्यवहाराची ही पहिलीच वेळ होती, जशी पहिल्या बाळंतपणात बाईची घाबरगुंडी उडते अगदी तशीच माझी गाळण उडाली होती. इतके विचित्र लोक घर पाहायला येत होते की काही विचारू नका. मी जर पु. ल. देशपांडे असतो तर त्यावर दोन तीन तरी कथा केल्या असत्या आणि पंधरा वीस व्यक्तिचित्रणे लिहिली असती.

एक तर आमचे गुरुसदन हे दोन मजली होते. त्यात घरात इतक्या सोयीसुविधा करून घेतल्या होत्या की त्या प्रत्येक वेळेस आलेल्या प्रत्येक गिऱ्हाईकास (इथे गिऱ्हाईक हाच शब्द योग्य आहे म्हणून वापरला आहे) पटवून देता देता माझी पुरती वाट लागत होती. घशाला कोरड पडत होती आणि जिने चढउतार करून पायाचे तुकडे पडत होते. त्यात रोज भावनांचा अक्षरशः चुराडा होत होता. येणारी गिऱ्हाईके एक बंगला म्हणून बघत होती आणि त्यांच्या कुवतीने त्याची किंमत करत होती. त्यात त्यांचे काहीच चुकत नव्हते पण हे सर्व हाताळताना माझ्या मात्र पोटात गोळाच यायचा. दरवेळेस मन खंबीर करून आलेल्या लोकांना आम्ही दोघे सामोरे कसे जात होतो, ते आमचे आम्हालाच माहीत.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्हाला आश्चर्य वाटेल की आम्ही सर्व फर्निचर सहीत गुरुसदन विकले आहे कारण माझ्यासमोर दुसरा पर्यायच नव्हता. साधारण ४ बेडरूमचे हे घर, त्यात भिंतीमधील कपाटे, ६ फुटांचे लाकडी बेड अगदी गादीसहित, जे फ्लॅटमध्ये मावणे शक्यच नव्हते आणि त्याला सामान ठेवायची सोय नसल्यामुळे ते तिथेच सोडून देणे मला योग्य वाटले. तसेच गुरुसदनला चांगली किंमत यावी ह्या उद्देशाने मी अक्वॉगार्ड, गॅसवरील चिमणी, पंखे, किचनमधील कपाटे इत्यादी हे सर्व त्या किमतीत वर्ग करत होतो. जेणेकरून मला सहकारनगरमधील फ्लॅट घेताना कुठलीही अडचण येऊ नये हा त्यामागील उद्देश होता हो.

माझ्या उभ्या आयुष्यात मी खूप मार्केटिंग केले होते परंतु स्वतःचे घर विकताना कराव्या लागलेल्या मार्केटिंगने माझ्या तोंडाला अक्षरशः फेस आणला होता. एवढी मेहनत करून जवळ जवळ ४० दिवस सकारात्मक असे काही घडतच नव्हते.  एजंटांचा नुसता सुळसुळाट होता. व्यवहाराची रक्कम मोठी असल्यामुळे त्यांचे अथक प्रयत्न माझा जीव मात्र मेटाकुटीला आणत होते. त्यात त्यांना दोष देण्यास काहीच अर्थ नव्हता. कारण घर योग्य किमतीस, लवकरात लवकर, योग्य कुटुंबास, विकणे ही माझी गरज जास्त महत्त्वाची होती.

जी काही माणसे अथवा कुटुंबे घर पाहायला येत होते, त्यांचा आम्हाला पहिला प्रश्न असायचा की, 'तुम्ही एवढा चांगला आणि सुस्थितीतील बंगला कशासाठी विकता आहात?''  त्यांच्या ह्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे हेच कळत नव्हते. ''हे घर विकून आम्हाला सहकारनगर येथे २ बेडरूमचा फ्लॅट घ्यायचा आहे'' असे सांगितल्यावर तर काही जणांनी आम्हाला वेड्यातच काढले होते. अर्थात त्यात त्यांची काहीच चूक नव्हती. ते त्यांच्या जागी अगदी योग्य होते व आमच्याच बाजूने प्रांजळपणे विचार करत होते परंतु जेव्हा त्यांना नाण्याची दुसरी बाजू कळली, जी की आम्ही आणि आमची मुलगी दोघेही शेजारी शेजारी फ्लॅट घेणार आहोत म्हणून आम्ही हा बंगला विकून आमच्यासाठी एक फ्लॅट घेत आहोत व मुलगी आणि जावई कर्ज काढून त्यांच्यासाठी शेजारचा फ्लॅट घेणार आहेत! तेव्हा कुठे लोकांचा आमच्यावर विश्वास बसू लागला. तरी ह्या व्यवहारात येणारी सर्वात मोठी अडचण म्हणजे, मी सांगितलेल्या किमतीला फारसे कोणी तयार होईनात. जवळ जवळ १५ एक जणांनी घर पाहूनही व्यवहार काही होत नव्हता. पुढे जाणारा एक एक दिवस माझ्यासाठी हिमालयासारखा भासत होता कारण विकसकाने मला दोनच महिन्यांचा अवधी दिला होता. त्यातले ४० दिवस तर असेच काहीच न घडता फुकटात गेले होते. माझा तर संयम सुटत चालला होता. एक वेळ अशी आली होती की मी पोरांना सांगितले की, ''तुम्ही तुमच्या फ्लॅटचा व्यवहार करून घ्या. आमचे आपण नंतर बघू. नाहीच जमले तर पुढे मागे जवळपास दुसऱ्या एखाद्या नवीन प्रकल्पात घेऊ आम्ही फ्लॅट.'' हे बोलताना माझ्या काळजाला किती वेदना होत होत्या ते माझे मलाच माहीत. शब्द देऊन तो फिरवणारा हा शिवरायांचा मावळा नव्हे, असे मी सतत स्वत:ला समजावत होतो आणि आम्ही दोघे नवरा बायको येऊ घातलेल्या चांगल्या दिवसाची वाट पाहत होतो.

आमच्या जिवाची घालमेल, तळमळ, कळकळ आणि तगमग शंकर महाराज आणि स्वामी समर्थ देव्हाऱ्यातून पाहत होते आणि गालातल्या गालात हसत मनातल्या मनात म्हणत होते, कशी जिरवली एका माणसाची!  महाराज आमच्या ठाम निर्णयाची व त्या निर्णयामागील प्रामाणिक आणि निरागस भावनेची सत्त्वपरीक्षाच पाहत होते असे मला नंतर जाणवले. आमचे गुरुसदन

ह्या वास्तुवरील प्रेम नक्कीच निर्मळ व प्रांजळ होते व त्या वास्तूच्या आदरापोटीच आम्ही तिची पुढे आबाळ होऊ नये म्हणूनच योग्य व्यक्तिला सुपुर्द करून फार मोठ्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करत होतो. हे त्यांना जाणवले व त्यानंतर त्यांनी आमच्या व्यवहारात येणारे सर्व अडथळे यथातथा दूर करून योग्य कुटुंबास आमच्या चेअरमनकरवी आमच्याकडे पाठवले.

मंडळी तुम्हाला आश्चर्य वाटेल आणि मी म्हणतो त्यावर विश्वासही बसेल. जोवर नियतीच्या मनात नसेल तर काहीच घडत नाही. तुमची श्रद्धा जर का स्वामींवर असेल आणि शंकर महाराजांवर असेल तर सर्व काही तुमच्या मनाप्रमाणे घडतेच, फक्त तुम्हाला महाराजांच्या सत्त्वपरीक्षेत पास व्हावे लागते. मी शंकर महाराजांच्या मठात जाऊन आलो आणि माझ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मला मिळाले आणि आमच्या प्रांजळपणे पाहिलेल्या स्वप्नांची पूर्ती ही त्यांनीच घडवून आणली हे वेगळे सांगावयास नको. ५०व्या दिवशी आमचा एका चांगल्या व योग्य कुटुंबाशी गुरुसदनचा व्यवहार झाला. कर्मधर्मसंयोगाने त्यांनी शब्द दिल्याप्रमाणे ८ दिवसांत संपूर्ण पैसे देऊन हा व्यवहार पूर्णही केला. चेअरमन साहेबांनी तर आमच्या व्यवहारात जातीने लक्ष घालून तो सर्व कागदपत्रांनिशी पूर्णही करून घेतला. हा व्यवहार पूर्ण झाल्यावर आम्ही बरोबर ६०व्या दिवशी आमच्या विकसकास त्यांच्याशी ठरलेल्या रकमेचा व्यवहार पूर्ण करून एका महिन्यात आमच्या फ्लॅटचा ताबाही घेतला. पूर्वा आणि मंदारनेही त्यांच्या कर्जाचे सर्व सोपस्कार पूर्ण करून त्यांचाही व्यवहार पूर्ण करून फ्लॅटचा अंतर्गत सजावटीसाठीचा ताबाही घेतला. आमच्या नवीन फ्लॅटचे अंतर्गत सजावटीचे काम जोगळेकरांच्या अमृताच्या कल्पकतेने आमच्या अपेक्षेच्याही पलीकडचे साकारले होते. त्यामुळे आमचा नवीन घरात राहायला येण्याचा उत्साह वाढण्यास मदत झाली हे नक्की. योगायोगाने माझे आराध्य दैवत गणपती बाप्पा यांचा गणेशोत्सव होता. त्यानिमित्ताने आम्ही नवीन फ्लॅटमध्ये सर्वप्रथम गणेशोत्सवात श्री गणेशाची मनोभावे प्राणप्रतिष्ठा केली. अर्थात आम्हाला विकसकाकडून राहण्यासाठीचा फ्लॅटचा ताबा मिळायला अजून महिनाभराचा अवधी लागणार होता. त्यात आम्हाला गुरुसदनचा ताबा द्यायचा होता. ह्या महिनाभरासाठी कुठे राहायचे आणि सामान कुठे ठेवायचे असा गहन प्रश्न समोर उभा ठाकला होता. प्रश्नातच त्याचे उत्तर दडलेले असते, आपण सचोटीने ते शोधायचे असते. महाराजांनी माझा मित्र नव्हे मोठा बंधू जयकुमार काकडे आणि त्याच्या परिवाराला ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणून आमच्या मदतीला पाठविले होते. आमचे सर्व सामान आम्ही पूर्वा-मंदारच्या फ्लॅटवर ठेवले आणि गुरुसदनचा ताबा देऊन काकडे काकांकडे जवळ जवळ दीड महिना अगदी हक्काने राहिलो. काकडे वहिनी आणि सून अल्पनाने आमची खूप काळजी घेतली. भरपूर जेवू खाऊ घातले. त्यात काकाच्या नातीने अवनीने नकळत आम्हाला आजी आजोबांचा अनोखा अनुभव दिला. प्रसादने आमच्या नवीन फ्लॅटचे इलेक्ट्रिकचे कामही त्या काळात निगुतीने पार पाडले. ह्या काळात आम्ही जसे जमेल तसे रोज नवीन फ्लॅटमधले सामान लावून घेतले आणि विकसकाकडून ताबा मिळण्याची वाट पाहत होतो, जो आम्हाला दिवाळीच्या आधी मिळाला.

अर्थात हे सर्व विधिलिखित आहे असेच मला जाणवते. आपण निमित्तमात्र असतो बाकी काही नाही. आपली नीतीमत्ता चांगली असेल तर हे असे अविस्मरणीय अनुभव नक्कीच येतात. त्यामुळेच की काय नवीन घरात आम्ही पहिलीच दिवाळी अतिशय उत्साहाने साजरी केली. हे सर्व शंकर महाराजांच्या, स्वामी समर्थांच्या आणि आमच्या पूर्वजांच्या आशीर्वादाने होत आहे हे नक्की. वंदनाचा ६१वा वाढदिवस आम्ही आमच्या नवीन घरात साजरा केला आणि मी तिला त्या दिवशी फ्लॅटच्या किल्ल्या भेट दिल्या. आम्हा दोघांच्या कष्टाचे चीज झाले होते. हे नवे घर बायकोला भेट देताना तिने मोठ्या विश्वासाने माझ्यावर टाकलेल्या एका फार मोठ्या जबाबदारीतून मुक्त झाल्याची भावना दाटून आली होती. एका डोळ्यात गुरुसदनच्या विरहाचे अश्रू होते आणि दुजा डोळ्यात नवीन घरात प्रवेशाचे आनंदाश्रू होते.' आमच्या ह्या संकल्पास मूर्त स्वरूप देणाऱ्या गुरुसदनच्या ऋणात तहहयात राहण्याचा निश्चय करून आम्ही वंदनाच्या आईबाबांची माफी मागायला विसरलो नाही. एवढा सगळा संघर्ष तसेच हा द्राविडी प्राणायाम शब्दबद्ध करणे ही सुद्धा तारेवरची कसरत होती. भावनांचे प्रतिबिंब, तरंग मनाचे होऊन, माझ्या ओंजळीतून कागदावर उमटण्यासाठी ओसंडून वाहत होते व आमच्या अनोख्या रेशीम गाठींना हेलावून गेले होते. हा सगळा थक्क करणारा प्रवास तुम्हा वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रांजळ उद्देश असा की, आपल्या प्रत्येकाच्या कथा आणि व्यथा ह्या वेगळ्या असतात. दुसऱ्यांच्या अनुभवातून चांगले काही असेल तर ते टिपायचे व त्यावरून आपल्या गरजेनुसार बदल करून आपल्या सोयीनुसार त्याचा उपयोग करून घ्यायचा. वावगे काही असेल तर ते अव्हेरुन त्यातून जमेल तसे शिकायचे असते. शेवटी, 'ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे', हेच काय ते खरे! वृद्धापकाळाच्या प्रवेशद्वारावर उभा असताना मी आजवरचा सर्व अनुभव पणाला लावला होता. संयमाने, सचोटीने, निष्ठेने आणि प्रामाणिकपणे एक एक निर्णय तावून सुलाखून घेत गेलो आणि महाराजांनी आमच्या झोळीत अपेक्षित यश टाकून आम्हाला कृतकृत्य केले आहे असे म्हणालो तर वावगे होणार नाही.

एक गोष्ट अगदी निक्षून जाणवली ती म्हणजे लग्नानंतर आपल्या जोडीदारावर ठेवलेला विश्वास आपल्याला योग्य मार्गावरच नेतो व ज्याचा शेवटही चांगलाच होतो.



# परीक्षा

**परीक्षा म्हणजे एखाद्या व्यक्तिच्या भावात्मक, ज्ञानात्मक, क्रियात्मक योग्यतेचे, कौशल्याचे, आकलनाचे मूल्यमापन करणे. परीक्षा ह्या तोंडी, लेखी आणि प्रात्यक्षिक अशा स्वरूपाच्या असतात. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या योग्यतेची क्षमता तपासली जाते. त्यात प्रामुख्याने तीन शक्यता तपासल्या जातात.**

**मूल्यांकन :** एखाद्या विद्यार्थ्याने जे काही शिकले त्याचे त्याला कितपत आकलन झाले? हे तपासणे.

**पात्रता :** एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमासाठी किंवा व्यावसायिक पदासाठी तो किती पात्र आहे, हे निश्चित करणे.

**सुधारणा :** त्यात काही कमतरता आढळल्यास त्यात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणे.

म्हणजेच परीक्षा हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे, असे मानण्यास हरकत नाही. किंबहुना आपल्या जीवनात पाऊला-पाऊलावर आपल्याला अनेक कठीण परीक्षांना सामोरे जावे लागते. मग ती परीक्षा शालेय, महाविद्यालयीन परीक्षा असो वा जीवनाची परीक्षा असो. त्याची सुरुवात शाळेत गेल्यापासूनच होत असते.



**चंद्रलेखा बेलसरे-जगताप**, पुणे
९८५०८९५०५१

आमच्या काळात तिमाही, सहामाही, नऊमाही आणि वार्षिक अशा परीक्षा घेतल्या जात होत्या. त्या काळात त्या विद्यार्थ्याला जे काही शिकवले गेले, त्याचे त्याला कितपत आकलन झाले आहे? त्याने ते कितपत ग्रहण केले आहे? ह्याचे मूल्यमापन ह्या परीक्षांमधून केले जात असे अन् मगच पुढचा अभ्यासक्रम त्याला शिकवला जात असे.

त्यानंतर त्याचे स्वरुप बदलून ह्याच परीक्षा चौमाही, आठमाही आणि बारमाही म्हणजेच वार्षिक असे करण्यात आले कारण प्रत्येक तीन महिन्यांनी अशा परीक्षा घेणे, पेपर सेट करणे, ते तपासणे ह्यामध्ये कदाचित वेळेचा अपव्यय होत असावा किंवा विद्यार्थ्यांवर सातत्याने परीक्षांचे दडपण येत असेल म्हणून हे बदल करण्यात आले असावे. तरीही प्रत्येक आठवड्याला किंवा महिन्याला अशा टेस्ट आजही घेण्यात येत आहेत. उद्देश एकच, विद्यार्थ्याला शिकवलेल्या विषयाचे किती आकलन झाले? याचा आढावा घेणे.

अर्थात त्यामुळे जरी विद्यार्थी वर्षभर त्यात व्यग्र राहू लागला असला तरी तो अपडेट राहत होता. शिकवलेल्या अभ्यासाची उजळणी सातत्याने करत असे आणि एकदा का तो विषय पक्का झाला की, तो त्याच्या स्मरणात राहत असे आणि पुढील अभ्यासक्रम शिकण्यास तो तत्पर होत असे.


ह्याच परीक्षा देऊन पुढे तो आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून जीवनाची लढाई लढायला सुरूवात करत असे. त्यांचे मूल्यांकन झाल्यावर त्याची पात्रता निश्चित होत असे आणि त्याच निकषावर त्याला नोकरी किंवा व्यवसाय करण्यास पुढील मार्ग मोकळा होत असे.

अर्थात येथे देखील त्याची परीक्षा संपलेली नसतेच. आपल्या कार्यालयात देखील त्याला वेगवेगळ्या प्रकारची आव्हाने येत असत. त्या आव्हानांना तोंड देणे क्रमप्राप्त असे. ही देखील एकप्रकारची परीक्षाच असे. शिवाय दिवसेंदिवस जे काही संशोधन होऊन नवनवीन आविष्कार होत असत त्याच्याशी ताळमेळ साधून, त्या ज्ञानाचा उपयोग करून त्याला आपली पात्रता सिद्ध करावी लागत असे. अगदी नोकरीच्या ठिकाणी सुद्धा त्याला वेगवेगळ्या विषयाशी संबंधित परीक्षा देऊन स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे होते अन् आजही तसेच चित्र सर्वत्र दिसते. अगदी आय. टी. क्षेत्र म्हणू नका, शैक्षणिक क्षेत्र म्हणू नका, बँकिंग क्षेत्र म्हणू नका, संगणक क्षेत्र म्हणू नका, त्यातही जे काही नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे, ते शिकणे आवश्यक झाले आहे. स्पर्धेच्या या युगात ज्याने ह्या तंत्राचा स्वीकार केला, तो पुढे जाता पुढच्या पदावर पोहोचतो आणि जो शिकला नाही तो मागे पडतो कारण तो ज्या ठिकाणी नोकरी किंवा व्यवसाय करतो, त्याचा त्याच्या कंपनीला अधिक फायदा होत असतो आणि असेच कर्मचारी कंपनीला हवे असतात. त्यामुळे त्याच्या कंपनीची, व्यवसायाची वृद्धी, प्रगती होत जाते आणि त्याची स्वतःची देखील प्रगती आणि विकास होत जातो.

आता शालेय परीक्षा असो वा महाविद्यालयीन परीक्षा असोत. जे विद्यार्थी मन लावून परीक्षेत पास व्हायचे या उद्देशाने अभ्यास करत असत त्यांना परीक्षेत कॉपी करण्याची गरज पडत नसे. ते मेहनत करून अव्वल दर्जाचे यश परीक्षेत मिळवत असत पण काही उडाण टप्पू वृत्तीचे विद्यार्थी, ज्यांना अभ्यासात किंवा आपले करिअर घडविण्यात अजिबात रस नसे केवळ आपल्या पदरी एखादी तरी डिग्री असावी ह्या उद्देशाने ते परीक्षा देत असत ते मात्र परीक्षेत कॉपी करत असत. त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी

परीक्षा कक्षात पर्यवेक्षकाची नेमणूक करण्यात येत असे. एखादा विद्यार्थी कॉपी करताना पकडला गेला तर त्याची उत्तरपत्रिका हिसाकावून घेतली जात असे आणि त्याला परीक्षा कक्षाच्या बाहेर हाकलून देण्यात येत असे. नियम मोडला म्हणून त्यावर आवश्यक ती कारवाई देखील करण्यात येत असे. त्यामुळे त्यावेळी सहसा असे धाडस कोणीच विद्यार्थी करत नसत कारण त्यांच्यात प्रामाणिकपणा हे संस्कार देखील झालेले असत. एवढेच काय पण आमच्यावेळी आम्हाला बाजारात उपलब्ध असलेले गाईड देखील वापरण्यास बंदी होती. एखादेवेळी गाईडमध्ये जी उत्तरे लिहिलेली असत, तशाप्रकारची उत्तरे जर उत्तरपत्रिकेत आढळली तर त्या उत्तराला शून्य मार्क देण्यात येत असे पण इतर काही राज्यात मात्र मस्तवाल असलेले मोठ्या नेत्यांचे किंवा प्रतिष्ठित लोकांचे पाल्य आपल्या वडिलांच्या प्रतिष्ठेचा, त्यांच्या दबदब्याचा वापर करून चक्क शिक्षक किंवा पर्यवेक्षकावर दबाव आणून परीक्षेत पुस्तके आणून त्यात पाहून उत्तरे लिहित असत. काही ठिकाणी तर असे गुंड प्रवृत्तीचे विद्यार्थी बेंचवर चाकू ठेवून परीक्षा देत असत. आता बिचारे शिक्षक काय करणार? इकडे त्यांना विद्यार्थ्यांची भीती आणि तिकडे त्यांच्या मान्यवर असलेल्या वडिलांची दहशत! त्यामुळे कदाचित त्यांची नोकरी सुद्धा धोक्यात येत असे. म्हणून आपल्या डोळ्यासमोर हा अन्याय होत असताना सुद्धा जिवाच्या भीतीने ते गप्प बसत असत आणि हे सर्व अलीकडेच होत आहे असे नाही तर फार पूर्वीपासून हे होत आले आहे.

त्यावर मध्यंतरी एक उपाय काढण्यात आला होता. अशा उनाड आणि अभ्यास न केलेल्या विद्यार्थ्यांना चक्क त्या विषयाची पुस्तके परीक्षा असताना देण्यात येत होती कारण ज्यांनी अभ्यासच केला नाही, पुस्तकच हातात धरले नाही त्यांच्यासमोर पुस्तक ठेवले तरी त्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यातच त्याचा वेळ निघून जात असे. कोणत्या पानावर विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आहे? हेच जर अभ्यास न केल्यामुळे त्याला सापडत नसेल तर अपयश निश्चितच असेल ना? अर्थात ह्या उपायाचा फारसा उपयोग झाला नाही कारण परीक्षा म्हणजेच आकलन, पात्रता, सुधारणा ह्या बेसिक व्यवस्थेवर आधारित असतात. जो अभ्यास करेल, आपली पात्रता सिद्ध करेल, त्याचाच विजय होत असतो पण अलीकडे परीक्षेपूर्वीच पेपर लिक होण्याची पद्धत अस्तित्वात आली आहे. आता ना ते पूर्वीचे विद्यार्थी घडविणारे शिक्षक अस्तित्वात आहेत ना प्रामाणिक, सचोटी जोपसणारे विद्यार्थी शिल्लक राहिले आहेत. आता खुद्द शिक्षकच किंवा परीक्षेशी संबंधित लोकच पेपर लिक करू लागलेत. त्यावेळी मात्र प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ लागला आहे. हा अन्याय त्या पात्र विद्यार्थ्यांनी का म्हणून स्वीकार करावा? रात्रंदिवस अभ्यास करून जे विद्यार्थी कष्ट करून आपले भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यावर हा अन्यायच नाही तर खुलेपणाने केलेला अत्याचारच आहे असे म्हणावे लागेल. मग परीक्षा घ्यायच्या तरी कशाला? नाही तरी आजकाल मागच्या दाराने प्रशासनिक व्यवस्थेसाठी पात्र नसलेल्या लोकांना त्या हुद्द्यावर बसविलेच जात आहे. त्यामुळेच देश खोल खड्ड्यात गेला आहे. मग काही ठिकाणी परीक्षा घेण्याचा हा फार्स करायचा तरी



कशाला? जो विद्यार्थी परीक्षेचा फॉर्म भरेल त्याला उत्तीर्ण करून टाका. पुढे तो आपल्या अक्कल हुशारीने त्याला वांच्छित असलेली जागा मिळवेल किंवा ज्याच्यात पात्रता नाही तो त्या जागेवर रुजू होईल कारण अभ्यास करायची देखील एक मानसिकता असते. एक टेम्पो असतो. परीक्षा जवळ आली की विद्यार्थी झटून अभ्यासाला लागतात पण अशा पेपरफुटीने त्यांचे लक्ष विचलित होते. त्यांच्या मनात क्षोभ उसळतो. केलेली मेहनत वाया गेल्याची भावना निर्माण होते. शिवाय आजकाल नीटची परीक्षा अनिवार्य झाली आहे. कित्येकांचे भविष्य त्यावर निर्धारित होत आहे. अशाप्रकारे ओरड झाल्यावर परीक्षा स्थगित करण्यात येतात. केलेली तयारी, श्रम वाया जातात. परत परीक्षेचे फॉर्म भरावे लागतात. त्यासाठी भरमसाठ शुल्क आकारले जाते. ते भरण्याची क्षमता सर्वांमध्ये असतेच असे नाही. त्यामुळे आता विद्यार्थी मेटाकुटीला आले आहेत पण त्याचे कोणालाच काही वाटत नाही.

दोषीना पकडले जाते, त्यांच्यावर कारवाई केली जाते. निकाल प्रलंबित राहतात पण आपल्या देशाच्या भावी पिढीचे किती नुकसान होते? ह्याचे कोणालाच काहीच पडलेले दिसत नाही. ते विद्यार्थी रडतात, मायूस होतात, नैराश्यात जातात. असे घडवणार आहोत का आम्ही देशाचे वारसदार? शेवटी परीक्षा घेण्याची जबाबदारी कोणाची असते? सरकारचीच ना? मग का नाही नेमत तुम्ही जबाबदार मंडळी त्या संस्थेवर? का होतात पेपर लिक? तेव्हा कुठे जाते तुमची शासकीय यंत्रणा? पोलीस यंत्रणा? का तुम्हाला पण तेच हवे आहे? सारखे सारखे पेपर लिक होत राहतील, विद्यार्थी परत परत परीक्षेला बसत राहतील, त्यांनी परीक्षेसाठी भरलेली फी तुमच्या खात्यात जमा होत राहील, तुमच्या जमेत वृद्धी होतच राहील आणि तुम्ही मनमानी करून मागच्या दराने अपात्र पण तुमच्या मर्जीतल्या काही खास लोकांना प्रशासकीय असलेल्या महत्त्वाच्या हुद्द्यावर बसवत राहणार आहात? जो समाज किंवा देशाच्या हिताचे उद्दिष्ठ समोर न ठेवता तुमच्या हातातील कळसूत्री बाहुली बनून तुमच्या इशाऱ्यावर नाचत राहील. असा हवा आहे का आपला भारत देश तुम्हाला? ज्यात तुमच्या चुकीच्या धोरणाला, चुकीच्या निर्णयाला विरोध करण्याची क्षमता नसेल? समजत नाही, हे सर्व करून नेमके काय मिळणार आहे? चला, पेपर लिक करून त्या महाभागाला मिळत असतील काही पैसे पण तुम्ही दक्ष राहायला नको का? त्याचे मनसुबे काही व्यवहार होण्याच्या अगोदर तुम्हाला समजू नये का? बाकी निवडणुका, न्यायालये आणि माध्यमे ह्यावर तर तुम्ही पूर्णपणे अंकुश ठेवलेला आहे. मग ह्यावरच तुमचा कंट्रोल कसा सुटतो? हे त्या विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि या देशाचे दुर्दैव नाही तर काय आहे?

काल परवाच झालेल्या नीटच्या पेपर फुटीने आपल्या देशातील शिक्षण व्यवस्था किती ढिसाळ पद्धतीची झाली आहे, हे लक्षात आले. आधी परीक्षा चालू असताना कॉपी करणे ही पद्धत अवलंबली जात होती. तसेच काही उद्दाम मंडळी चक्क चाकू, सुऱ्या बेंचवर ठेवून उघडपणे कॉपी करायचे. पुढे अभ्यक्रमातील पुस्तके देऊनही काही उपयोग झाला नाही आणि आता तर चक्क परीक्षा देण्यापूर्वीच पेपर फुटी होते. ही बाब विश्वासार्ह असल्यामुळे ज्यांना ही प्रश्न पत्रिका मिळते, ते त्याचाच अभ्यास करून परीक्षा देतात. देशभरातील इंजिनिअरिंग, वैद्यकीय, फार्मसी आणि इतरही अनेक क्षेत्रात नीटची परीक्षा देणे अनिवार्य असते. अनेक अभ्यासक्रमांसाठी नीटचे गुण ग्राह्य धरले जातात. अखिल भारतीय कोट्यासाठी असणाऱ्या जागा नीटद्वारे भरल्या जातात. अशी परिस्थिती असताना हे पेपर फुटीचे संकट विद्यार्थ्यांवर कोसळल्यावर त्यांना परत परीक्षा द्याव्या लागतात. त्यासाठी विलंब होतो. अभ्यासक्रम उशिरा सुरू होतो आणि ह्या धुमश्चक्रित विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होते. हे सर्व अपेक्षित आहे काय? जूनमध्ये सुरू होणारी कॉलेजेस चक्क ऑगस्टमध्ये सुरू होतात. पर्यायाने जो पण अभ्यासक्रम असतो तो शिकवायला कमी अवधी मिळतो. त्यात विद्यार्थ्यांचेच नुकसान होते. ते जेरीस येतात. ते ना आरत्र राहत, ना परत्र राहतात.

खरं तर जीवनात यशस्वी होण्यासाठी कोणत्याच प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते, आपले आयुष्यच आपल्याला प्रत्येक पाऊलावर ते जीवन शिक्षण देत असते, असाही एक विचारप्रवाह दिसून येतो पण एखाद्या विषयातील सखोल ज्ञान प्राप्त करायचे असल्यास विकसित अशा तंत्रज्ञानाचा, नवीन आविष्कारांचा अभ्यास करणे गरजेचे बनते. नव्हे ती काळाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत हा सगळा सावळा गोंधळ आपल्या शिक्षण क्षेत्रात सुरु आहे. ही खरोखरच गंभीर गोष्ट आहे. शिवाय अशी कॉपी करून पास होणे ही काही गौरवाची गोष्ट नाहीच कारण अपुरे ज्ञान ग्रहण करून, कॉपी करून तुम्ही त्या विषयातील तज्ज्ञ होऊच शकत नाही. मग तुम्ही पुढे जाऊन काय दिवे लावणार आहात? तुमच्याकडे पदवी असेल पण त्यातील ज्ञानाचे काय? त्या पदवीमुळे तुम्हाला एखादी नोकरी मिळू शकते पण तुमची पात्रता काय? त्यात कशी सुधारणा करणार? हे गंभीर प्रश्न खरोखरीच महत्त्वाचे वाटतात.

एखाद्याला पुस्तकी ज्ञान असून सुद्धा प्रत्यक्षात व्यावहारिक जीवनात ते आचरणात आणता न आल्यामुळे तुमची यशाची घोडदौड तेथेच थांबते. मग अशा आमच्या देशाच्या भावी पिढीला केवळ पदवी हवी का प्रत्यक्ष त्याचे ज्ञान हवे आहे? ज्याचा तुम्ही उपयोग करून घेऊन आपले भविष्य साकारणार आहात! प्रश्नच प्रश्न आहेत. त्याला साजेसे उत्तर आज आमच्याकडे नाहीय. आता तर असे वाटू लागले आहे की नकोच घ्यायला अशा परीक्षा! सरळ वशिल्याने वशिल्याच्या तट्टूचा भरणा करावा, त्यांना नोकऱ्या प्रदान कराव्यात आणि खानापूर्ती करून, खोगीरभरती करून देश

चालवावा. नाही तरी इतर सर्वच क्षेत्रात वशिलेबाजी, खोटेपणा चाललेलाच आहे. त्यात शिक्षण क्षेत्राची अजून भर पडली तर काय बिघडणार आहे? शिवाय आता शिक्षणाची गरज तरी कुठे उरलीय? देशाची जनता मनुस्मृतीकडे वळत चालली आहे. जुने ते सोने ह्या भावनेतून संपूर्ण देशाची जनता धर्म, कर्मकांड करू लागले आहेत. बाबा, बुवांचे प्रस्थ वाढत चालले आहे. ते जे पूजा-पाठ, अनुष्ठान सांगतात, त्याकडे लोक आकर्षित होऊ लागले आहेत. मग शिक्षणाची गरज उरतेच कुठे? आज आमचे सुशिक्षित लोक देखील भविष्य, अनुष्ठान, पूजा, मंतर तंतर ह्यावर विश्वास ठेवू लागले आहेत. एखाद्या अशिक्षित भोंदू बाबाच्या नादी लागून आपले भविष्य घडविण्याच्या मागे लागले आहेत. गोबर, गोमूत्र, स्वमूत्र किंवा एखाद्या बाबाचे मूत्र पिऊन आम्हाला असा फायदा झाला, असे म्हणू लागले आहेत, तेव्हा आमच्या शिक्षणाचा काय उपयोग? जाऊ यात त्या भोंदू बाबांच्या आहारी! जाणून घेऊ यात त्याच्याकडून आपले भविष्य! गोबर, गोमूत्र पिऊन बरे करू यात आपले असाध्य रोग! डॉक्टर जे मल्टिव्हिटॅमिन, कॅल्शियम, आयरन, झिंक खायला सांगतात त्याची तरी काय गरज आहे? ते सर्व आम्हाला गायीचे मूत्र आणि गोबर मध्येच मिळणार तर आहे... त्यापेक्षा खेड्यात जाऊ. गायी पाळू अन् खात बसू त्यांचे गोबर आणि पीत बसू त्यांचे मूत्र! सर्वात सोप्पा उपाय! आहे काय अन् नाही काय? जीवनाला आवश्यक असलेले पौष्टिक पदार्थ जर आपल्याला बसलेल्या जागेवरच उपलब्ध असतील तर कशाला गरज पडेल आम्हाला चंद्रावर जाण्याची! आम्ही आहोत तेथेच ठीक आहोत. खुशाल आहोत. नाही का? उगाच कशाला महत्त्वाकांक्षा बाळगायच्या?

कशाला विश्वगुरू होण्याची स्वप्ने पाहायची? सगळेच काही विश्वगुरू बनत नाहीत. बाकीचे सर्व त्याचे शिष्य असतात. ते शिष्य बनण्यातच सार्थकता मानावी, अनुभवावी! नको ते शिक्षण, नको ती शाळा, महाविद्यालये! नकोत त्या परीक्षा! शेवटी शिकून कोणाचे भले आहे तर आपले भले होईल आणि न शिकताही देशाचे सर्वोच्च पद मिळू शकते ह्याचे ढळढळीत उदाहरण समोर असताना चिंता कशाला करायची? जुमलेबाजी केली की आहेच जनता आपल्या बाजूने कौल द्यायला मोकळी आणि वशिलेबाजी करून मिळतील की नोकऱ्या मागच्या दरवाज्याने! जुमलेबाजी आणि वशिलेबाजी हीच तर पात्रता जोखली जाते मग कशाला शिकता? कशाला वयाच्या २५-३० वर्षांपर्यंतचे आयुष्य वाया घालवता? त्यामुळे अधिकची स्वप्ने पाहू नका. आहे ना आपल्याकडे एक विश्वगुरू? तो सर्वांचेच भले करेल.

वाचक हो, अतिशय उद्विग्न मनःस्थितीत हा लेख मी लिहित आहे. त्या परीक्षा देणाऱ्याच विद्यार्थ्यांनाच नाही तर आता मला देखील नैराश्य येऊ लागले आहे पण सर्व गोष्टी आपल्या हातात थोडीच असतात? समाजात हे असे सर्व पातळ्यांवर घडतंच आहे. त्याला पायबंद घालायचा असेल तर प्रत्येकाने जागरूक व्हायला पाहिजे. ह्या अन्यायाचा ठामपणे विरोध करायला पाहिजे. इकडे आपण आरक्षणाच्या बाबतीत ओरड करतो.

आरक्षण कोट्यातून पास झालेले विद्यार्थी खरंच का पात्र आहेत? यावर शंका घेतो पण मग अशा परीक्षा देऊन पास होणाऱ्या ओपन कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांबाबत आपल्याला शंका का येत नाही? ते आम्हाला चालते. त्यांच्या ज्ञानावर आम्ही आंधळेपणाने विश्वास ठेवायचा का? अशा पद्धतीने पास झालेला डॉक्टर किंवा इंजिनिअर खरंच का त्या पात्रतेचा असू शकतो? मग का उखडतात आमचे रस्ते? का पडतात आमचे पूल? का दगावतो आमचा रुग्ण? अर्थात माझा आक्षेप सर्व विद्यार्थ्यांवर किंवा सचोटीने पास होणाऱ्या त्या ज्ञानी व्यक्तिवर नाहीच आहे. माझा आक्षेप त्या भोंदू व्यक्तिवर आहे ज्याने अशा प्रकारचा प्रमाद केला आहे.

जरी असे पेपर लिक करणारे कितीही दलाल आपल्या समाजात असले तरी आपण का बळी पडतो त्यांच्या प्रमादाला? त्यांना तर पेपर लिक करून आर्थिक प्राप्ती होत असते पण आपले काय? आपले तर अवघे आयुष्यच पणाला लागते आणि शेवटी जरी यश मिळाले तरी ते आपले असतेच नाही. असे यश मिळविण्यात काय अर्थ आहे? ह्याचा विचार तरी सुज्ञांनी करायला हवा.

आपल्या देशातील बरेच विद्यार्थी परदेशात जाऊन शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. त्यांना ते परवडते. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग ते आपली आत्मोन्नती करून घेण्यात करतात पण सर्वसामान्य जनतेचे काय? त्यांनी असेच जगायचे का? त्यांनी तरी आत्मावलोकन करावे आणि लिक झालेल्या पेपरांना भीक न घालता आपण जे आत्मसात केले, त्याप्रमाणे पेपर लिहावा. तुम्ही जर ते लिक झालेले पेपर पाहिलेच नाहीत तर कशाला स्थगित होतील परीक्षा? कशाला शंका घेतली जाईल तुमच्या पात्रतेवर? विद्यार्थ्यांनो, माझ्या देशाच्या आधारस्तंभानो! तुम्ही नका बळी पडू ह्या व्यवस्थेला! नका तुकवू अशा लोकांच्या पुढती माना! जेव्हा तुम्हीच प्रतिसाद देणे बंद कराल तर कशाला करतील ते पेपर लिक? एखाद्या गोष्टीला प्रचंड प्रतिसाद दिला तरच त्यांची हिंमत वाढते. त्याला वेळीच खीळ घाला. अशा प्रकारच्या तुम्हाला बरबाद करणाऱ्या विषवल्लरी ठिकठिकाणी उगवलेल्या आहेत. त्यांना समूळ नष्ट करण्याचा विडा तुम्ही उचललात तर सर्व काही ठीक होईल. ना तुम्ही अमिषाला बळी पडाल अन् ना ही त्यांचे वाईट मनसुबे पूर्णत्वाला जातील. शेवटी आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार बनण्यातच पुरुषार्थ आहे, सार्थकता आहे, हे लक्षात ठेवा.

# मराठी कवितेची साक्षेपी समीक्षा : जुन्या वाटा नवी वळणे




**डॉ. राजेंद्र थोरात**
९८५००१७४९५

**मराठीचे व्यासंगी अभ्यासक व प्रसिद्ध समीक्षक प्रा. सुहासकुमार बोबडे यांचा 'जुन्या वाटा नवी वळणे' हा निवडक मराठी कवितेची समीक्षा करणारा ग्रंथ श्री समर्थ प्रकाशन यांनी प्रकाशित केलेला आहे. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना काव्यसंग्रहाचे अध्यापन करत असताना कवितेविषयीची आवड प्रा. सुहासकुमार बोबडे यांच्यामध्ये निर्माण झाली. मनोगतामध्ये ते म्हणतात, ''मी वृत्तीने समीक्षक नाही. मी जरी कवी म्हणून प्रसिद्ध नसलो तरी माझा मुळचा पिंड मात्र कवीचा आहे. साहजिकच एक कवी दुसऱ्या कवीला ज्या प्रकारे समजू शकतो तो दृष्टिकोन समीक्षकाचा असेलच असे नाही. विद्यापीठीय पातळीवर वेगवेगळे मान्यवर कवी शिकवत असताना त्यांच्या कवितेतील काही अंशी मला जो नवा आशय गवसला तो मी येथे नोंदवला आहे.''**

जुन्या वाटा नवी वळणे  या समीक्षा ग्रंथास प्रा. वसंत नरहर कुबेर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना आहे. प्रा. कुबेर म्हणतात, ''प्राध्यापक सुहासकुमार बोबडे यांचे प्रस्तुत लेखन प्रामुख्याने अध्यापनाच्या गरजेतून जो अभ्यास झाला किंवा करावा लागला त्याला दिलेले शब्दरूप आहे. गेल्या काही वर्षात वेळोवेळी केलेले हे लेखन निरनिराळ्या दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकामधून प्रसिद्ध झाले आहे तर काही अप्रसिद्ध लेखही या संग्रहातून प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. हे लेख वाचताना समीक्षक या नात्याने प्रा. बोबडे यांचा विकास कसा झाला असावा याचीही कल्पना येते.''

प्रा. सुहासकुमार बोबडे यांचे मृत्युलेखकार आचार्य अत्रे व रामनगरी आणि माझे विद्यापीठ एक संवाद हे समीक्षा ग्रंथ यापूर्वीच प्रसिद्ध झालेले आहेत. प्रा. बोबडे हे अध्यापन हे व्रत मानून विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. अध्यापन करण्यापूर्वी ते पूर्वतयारी म्हणून विषयाचा सखोल अभ्यास करतात हे त्यांच्या लेखनावरून जाणवते. वर्तमानात व्रतस्थपणे अध्यापन करणारे अध्यापक दुर्मीळ होत चालले आहेत. साहित्याचे अध्यापन करताना विशेषत: कवितेचे अध्यापन करताना ते अधिक खुलतात. जुन्या वाटा नवी वळणे या समीक्षा ग्रंथात एकूण एकवीस लेख आहेत. कवितेचा आस्वाद घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व अध्यापन करणाऱ्या अध्यापकांसाठी हा समीक्षा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

माणसातल्या माणसाला आवाहन करणारी बहिणाबाईंची कविता या पहिल्याच लेखात बहिणाबाईंच्या कवितेचे रसग्रहण त्यांनी आस्वादक दृष्टिकोनातून केले आहे. १९५२ मध्ये आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंची गाणी महाराष्ट्रासमोर आणली.




बहिणाबाईंची गाणी माणसातल्या माणसाला कशी आवाहन करतात याचे वर्णन प्रा. बोबडे यांनी केले आहे. बहिणाबाईंनी माणसातलं माणूसपण माणसाला दाखवून दिलं आहे. त्या माणसातलं उणेपण न शोधता त्याचं भलेपण कशात आहे याचाच शोध घेतात. हा शोध त्यांनी घेतला आहे तो माणसातल्या माणसाला आवाहन करून. बहिणाबाईंचे हे आवाहन जर माणसाने आव्हान म्हणून पेलले तर तो बहिणाबाईंना अभिप्रेत असणारा माणूस होईलच यात शंका नाही, या बोबडे यांच्या विधानाशी आपण सहमत होतो. प्रेम आणि मरण : एक चिंतन या लेखातून गोविंदाग्रज यांच्या प्रेम आणि मरण या कवितेचे रसग्रहण केले आहे. ''गोविंदाग्रज हे तर प्रणयपंढरीचे वारकरी. मराठी कवितेतील प्रेमाचे शाहीर. त्यांच्या प्रेम आणि मरण या कवितेत तर प्रेमभावनेचे चिरंतन लावण्य आणि विलक्षण सामर्थ्य चित्रित झाले आहे. ह्या खंड काव्यात्मक कवितेत वृक्ष आणि आकाशस्थ बिजली यांच्या प्रीतीतील समर्पण भावनेने काव्याला चिरस्थायी सौंदर्य तर लाभले आहेच पण प्रेमभावनेचे

एक विलक्षण तत्त्वज्ञानही व्यक्त झाले आहे. प्रीतीतील आकर्षण आणि ह्या आकर्षणातून निर्माण झालेली आसक्ती. प्रेमिकाला ज्या बाबीची आसक्ती प्राप्त होते ती एक बाब सोडून सर्वच बाबतीत त्याला कशी विरक्त करून टाकते आणि प्रीतीमधील या आकर्षणापायी प्रेमिकाची स्थिती कशी होते व त्याला काय काय भोगावे लागते हे गोविंदाग्रजांनी वृक्ष आणि बिजलीच्या रूपकातून अत्यंत परिणामकारक शैलीत सांगितले आहे'' असे वर्णन लेखकाने केले आहे. मराठी रसिकमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या कुसुमाग्रजांच्या कवितेचे रसग्रहण करणारे काही लेख या समीक्षा ग्रंथात आहेत. कुसुमाग्रजांच्या कवितेतील पोक्त प्रेमानुभव हा लेख अभ्यासपूर्ण असून या लेखात प्रेम ही मानवी जीवनातील एकच भावना असली तरी प्रत्येक कवीचा या भावनेकडे पाण्याचा दृष्टिकोन कसा निराळा असतो याचे वर्णन प्रा. बोबडे यांनी केलेले आहे. विशाखा हा कुसुमाग्रज यांचा गाजलेला कवितासंग्रह आहे.

**प्रेम कर भिल्लासारखं, बाणावरती खोचलेलं**
**मातीमध्ये उगवूनसुद्धा, मेघापर्यंत पोहोचलेलं...**

या कवितेचे सुंदर रसग्रहण लेखकाने केले असून वाचकांनी ते मुळापासून वाचणे आवश्यक आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेचे समीक्षण करताना प्रा. बोबडे लिहितात, ''सत्य, न्याय, दया, त्याग, सविष्णुता, ध्येयवाद यांची पूजा कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यात बांधली. केशवसुतांनी नरेची केला हीन किती नर याबद्दल चिंता व्यक्त केली पण कुसुमाग्रजांनी नरातील नारायणाची पूजा मांडली. मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांनी समाजाकडे पाहिले. त्यामुळे त्यांच्या कवितेतून मानवतावादाचा स्त्रोत पाझरत राहिला. त्यांनी जे आदर्श आपल्या काव्यातून सांगितले ते नुसते बेगडी नव्हते तर त्याला वास्तवाभिमुखतेची जोड होती. तात्पर्य, कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रतिभा जरी सूर्यापर्यंत जाऊन पोहोचल्या असल्या तरी त्यांचे पाय मात्र या मातीतच आहेत याचे प्रत्यंतर त्यांच्या कवितेत पदोपदी येत राहते. महावृक्ष सामाजिक वेदनेचे काव्य व जीवनाचा वेदमंत्र या लेखात कुसुमाग्रजांच्या कवितेचे रसग्रहण केले आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेत जीवनवाद, आदर्शवाद, ध्येयवाद याच बरोबरीने समाजातील दंभ, ढोंग याविषयीची घृणा व्यक्त होताना दिसते. त्यांच्या प्रतिभेने वेळोवेळी समाजात घडत असलेल्या स्पंदनांना आपल्या कवितेत विषय बनवले आहे असे लेखाच्या सुरुवातीला प्रा. बोबडे प्रतिपादन करतात. कुसुमाग्रजांच्या कवितेचे महानत्व विशद करताना पुढे लेखक म्हणतात, ''कुसुमाग्रजांच्या प्रतिभेने अनेक काव्यविषय अभिव्यक्त केले आहेत. किंबहुना त्यांच्या कवितेचा विकास होत असताना मराठी कवितेत होत असणारी स्थित्यंतरे त्यांच्या कवितेने अनुभवली. त्यांना जीवनाबद्दल नितांत श्रद्धा व निष्ठा आहे. जीवनपोषक शक्तीबद्दलचा पूज्यभाव त्यांच्या मनात जसा आहे, त्याचप्रमाणे जीवनशोषक प्रवृत्तीचेही त्यांचे चिंतन काहीसे निराळे आहे. विश्वातल्या, सृष्टीतल्या, निसर्गातल्या कित्येक घटकांमध्ये त्यांना जीवनाचा सुबोध होतो. कुसुमाग्रजांच्या चिंतनशीलतेचे वर्णन लेखकाने केले आहे.

शांता शेळके यांच्या कवितेचा आस्वादक दृष्टिकोनातून वेध प्रा. सुहासकुमार बोबडे यांनी कौशल्याने घेतला आहे. कवितेतून आपल्या मनातील भावना व्यक्त करीत असताना त्यांची कविता आत्ममग्न होते. त्यांच्या कवितेत स्वप्न आणि वास्तव यांच्या मध्यभागी उभे असणारे हळवे स्त्री मन आहे. त्यांच्या आत्मलक्षी कवितांमधून त्यांच्या मनातील जीवनव्यापी वेदनेचा स्पष्टपणे अनुभव येतो. याविषयी विवेचन करताना लेखक म्हणतात, ''काव्यातून आपल्या मनातील भावना व्यक्त करीत असताना त्यांची कविता आत्ममग्न होते. त्यांच्या कवितेत स्वप्न आणि वास्तव यांच्या मध्यभागी उभे असणारे हळवे स्त्रीमन आहे. त्यामुळेच की काय, त्यांच्या आत्मलक्षी कवितांमधून त्यांच्या मनातील जीवनव्यापी वेदनेचा अनुभव स्पष्टपणे येतो. शांताबाईंनी अनेक काव्यप्रकारांमधून स्वतःला अभिव्यक्त केले आहे. आपले भावविश्व फुलविले आहे मात्र धगधगता निखारा जरी फुलांनी झाकला तरी फुलायचा थांबत नाही, तसे शांताबाईंचे भावविश्व आहे. विंदांच्या कवितेतील मूल्यविचार व जाणिवांची जपणूक करणारी विंदांची कविता या लेखांमधून ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित विंदांच्या कवितेचे रसग्रहण लेखकाने केले आहे. जडणघडणीच्या दृष्टिकोनातून विचार करायचा झाल्यास विंदांची कविता ही केशवसुतांच्या सामाजिक कवितेच्या अंगानेच जरी रूपाला आली असली तरीही करंदीकरांच्याच विचारांची असणारी वैचारिक मौलिकता ह्या कवितेला लाभलेली आहे. करंदीकरांची कविता ही सर्वसामान्य माणसावरील कविता आहे परंतु तिची अभिव्यक्ती पाहता ती सामान्य वाचकाला पेलणारी नाही. साहजिकच सर्वसामान्यांच्या जीवनातील सामान्य बाबींवरील ती गहन चिंतन करते. ही कविता विक्षिप्त कल्पना आणि विक्षिप्त प्रतिमांच्या साह्याने प्रकटते आणि जीवनाचे जे सत्य मूल्य आहे, त्याविषयीचा मौलिक विचार सांगून जाते.''

अर्थहीनतेला अर्थ देणारा कवी : आरती प्रभू हा या ग्रंथातील नितांत सुंदर लेख आहे. प्रा. बोबडे म्हणतात, ''नक्षत्रांचे देणे मधील कवितांमध्ये आहे ते आरती प्रभूंचे चिंतन... हे चिंतन वैविध्यपूर्ण आहे. ते कवितेविषयी आहे. प्रेमाविषयी आणि प्रेयसीविषयी आहे. जीवनातील अर्थहीनतेविषयी आहे आणि अखेरीस मृत्युविषयी आहे. ह्या कवीला एकसारखा अज्ञाताचा ध्यास लागला आहे आणि ह्या अज्ञाताला व्यक्त करण्यासाठीच त्याने कवितेचा आश्रय घेतला आहे. हे नक्षत्राचे देणे म्हणजे कविमनातील अज्ञाताला ज्ञातात परिवर्तित करण्याची तळमळ आहे. जोगवा, दिवेलागण,


नक्षत्रांचे देणे कवितासंग्रहातील कवींचा परिचय लेखकाने करून दिला आहे. वेगळ्या रंगाचा आगळा कवी या लेखातून मराठीमध्ये गझल हा काव्यप्रकार खऱ्या अर्थाने लोकप्रिय करणाऱ्या सुरेश भट यांच्या गझलांचा आस्वादक वेध घेतला आहे. लेखक वर्णन करतात, ''ह्या कवीचे भाषेवर विलक्षण प्रभुत्व आहे. रूपगंधा, रंग माझा वेगळा आणि एल्गारमधील बहुतेक गझलांमध्ये आशयाची विविधता येते. या कवितेत स्त्री मनाची भावस्पंदने आहेत. प्रेयसीने दिलवराची केलेली आराधना आहे. शृंगारातील उत्कटता आहे. प्रियतमेची तळमळ आहे. कवीची जीवनाबद्दलची निराशा आहे. ही निराशा उदंड आहे आणि त्यातूनच दुनियेबद्दलची गैरमर्जी आलेली आहे. बऱ्याच वेळा दुनियेबद्दलची बेफिकिरी या कवितेत येते. त्याचप्रमाणे ही कविता सामाजिक विचारही मांडताना दिसते. त्यामुळे आरंभीचे प्रेम, भक्ती, स्त्रीसौंदर्य, शराब, खुदा एवढेच मर्यादित विषय ही गझल अभिव्यक्त करत नाही. मालवून टाक दीप, तरुण आहे रात्र अजुनी, रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा इत्यादी गझलांचा आशय लेखकाने उलगडून दाखवला आहे. वसंत बापट, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे यांच्या कवितेतील सामर्थ्य लेखकाने विशद केले आहे.

एकूणच साहित्याचे विद्यार्थी, अध्यापक, संशोधक व रसिकांसाठी जुन्या वाटा नवी वळणे हा समीक्षा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

**– जुन्या वाटा नवी वळणे**
**प्रा. सुहासकुमार बोबडे**
**श्रीसमर्थ प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ – २४८, मूल्य – ४०० रुपये**

# 'लाडोबा'तर्फे बालकुमारांसाठी त्रैभाषिक कथासंग्रह

**पुणे :** मराठीतले साहित्य इतर भाषांत जायला हवे, अशी अपेक्षा सातत्याने व्यक्त केली जाते. विशेषतः बालकुमारांसाठी असे प्रयोग होणं जास्त गरजेचं असतं. याचाच एक भाग म्हणून लाडोबा प्रकाशनतर्फे **'पुलो डिअर'** हा त्रैभाषिक कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला.




शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग करणाऱ्या नांदेड येथील ज्येष्ठ लेखिका आशा पैठणे यांच्या पाच कथा या संग्रहात आहेत. मूळच्या या मराठी कथांचा स्वाती कान्हेगावकर यांनी हिंदी तर डॉ. अश्विनी भोरे यांनी इंग्रजी अनुवाद केला आहे. एकाच पुस्तकात मराठी, हिंदी आणि इंग्रजी कथा सचित्र असल्याने बालवाचकांना ही साहित्यिक मेजवानी मिळणार आहे. शिवाय यातील मराठी कथांच्या अभिवाचनाचा क्यूआर कोड पुस्तकात दिला असल्याने रसिका तुळजापूरकर यांच्या आवाजात या कथा ऐकताही येणार आहेत. अमराठी मुलांपर्यंत मराठी साहित्य प्रभावीपणे पोहोचावे, इतर भाषा भगिनीबद्दल तिरस्कार, द्वेष न राहता आदर, प्रेमभाव आणि स्नेह वाढावा या हेतूने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रयोगामुळे मुलांचे अनुवादकौशल्य वाढीस लागणार असून अभिवाचनाचीही गोडी निर्माण होणार असल्याचे घनश्याम पाटील यांनी सांगितले. या प्रयोगाबाबत लेखिका आशा पैठणे म्हणाल्या, ''माझ्या या गोष्टी निसर्ग, समाज, घर आणि मुलांची मने यांना जोडणाऱ्या आहेत. थोडी गंमत आणि थोडे शिकणे आहेच, म्हणूनच मुलांना आनंद देणाऱ्या या गोष्टी आहेत. एखादे पुस्तक प्रकाशित करायचे तर ते एक आव्हानच आहे आणि अशी नवी आव्हाने स्वीकारणे, नवीन प्रयोग करणे यात ज्यांची मातब्बरी आहे असे 'चपराक' आणि 'लाडोबा'चे प्रकाशक घनश्याम पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. एकदा का मनात आले, की घनश्याम पाटील वायुवेगाने सारे जुळवून आणतात. त्यामुळेच हे पुस्तक बालवाचकांपर्यंत पोहोचणार आहे.''

मराठीत वैविध्यपूर्ण विषयांवरील उत्तमोत्तम साहित्य प्रकाशित व्हावे, यासाठी आमचे अथक प्रयत्न सुरू आहेत. विशेषतः बालकुमारांसाठी चांगले साहित्य आल्यास उत्तम वाचक आणि भविष्यातील आदर्श नागरिक निर्माण होण्यास हातभार लागणार आहे. भाषिक मर्यादा ओलांडून मराठीतील साहित्य अन्य प्रादेशिक भाषांत आणि जागतिक स्तरावर जावे, यासाठी चपराक आणि लाडोबा प्रकाशनतर्फे आम्ही काही प्रयोग करत आहोत. हे पुस्तक त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**– घनश्याम पाटील**
**प्रकाशक**

# स्वरानंदच्या वाटचालीचा सुरेख मागोवा

**विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे सांस्कृतिक विश्व अनेक अंगांनी समृद्ध होत गेले. यामध्ये संगीताचा विचार केला तर शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आर्य संगीत प्रसारक मंडळ आणि सुगम संगीताच्या क्षेत्रात स्वरानंद प्रतिष्ठान ही नावे प्रामुख्याने घ्यावीच लागतील. स्वरानंद प्रतिष्ठान गेली पन्नास वर्षाहून अधिक काळ एकाहून एक उत्तम असे दर्जेदार सुगम संगीताचे कार्यक्रम घेऊन रसिकांसमोर आली आहे. या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त आणि प्रथमपासूनचे कार्यकर्ते प्रा. प्रकाश भोंडे यांनी स्वरानंदच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीचा सुरेख मागोवा सुवर्ण महोत्सवी स्वरानंद या ग्रंथाद्वारे घेतला आहे.**




**अरुण कमळापूरकर**

७९७२५७३८९४


सात नोव्हेंबर १९७०या दिवशी लक्ष्मी क्रीडा मंदिर पुणे येथे आपली आवड या कार्यक्रमाद्वारा स्वरानंदने सुगम संगीत सादरीकरणाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. हरीश देसाई, विश्वनाथ ओक, प्रकाश भोंडे या उत्साही तरुणांनी या संस्थेची धुरा खांद्यावर घेतली आणि तिथपासून प्रकाश भोंडे आणि स्वरानंद हे जणू अद्वैतच झाले आहे. स्वरानंदच्या स्थापनेचे श्रेय प्रा. भोंडे हे बीएमसीसी या कॉलेजला देतात. भोंडे याच कॉलेजचे विद्यार्थी आणि प्राध्यापक. स्नेहसंमेलनात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात अरुण नूलकर, सुधीर दातार, बाबा देसाई, विश्वनाथ ओक आणि प्रकाश भोंडे ही मंडळी रंगमंचावर आणि रंगमंचाच्या मागे कार्यरत असायची. अशाच कार्यक्रमातून स्वरानंदची कल्पना सुचली. हा ६६ ते ७० चा काळ.




१९७० साली शुभारंभ केलेल्या स्वरानंदने पुढील अर्धशतकात आपली आवड, मंतरलेल्या चैत्रबनात, नमन मृत्युंजय वीरा, पुलकित गाणी, स्वरतीर्थ, आनंद गाणी, मी निरांजनातील वात, देवगाणी असे एकाहून एक सरस कार्यक्रम रसिकांपुढे सादर केले. यातील प्रचंड लोकप्रियता लाभलेला कार्यक्रम म्हणजे मंतरलेल्या चैत्रबनात. गदिमा गीतांच्या या कार्यक्रमाने सुगम संगीताच्या क्षेत्रात अनेक मानदंड स्थापन केले. आजही स्वरानंद म्हटलं की आठवण होते चैत्रबनचीच. आज साधारण सत्तरीच्या पुढे असलेल्या पिढीने स्वरानंदचा हा प्रवास अनुभवला आहे.

१७ डिसेंबर १९७६ हा तो भाग्याचा दिवस ज्या दिवशी मंतरलेल्या चैत्रबनात हा कार्यक्रम भरत नाट्य मंदिरात सादर झाला याचे वैशिष्ट्य असे होते की गदिमा, सुधीर फडके आणि राजा परांजपे ही त्रिमूर्ती प्रथम रांगेत कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी हजर होती. या कार्यक्रमाचे अतिशय सुरेख प्रवाही निवेदन केले होते सुधीर मोघे यांनी. कालांतराने या कार्यक्रमाच्या असंख्य प्रयोगांची निवेदक म्हणून जबाबदारी सुधीर गाडगीळ यांनी स्वीकारली होती.

एखादी संस्था चालवायची म्हणजे कंटकाकीर्ण मार्ग असतो. सारेच काही सुरळीत होत नाही. याची प्रचिती प्राध्यापक भोंडे यांनाही आली. जेमतेम वीस प्रयोग होतात न होतात तोच निवेदक सुधीर मोघे, तबला वादक अरुण नूलकर, बासरी वादक अजित सोमण आणि ढोलकी वादक सुहास तांबे यांनी एकत्रितपणे संस्थेतून बाहेर पडायचा धक्कादायक निर्णय घेतला. ही घटना मन अस्वस्थ करणारी होतीच पण शो मस्ट गो ऑन या उक्तीला अनुसरून पुढील वाट शोधणे हाच पर्याय होता. हा शोध सोपा नव्हता. लेखकाचा शब्दात सांगायचे झाले तर ''कलाकार म्हणजे काही एखादे वाद्य नव्हते की एक गेले आणि त्या जागी दुसरे आणून काम पुढे चालू ठेवले. कलाकाराच्या जागी पर्यायी कलाकार आणून कार्यक्रम करणे हे नुसते क्लेशदायक, बेचैनी आणणारे असते असे नाही तर त्यामुळे मनोधैर्य खचते हे महत्त्वाचे!''

पण या सर्व प्रतिकूलतेवर मात करीत प्रकाश भोंडे यांनी स्वरानंदचा ध्वज दिमाखाने फडकत ठेवला आणि दोन वर्षातच चक्क सुवर्ण महोत्सवी प्रयोगापर्यंत मजल मारली. त्यानंतर काळाच्या ओघात अनेक गायक, वादक बदलले, निवेदक बदलले पण चैत्रबनची लोकप्रियता अबाधितच राहिली ती आजतागायत.

यानंतर प्रयोगांचा झपाटा जबरदस्त होता आणि १७

मार्च १९७९ या दिवशी चक्क शंभरावा प्रयोग टिळक स्मारक मंदिरात साजरा झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे होते उद्योजक शंतनुराव किर्लोस्कर. यानिमित्ताने एक सुंदर स्मरणिकाही प्रकाशित केली गेली त्यामध्ये या प्रयोगाला शुभेच्छा देणारे संदेशही समाविष्ट झाले. चैत्रबन ही स्वरानंदची खास ओळख असल्याने थोडे सविस्तर विवेचन करावे लागले पण त्या व्यतिरिक्त वेळोवेळी अनेक दर्जेदार कार्यक्रम या संस्थेने दिले आहेत. यामध्ये स्वर आले दुरुनी हा यशवंत देवांच्या रचनांचा कार्यक्रम ७ मार्च १९८१ रोजी सादर झाला यावेळी मंगेश पाडगावकर हे प्रमुख पाहुणे होते. यानंतर पु. ल. देशपांडे यांनी संगीत दिलेल्या रचनांचा कार्यक्रम पुलकित गाणी या नावाने १७ ऑगस्ट १९७७ला भरत नाट्य मंदिरात झाला. यावेळी गदिमांचे सुपुत्र आनंद माडगूळकर यांनी निवेदनाची जबाबदारी अतिशय समर्थपणे पार पाडली. असेच काही कार्यक्रम म्हणजे कवी शांताराम आठवले यांच्या रचनांवर आधारित आधी बीज एकले, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रचना नमन मृत्युंजय वीरा या कार्यक्रमाद्वारे सादर झाल्या तर रिमझिम स्वरांची हा सुमन कल्याणपुर यांनी गायलेल्या गीतांचा कार्यक्रमही त्यांच्याच उपस्थितीत सादर करण्याचे भाग्य या संस्थेला लाभले. सुधीर फडके यांच्या रचना स्वरतीर्थ या कार्यक्रमाद्वारे सादर केल्या. ज्येष्ठ भावगीत गायक गजाननराव वाटवे यांनी गायलेली गाणी मी निरांजनातील वात या शीर्षकानं सादर केली गेली. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या रचना स्वरप्रतिभा या कार्यक्रमाद्वारे रसिकांपुढे पुढे आल्या हे आणि असे अनेक कार्यक्रम वेळोवेळी सादर करून स्वरानंदने मराठी रसिकांची दाद मिळवली. शब्दमर्यादेमुळे सर्वच कार्यक्रमांचा परामर्श घेता येत नाही. त्यासाठी हे पुस्तकच वाचले पाहिजे. सुवर्ण महोत्सवी स्वरानंद हा ग्रंथ म्हणजे केवळ पुस्तक नाही तर त्याला एखाद्या ऐतिहासिक बखरीचे मोल आहे. गेल्या ५० वर्षांचा हा इतिहास वाचताना मला स्मरणरंजनाचा जो अनुभव मिळाला तो शब्दात सांगता येत नाही प्रा. भोंडे यांनी हा सर्व प्रवास शब्दबद्ध करून मराठी रसिका वर खूप मोठे उपकार केले आहेत, असं प्रांजळपणे म्हणावंसं वाटतं. मराठी रसिक या ग्रंथाला भरभरून दाद देखील याची खातरी आहे.

**सुवर्ण महोत्सवी स्वरानंद**


**ले. प्रकाश भोंडे**

**अनुबंध प्रकाशन, पुणे.**

# मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढविणारी चित्रकथा

तू बुद्धी दे, तू तेज दे..., असे जगावे छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर अशा एकाहून एक सरस आणि प्रेरणादायी कवितांचे कवी, प्रतिभावान गीतकार, पटकथा-संवादलेखक आणि प्रसिद्ध अभिनेते गुरु ठाकूर आता एका नव्या भूमिकेतून बालवाचकांच्या भेटीस येत आहेत. तब्बल २५-३० वर्षांनंतर गुरु ठाकूर यांनी पुन्हा एकदा आपल्या जुन्या कार्टुनिस्ट (व्यंगचित्रकार) भूमिकेची आठवण जागी करत बालचमूंसाठी एक विशेष चित्रकथा पुस्तक साकारले आहे. '**गोष्ट छोटी, शिकवण मोठी**' असे या पुस्तकाचे नाव असून, लाडोबा प्रकाशनतर्फे हे पुस्तक मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये एकाच वेळी वाचकांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे.




इंग्रजी संस्करणाचे नाव **'टायनी टेल, वाईज ट्रेल'** असे आहे. आपल्या कारकिर्दीची सुरुवात एकेकाळी नवा काळ वृत्तपत्रात व्यंगचित्रकार म्हणून करणारे गुरु ठाकूर मधल्या काळात चित्रपट, नाट्य आणि संगीत विश्वात पूर्णपणे व्यग्र झाले होते. मात्र, काही दिवसांपूर्वी एकदा सहज गप्पांच्या ओघात त्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला होता की, ''जसा काळ बदलतो, तशा मुलांसाठीच्या गोष्टी, बोधकथा आणि त्यांतील संदर्भही बदलायला हवेत. आजच्या डिजिटल युगातील मुलांच्या भावविश्वाशी आणि अनुभवांशी नाते सांगणाऱ्या कथा निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे.'' हाच विचार लाडोबा प्रकाशनने अत्यंत गांभीर्याने आणि मनापासून उचलून धरला. प्रकाशकांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे गुरु ठाकूर यांनी दैनंदिन कामाच्या धावपळीतून वेळ काढत या कल्पनेवर काम केले आणि बघता-बघता या नव्या कॉमिक पुस्तकाचा जन्म झाला. बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या गुरु ठाकूर यांचे मुलांसाठीचे हे पहिलेच स्वतंत्र पुस्तक आहे. विशेष म्हणजे या पुस्तकातील सर्व कथा, त्यातील चित्रांची संकल्पना, रेखाटने आणि संपूर्ण मांडणी खुद्द गुरु ठाकूर यांनीच साकारली आहे.

कवी गुरु ठाकूर यांचे बालसाहित्यातील हे पहिलेच पाऊल लाडोबा प्रकाशनच्या माध्यमातून पडत असल्यामुळे, साहित्य वर्तुळातून या उपक्रमाचे मोठे स्वागत होत आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढवण्यासाठी, त्यांना चांगल्या गोष्टींची निवड करायला शिकवण्यासाठी आणि कोणत्याही आव्हानाला धैर्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल.

# राष्ट्रीय हरित लवाद : पर्यावरणाचा प्रहरी

**मानव आणि पर्यावरण यांचे नाते अतूट, परस्परावलंबी आणि चिरंतन आहे. मानवाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेले शुद्ध वायू, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन, अन्नधान्य, वनसंपदा आणि जैवविविधता हे सर्व पर्यावरणाकडूनच प्राप्त होते. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण हे केवळ नैसर्गिक संपत्तीचे जतन नसून मानवजातीच्या अस्तित्वाशी निगडित असलेले एक मूलभूत कर्तव्य आहे! परंतु औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाढती लोकसंख्या, नैसर्गिक संसाधनांचा अनियंत्रित वापर, जंगलतोड, जल व वायू प्रदूषण, प्लास्टिक कचऱ्याचा वाढता साठा आणि हवामान बदल यांसारख्या मानवनिर्मित कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस बिघडत चालला आहे. याचे दुष्परिणाम म्हणून उष्णतेच्या लाटा, अवेळी पाऊस, दुष्काळ, पूर, जैवविविधतेचा ऱ्हास आणि विविध पर्यावरणीय संकटे निर्माण होत आहेत.**




**ॲड. स्वप्निल श्रोत्री**
पुणे
८९५६८०१२४०


या गंभीर परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागतिक स्तरावर जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन'म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाला जागतिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ सामाजिक किंवा नैतिक जबाबदारी नसून ती एक कायदेशीर आणि घटनात्मक जबाबदारी देखील आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ४८-अ आणि अनुच्छेद ५१-अ (ग) यांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी शासन आणि नागरिक या दोघांवरही सोपविण्यात आली आहे.




**राष्ट्रीय हरित लवादाचे पुणे येथील कार्यालय**

पर्यावरणविषयक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, पर्यावरणीय हानीग्रस्तांना न्याय, तसेच विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखण्यासाठी भारताने एक स्वतंत्र आणि विशेष न्यायिक यंत्रणा उभारली. या उद्देशाने राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० अंतर्गत राष्ट्रीय हरित लवाद (नॅशनल ग्रीन ट्रीब्यूनल - एनजीटी) या विशेष न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरणीय न्याय या क्षेत्रात राष्ट्रीय हरित लवादाने गेल्या काही वर्षांत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पर्यावरणीय न्यायव्यवस्थेतील एक प्रभावी आणि सक्षम संस्था म्हणून राष्ट्रीय हरित लवाद आज पर्यावरण रक्षणाच्या लढ्यात अग्रभागी कार्यरत आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना, रचना, कार्यपद्धती, अधिकारक्षेत्र, महत्त्वपूर्ण निर्णय आणि पर्यावरण संरक्षणातील योगदान यांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पर्यावरणाचे संरक्षण हेच मानवाच्या सुरक्षित आणि शाश्वत भविष्याचे संरक्षण होय.

जागतिक पर्यावरण दिनाची सुरुवात

१९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे मानव पर्यावरण विषयक पहिली आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेतील चर्चेनंतर संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षणासाठी जागतिक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७४ पासून हा दिवस जगभर साजरा केला जात आहे.

## जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व

**१. पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण करणे**

जागतिक पर्यावरण दिनाचे सर्वात मोठे महत्त्व म्हणजे पर्यावरण संरक्षणाविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. अनेक नागरिकांना पर्यावरणीय समस्यांची तीव्रता आणि त्यांचे परिणाम यांची पूर्ण माहिती नसते. या दिवशी विविध कार्यक्रम, व्याख्याने, परिसंवाद, रॅली, वृक्षारोपण मोहीम आणि जनजागृती उपक्रम आयोजित करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जातो.

**२. पर्यावरणीय समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे**

आज जगासमोर हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग, जलप्रदूषण, वायूप्रदूषण, प्लास्टिक प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि पाण्याची टंचाई यांसारखी गंभीर आव्हाने आहेत. जागतिक पर्यावरण दिनामुळे या समस्यांकडे सरकार, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष वेधले जाते.

**३. हवामान बदलाविरुद्ध लढा**

हवामान बदल ही आजची सर्वात मोठी जागतिक समस्या मानली जाते. वाढते तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि हिमनद्यांचे वितळणे यामुळे मानवासह संपूर्ण सृष्टी धोक्यात आली आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या माध्यमातून कार्बन उत्सर्जन कमी करणे, अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारणे याबाबत जनजागृती केली जाते.

**४. वृक्षसंवर्धन आणि वनसंरक्षणाला चालना**

जंगल हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. वृक्ष वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू निर्माण करतात. जंगलतोडीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडतो. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वनरक्षण मोहिमा राबवल्या जातात.

**५. जैवविविधतेचे संरक्षण**

पृथ्वीवरील प्रत्येक सजीव पर्यावरणीय साखळीचा महत्त्वाचा घटक आहे. विविध वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक आणि सूक्ष्म जीव यांच्यामुळे जैवविविधता टिकून राहते. जागतिक पर्यावरण दिनामुळे जैवविविधतेचे संवर्धन आणि संकटग्रस्त प्रजातींच्या संरक्षणाची गरज अधोरेखित केली जाते.

**६. प्लास्टिक प्रदूषणाविरोधात जनआंदोलन**

एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकमुळे जमीन, नद्या, समुद्र आणि वन्यजीव यांचे मोठे नुकसान होत आहे. प्लास्टिकचे विघटन होण्यासाठी शेकडो वर्षे लागतात. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापराला प्रोत्साहन देणे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे यासाठी जागतिक पर्यावरण दिन महत्त्वाची भूमिका बजावतो.

**७. शाश्वत विकासाची जाणीव निर्माण करणे**

विकास आवश्यक असला तरी तो पर्यावरणाच्या किंमतीवर होऊ नये. भावी पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन नैसर्गिक संसाधनांचा वापर करणे म्हणजे शाश्वत विकास होय. जागतिक पर्यावरण दिनाच्या माध्यमातून आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखण्याचा संदेश दिला जातो.

**८. नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे**

पर्यावरणाचे संरक्षण केवळ सरकार किंवा न्यायालये करू शकत नाहीत. प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. पाणी बचत, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन, वृक्षारोपण, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि स्वच्छता यांसारख्या कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे.

**९. युवक आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे**

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकत युवकांमध्ये आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये पर्यावरणविषयक स्पर्धा, प्रकल्प, प्रदर्शन आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरित केले जाते.

**१०. शासन आणि उद्योग क्षेत्राला जबाबदार बनविणे**

जागतिक पर्यावरण दिनामुळे शासन संस्था आणि उद्योग क्षेत्रावर पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारण्याचा दबाव निर्माण होतो. पर्यावरणीय कायद्यांची अंमलबजावणी, प्रदूषण नियंत्रण आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर यांना प्रोत्साहन मिळते.

**११. स्वच्छ आणि निरोगी जीवनासाठी प्रेरणा**

स्वच्छ पर्यावरण हे निरोगी जीवनाचा पाया आहे. प्रदूषित हवा, दूषित पाणी आणि अस्वच्छ परिसर यामुळे अनेक रोग निर्माण होतात. पर्यावरण दिनामुळे स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण यांच्यातील संबंध स्पष्ट होतो.

**१२. जागतिक सहकार्याला बळकटी**

पर्यावरणीय समस्या कोणत्याही एका देशापुरत्या मर्यादित नसतात. हवामान बदल, समुद्री प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास या जागतिक समस्या आहेत. जागतिक पर्यावरण दिनामुळे विविध देश एकत्र येऊन पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्न करतात.

## राष्ट्रीय हरित लवादाची संकल्पना

राष्ट्रीय हरित लवाद म्हणजे पर्यावरण संरक्षण, वनसंवर्धन, नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि पर्यावरणीय नुकसानामुळे बाधित झालेल्या व्यक्तिंना न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन करण्यात आलेले विशेष न्यायाधिकरण होय.

हे न्यायाधिकरण पर्यावरणाशी संबंधित वाद, प्रदूषण, औद्योगिक प्रकल्पांमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, खाणकाम,

जंगलतोड, नदी-तलावांचे प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय मंजुरी इत्यादी विषयांवरील प्रकरणांचा विचार करते.

सामान्य न्यायालयांप्रमाणेच राष्ट्रीय हरित लवाद न्यायनिवाडा करते; मात्र त्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे येथे न्यायिक सदस्यांसोबत पर्यावरणशास्त्र, वनव्यवस्थापन, जलव्यवस्थापन, जैवविविधता आणि विज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य देखील असतात.

## राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना

भारतात पर्यावरण संरक्षणासाठी विविध कायदे अस्तित्वात असले तरी पर्यावरणाशी संबंधित वाद, प्रदूषण, जंगलतोड, नैसर्गिक संसाधनांचे नुकसान आणि पर्यावरणीय मंजुरींशी संबंधित खटल्यांचा निपटारा सामान्य न्यायालयांमध्ये होत असे. या प्रकरणांमध्ये वैज्ञानिक, तांत्रिक आणि पर्यावरणीय गुंतागुंत मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे खटल्यांच्या सुनावणीस बराच कालावधी लागत असे. परिणामी, पर्यावरणीय न्याय मिळण्यास विलंब होत होता. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत 'जीवनाचा अधिकार' हा मूलभूत अधिकार मान्य करण्यात आला असून, सर्वोच्च न्यायालयाने विविध निर्णयांद्वारे 'स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाचा अधिकार' हा देखील जीवनाच्या अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे पर्यावरणीय न्याय अधिक प्रभावीपणे देण्यासाठी स्वतंत्र न्यायिक यंत्रणेची आवश्यकता निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर १९९२ मध्ये ब्राझीलमधील रिओ डी जानेरो येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पृथ्वी परिषदेत (अर्थ समिट) भारताने पर्यावरण संरक्षणासाठी प्रभावी कायदेशीर आणि संस्थात्मक यंत्रणा उभारण्याची वचनबद्धता व्यक्त केली. त्यानंतर पर्यावरणीय प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापनेची गरज अधोरेखित झाली.

याच काळात सर्वोच्च न्यायालयानेही अनेक महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये पर्यावरणविषयक विशेष न्यायाधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. विशेषतः एम. सी. मेहता विरुद्ध भारत सरकार यांसारख्या पर्यावरणीय खटल्यांमध्ये न्यायालयाने तज्ज्ञांच्या सहाय्याने पर्यावरणीय वाद हाताळणाऱ्या संस्थेची गरज अधोरेखित केली.

यानंतर भारत सरकारने पर्यावरणीय न्यायव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० संसदेत मांडला. हा कायदा लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आणि तो कायदा म्हणून अस्तित्वात आला. या अधिनियमाअंतर्गत १८ ऑक्टोबर २०१० रोजी राष्ट्रीय हरित लवाद (नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल - एनजीटी)ची अधिकृत स्थापना करण्यात आली. पर्यावरण संरक्षण, वनसंवर्धन, नैसर्गिक संसाधनांचे रक्षण आणि पर्यावरणीय हानीग्रस्त व्यक्तिंना त्वरित न्याय मिळवून देणे हा या संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश होता.

राष्ट्रीय हरित लवाद हे पर्यावरण विषयक विशेष न्यायाधिकरण असून ते न्यायिक सदस्य आणि पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य यांच्या संयुक्त सहभागातून कार्य करते. त्यामुळे कायदेशीर आणि वैज्ञानिक अशा दोन्ही दृष्टिकोनांचा समन्वय साधून निर्णय घेणे शक्य होते.

राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना ही भारतीय पर्यावरणीय न्यायव्यवस्थेतील एक ऐतिहासिक घटना मानली जाते. यामुळे पर्यावरणीय प्रकरणांचा जलद निपटारा, प्रदूषण नियंत्रण, पर्यावरणीय नुकसानभरपाई आणि शाश्वत विकासाच्या तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले. भारत हा पर्यावरण विषयक न्यायनिवाड्यासाठी स्वतंत्र आणि विशेष न्यायाधिकरण स्थापन करणाऱ्या जगातील अग्रगण्य देशांपैकी एक ठरला.

### स्थापनेची कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| १९९२ | रिओ पृथ्वी परिषदेत भारताची पर्यावरण संरक्षणाबाबत वचनबद्धता |
| १९९६ | सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणीय न्यायासाठी विशेष यंत्रणेची गरज अधोरेखित केली |
| २०१० | राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम संसदेत मंजूर |
| १८ ऑक्टोबर २०१० | राष्ट्रीय हरित लवादाची अधिकृत स्थापना |
| २०११ | विविध प्रादेशिक खंडपीठांचे कार्य सुरू |

अशा प्रकारे, राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना ही पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि नागरिकांच्या पर्यावरणीय अधिकारांच्या संरक्षणासाठी भारताने उचललेले एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल मानले जाते.

### राष्ट्रीय हरित लवादाची रचना

राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) ही केवळ न्यायाधीशांची संस्था नसून कायदा आणि पर्यावरण विज्ञान यांचा समन्वय साधणारी एक विशेष न्यायिक यंत्रणा आहे. पर्यावरणाशी संबंधित प्रकरणांमध्ये कायदेशीर बाबींबरोबरच वैज्ञानिक, तांत्रिक आणि पर्यावरणीय पैलूंचाही विचार करावा लागतो. त्यामुळे राष्ट्रीय हरित

लवादाची रचना इतर न्यायालयांपेक्षा वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**१. अध्यक्ष :** राष्ट्रीय हरित लवादाच्या सर्वोच्च पदावर अध्यक्ष असतात.

**पात्रता :** राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० नुसार अध्यक्ष म्हणून पुढील व्यक्तिची नियुक्ती केली जाऊ शकते.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा माजी न्यायाधीश. उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा माजी मुख्य न्यायाधीश. नियुक्ती : अध्यक्षांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात.

**कार्ये :**

- लवादाच्या सर्व प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- विविध खंडपीठांचे कार्य समन्वित करणे.
- महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये खंडपीठांची रचना निश्चित करणे.
- न्यायदान प्रक्रियेची कार्यक्षमता सुनिश्चित करणे.

**२. न्यायिक सदस्य :** न्यायिक सदस्य हे पर्यावरणीय प्रकरणांतील कायदेशीर बाबींचे परीक्षण करतात.

**पात्रता :** न्यायिक सदस्य म्हणून नियुक्तीसाठी व्यक्ती ही उच्च न्यायालयाची न्यायाधीश असावी किंवा किमान दहा वर्षे न्यायव्यवस्थेतील वरिष्ठ पदाचा अनुभव असावा.

**कार्ये :**

- कायद्याचे स्पष्टीकरण करणे. संविधानिक व कायदेशीर मुद्द्यांचा विचार करणे.
- न्यायालयीन प्रक्रिया पार पाडणे. अंतिम आदेश आणि निर्णय तयार करणे.
- पर्यावरणीय विषयांशी संबंधित विविध कायद्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची जबाबदारी न्यायिक सदस्यांवर असते.

**३. तज्ज्ञ सदस्य :** राष्ट्रीय हरित लवादाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तज्ज्ञ सदस्यांचा समावेश हे आहे.

**पात्रता :** तज्ज्ञ सदस्यांकडे पुढीलपैकी कोणत्याही क्षेत्रातील विशेष ज्ञान आणि अनुभव असणे आवश्यक आहे.

पर्यावरण विज्ञान, पर्यावरण अभियांत्रिकी, वन व्यवस्थापन, जैवविविधता, हवामानशास्त्र, जल व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन तसेच संबंधित क्षेत्रात किमान १५ वर्षांचा अनुभव किंवा शासनातील वरिष्ठ पदावरील कार्यानुभव अपेक्षित असतो.

**कार्ये :**

- प्रकरणातील वैज्ञानिक, तांत्रिक बाबींचे विश्लेषण करणे.
- पर्यावरणीय परिणामांचे मूल्यमापन करणे.
- न्यायिक सदस्यांना तांत्रिक सल्ला देणे.
- पर्यावरणीय नुकसान व पुनर्स्थापना याबाबत मार्गदर्शन करणे.

उदाहरणार्थ, एखाद्या नदीच्या प्रदूषणासंबंधी प्रकरणात प्रदूषणाची पातळी, जैवविविधतेवरील परिणाम आणि पुनर्स्थापनेचा खर्च याबाबत तज्ज्ञ सदस्य महत्त्वपूर्ण मत मांडतात.

**सदस्यांची संख्या :** राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० नुसार लवादात १ अध्यक्ष, किमान १० आणि कमाल २० न्यायिक सदस्य आणि किमान १० आणि कमाल २० तज्ज्ञ सदस्य नियुक्त करता येतात. या रचनेमुळे न्यायिक आणि तांत्रिक तज्ज्ञतेमध्ये संतुलन राखले जाते.

**खंडपीठांची रचना** : देशाचा अवाढव्य आकार पाहता राष्ट्रीय हरित लवादामध्ये देशाच्या विविध भागात खंडपीठे कार्यरत आहेत. प्रत्येक खंडपीठामध्ये साधारणपणे १ न्यायिक सदस्य आणि १ तज्ज्ञ सदस्य असतो. महत्त्वाच्या किंवा गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये मोठे खंडपीठ स्थापन केले जाऊ शकते.

| खंडपीठ | कार्यक्षेत्र |
|---|---|
| नवी दिल्ली (मुख्य खंडपीठ) | उत्तर भारत |
| पुणे | पश्चिम भारत |
| भोपाळ | मध्य भारत |
| चेन्नई | दक्षिण भारत |
| कोलकाता | पूर्व भारत |

**निवड समिती** : अध्यक्ष, न्यायिक सदस्य आणि तज्ज्ञ सदस्य यांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकार निवड समिती स्थापन करते. समितीमध्ये सामान्यतः सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी, पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा समावेश असतो. निवड प्रक्रिया गुणवत्ता, अनुभव आणि तज्ज्ञतेच्या आधारावर केली जाते. कार्यकाळ : राष्ट्रीय हरित लवादातील अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाळ सामान्यतः पाच वर्षांचा असतो. त्यांना पुनर्नियुक्तीची संधी उपलब्ध असू शकते मात्र ती संबंधित कायदेशीर तरतुदींवर अवलंबून असते.

**राष्ट्रीय हरित लवादाच्या रचनेचे वैशिष्ट्य** : भारतातील इतर न्यायाधिकरणांपेक्षा राष्ट्रीय हरित लवादाची रचना अधिक प्रभावी मानली जाते कारण –

- कायदा आणि विज्ञान यांचा संगम साधला जातो.
- पर्यावरणीय प्रकरणांचे तांत्रिक विश्लेषण शक्य होते.
- निर्णय अधिक वैज्ञानिक आणि वस्तुनिष्ठ बनतात.
- पर्यावरणीय न्यायदानाची प्रक्रिया अधिक वेगवान होते.
- शाश्वत विकासाच्या तत्त्वांना न्यायिक आधार मिळतो.

**राष्ट्रीय हरित लवादाच्या अधिकारक्षेत्रातील प्रमुख कायदे :**

राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० च्या अनुसूची-१ मध्ये नमूद केलेल्या पर्यावरणीय कायद्यांशी संबंधित प्रकरणांवर राष्ट्रीय हरित लवाद सुनावणी करू शकतो. या कायद्यांचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, वनसंवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण हे आहे.

१. जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४

उद्देश : नद्या, तलाव, विहिरी, जलाशय आणि भूजल यांचे प्रदूषण रोखणे व जलस्रोतांची गुणवत्ता टिकवून ठेवणे.

प्रमुख तरतुदी : केंद्रीय व राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांची स्थापना. उद्योगांकडून सांडपाणी सोडण्यावर नियंत्रण. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कारवाई. जलप्रदूषणासाठी परवानगी प्रणाली.

राष्ट्रीय हरित लवादाकडे येणारी प्रकरणे : नद्यांमध्ये रासायनिक सांडपाणी सोडणे. औद्योगिक प्रदूषण. तलाव व जलाशयांचे प्रदूषण. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील त्रुटी.

महत्त्व : भारतातील गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा यांसारख्या नद्यांचे संरक्षण या कायद्याद्वारे केले जाते.

२. जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७

**उद्देश :** उद्योगांकडून व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पाण्याच्या वापरावर उपकर (सेस) आकारून प्रदूषण नियंत्रणासाठी निधी उपलब्ध करून देणे.

प्रमुख तरतुदी : पाण्याचा जास्त वापर करणाऱ्या उद्योगांवर उपकर. प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करणाऱ्यांना सवलती. जलप्रदूषण नियंत्रणासाठी आर्थिक सहाय्य.

राष्ट्रीय हरित लवाद मधील महत्त्व : जरी हा कायदा नंतर रद्द करण्यात आला असला तरी त्याअंतर्गत निर्माण झालेल्या काही वादांवर राष्ट्रीय हरित लवाद विचार करू शकते.

३. वन (संवर्धन) अधिनियम, १९८०

उद्देश : वनक्षेत्रांचे संरक्षण करणे आणि जंगलतोडीवर नियंत्रण ठेवणे.

प्रमुख तरतुदी : वनजमिनीचा बिगर-वन कारणांसाठी वापर करण्यासाठी केंद्र सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक. मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीवर निर्बंध. वनक्षेत्र कमी होऊ नये यासाठी उपाययोजना.

राष्ट्रीय हरित लवादाकडे येणारी प्रकरणे : बेकायदेशीर वृक्षतोड. खाणकामासाठी जंगलांचा वापर. वनजमिनीवरील अतिक्रमण. विकास प्रकल्पांमुळे होणारे वननाश.

महत्त्व : भारताचे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे.



**सर्वोच्च न्यायालयातील ख्यातनाम पर्यावरणवादी वकील पद्मश्री एम. सी मेहता १**

४. वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१

**उद्देश :** हवेचे प्रदूषण रोखणे आणि हवेची गुणवत्ता सुधारणे.

प्रमुख तरतुदी : उद्योग, कारखाने आणि वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण. प्रदूषण नियंत्रण मंडळांना तपासणीचे अधिकार. प्रदूषणकारी उद्योगांवर दंडात्मक कारवाई.

राष्ट्रीय हरित लवाद मधील प्रकरणे : औद्योगिक धूर. वाहनांमधून होणारे प्रदूषण. बांधकाम प्रकल्पांमुळे निर्माण होणारी धूळ. महानगरांतील वायू गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) संबंधी याचिका.

**महत्त्व :** दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांतील वायूप्रदूषण नियंत्रणासाठी हा कायदा प्रभावी ठरतो.

५. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

**उद्देश :** पर्यावरण संरक्षणासाठी व्यापक अधिकार केंद्र सरकारला प्रदान करणे.

पार्श्वभूमी :

१९८४ मधील भोपाळ गॅस दुर्घटनेनंतर नंतर हा कायदा लागू करण्यात आला.

**प्रमुख तरतुदी :** पर्यावरणीय मानके निश्चित करणे. धोकादायक पदार्थांच्या हाताळणीवर नियंत्रण. पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन. पर्यावरणीय मंजुरीची प्रक्रिया.

राष्ट्रीय हरित लवादमधील प्रमुख प्रकरणे : मोठे औद्योगिक प्रकल्प. महामार्ग, बंदरे, विमानतळ. खाणकाम प्रकल्प. पर्यावरणीय मंजुरीवरील वाद.

**महत्त्व :** हा भारतातील सर्वात व्यापक पर्यावरणीय कायदा मानला जातो.

६. सार्वजनिक दायित्व विमा अधिनियम, १९९१

उद्देश : धोकादायक उद्योगांमुळे अपघात झाल्यास पीडितांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी.

**प्रमुख तरतुदी :** धोकादायक उद्योगांसाठी विमा घेणे बंधनकारक. अपघातग्रस्तांना त्वरित नुकसानभरपाई. दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची गरज कमी करणे.

**राष्ट्रीय हरित लवादामधील प्रकरणे :** रासायनिक गळती. औद्योगिक स्फोट. विषारी पदार्थांचा अपघाती प्रसार.

महत्त्व : पीडितांना तातडीची मदत उपलब्ध करून देतो.

७. जैवविविधता अधिनियम, २००२

उद्देश : भारताच्या जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि जैविक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे.

प्रमुख तरतुदी : जैविक संसाधनांवर नियंत्रण. स्थानिक समुदायांच्या ज्ञानाचे संरक्षण. जैवसंपत्तीचा व्यावसायिक वापर नियंत्रित करणे.

**राष्ट्रीय हरित लवादमधील प्रकरणे :** दुर्मीळ वनस्पती व प्राण्यांचे संरक्षण. जैवविविधता नष्ट करणारे प्रकल्प. संवेदनशील परिसंस्थांवरील विकासकामे.

महत्त्व : भारताच्या समृद्ध जैविक वारशाचे रक्षण करण्यासाठी हा कायदा अत्यंत आवश्यक आहे.

**राष्ट्रीय हरित लवादाच्या अधिकारक्षेत्राबाहेरील काही महत्त्वाचे कायदे** : खालील कायदे पर्यावरणाशी संबंधित असले तरी ते थेट राष्ट्रीय हरित लवादाच्या अनुसूचीमध्ये समाविष्ट नाहीत:

भारतीय वन अधिनियम, १९२७

वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२, अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्क) अधिनियम, २००६. या कायद्यांशी संबंधित काही प्रश्न इतर न्यायालये किंवा सक्षम प्राधिकरणांकडे जातात.

**राष्ट्रीय हरित लवादाची प्रमुख कार्ये** :

राष्ट्रीय हरित लवाद ही भारतातील पर्यावरणीय न्यायासाठी स्थापन करण्यात आलेली विशेष न्यायिक संस्था आहे. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि पर्यावरणीय हानीग्रस्तांना न्याय मिळवून देणे ही तिची मूलभूत जबाबदारी आहे. राष्ट्रीय हरित लवादाची कार्ये केवळ वाद सोडविण्यापुरती मर्यादित नसून पर्यावरणीय प्रशासन अधिक उत्तरदायी आणि प्रभावी बनविण्यातही ती महत्त्वाची भूमिका बजावते.

**१. पर्यावरणीय वाद व तक्रारींचा निपटारा** : राष्ट्रीय हरित लवादाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे पर्यावरणाशी संबंधित विविध वाद व तक्रारींची सुनावणी करून न्याय देणे. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो : जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि ध्वनीप्रदूषण. औद्योगिक प्रकल्पांमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान. जंगलतोड व वनक्षेत्रांवरील अतिक्रमण. नदी, तलाव आणि जलाशयांचे प्रदूषण. घनकचरा व जैववैद्यकीय कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन. अवैध खाणकाम व वाळू उपसा. पर्यावरणीय मंजुरी संबंधी वाद. राष्ट्रीय हरित लवाद नागरिक, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासनाकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकांची सुनावणी करते.

**२. पर्यावरणीय नुकसानभरपाई निश्चित करणे** : एखाद्या उद्योग, संस्था किंवा व्यक्तीमुळे पर्यावरणाची हानी झाली असल्यास राष्ट्रीय हरित लवाद त्या नुकसानाची आर्थिक भरपाई निश्चित करू शकते. उदाहरणार्थ : नदीत रासायनिक सांडपाणी सोडणे. जंगलाचा विनाश करणे. भूजल प्रदूषित करणे. हवेच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणे. अशा प्रकरणांमध्ये राष्ट्रीय हरित लवाद संबंधित पक्षाकडून नुकसानभरपाई वसूल करून पर्यावरण पुनर्स्थापनेसाठी निधी उपलब्ध करून देते.

**३. पर्यावरण पुनर्स्थापनेचे आदेश देणे** : केवळ दंड आकारणे हे राष्ट्रीय हरित लवादाचे अंतिम उद्दिष्ट नसते. पर्यावरण पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश देणे हे देखील त्याचे महत्त्वाचे कार्य आहे. उदाहरणार्थ : दूषित नदी स्वच्छ करणे. नष्ट झालेल्या जंगलात पुनर्वनीकरण करणे. बेकायदेशीर बांधकामे हटविणे. प्रदूषित जमिनीचे पुनर्वसन करणे. जैवविविधतेचे पुनर्संवर्धन करणे. यामुळे पर्यावरणीय हानीची भरपाई प्रत्यक्ष स्वरूपात केली जाते.

**४. पर्यावरणीय मंजुरींची तपासणी** : मोठे उद्योग, महामार्ग, विमानतळ, धरणे, खाण प्रकल्प, औद्योगिक वसाहती आणि इतर विकास प्रकल्पांना पर्यावरणीय मंजुरी आवश्यक असते.

**राष्ट्रीय हरित लवाद खालील बाबींची तपासणी करते :**

मंजुरी देताना नियमांचे पालन झाले का?, पर्यावरणीय परिणाम अहवाल योग्य पद्धतीने तयार करण्यात आला का?, स्थानिक नागरिकांचे म्हणणे ऐकले गेले का?, जैवविविधता आणि वनसंपदेवर होणाऱ्या परिणामांचा विचार झाला का?, नियमांचे उल्लंघन झाल्यास राष्ट्रीय हरित लवाद मंजुरी रद्द किंवा स्थगित करू शकते.

**५. प्रदूषण नियंत्रणासाठी आदेश देणे** : प्रदूषण रोखण्यासाठी राष्ट्रीय हरित लवाद विविध प्रकारचे आदेश देऊ शकते. जसे : उद्योग बंद करण्याचे आदेश. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याचे निर्देश. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे आदेश. घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे निर्देश. पर्यावरणीय मानके पाळण्याचे आदेश. या माध्यमातून प्रदूषण नियंत्रण मंडळे आणि प्रशासनावर देखील जबाबदारी निश्चित केली जाते.

६. नागरिकांच्या पर्यावरणीय अधिकारांचे संरक्षण : भारतीय

राज्यघटनेतील अनुच्छेद २१ अंतर्गत 'जीवनाचा अधिकार' हा स्वच्छ व निरोगी पर्यावरणाच्या अधिकाराशी संबंधित मानला जातो.

राष्ट्रीय हरित लवाद नागरिकांच्या पुढील अधिकारांचे संरक्षण करते : स्वच्छ हवा मिळण्याचा अधिकार. स्वच्छ पाणी मिळण्याचा अधिकार. प्रदूषणमुक्त परिसरात राहण्याचा अधिकार. आरोग्यदायी पर्यावरणाचा अधिकार. म्हणूनच राष्ट्रीय हरित लवाद पर्यावरणीय लोकशाही मजबूत करणारी संस्था मानली जाते.

**७. शाश्वत विकासाला प्रोत्साहन देणे** : राष्ट्रीय हरित लवाद विकासाला विरोध करत नाही परंतु विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न करते. यासाठी ती पुढील तत्त्वांचा वापर करते : (अ) शाश्वत विकासाचे तत्त्व. वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही याची काळजी घेणे. (आ) पूर्वसावधगिरीचे तत्त्व. पर्यावरणीय धोका निर्माण होण्याची शक्यता असेल तर आधीच प्रतिबंधात्मक उपाय करणे. (इ) प्रदूषणकर्ता भरपाई तत्त्व. ज्यामुळे प्रदूषण होते त्यानेच नुकसानभरपाई द्यावी.

**८. सरकारी यंत्रणांवर देखरेख ठेवणे** : अनेकदा पर्यावरणीय कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. अशा वेळी राष्ट्रीय हरित लवाद विविध सरकारी यंत्रणांना जबाबदार धरते. उदाहरणार्थ : केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसबी), राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळे, वन विभाग, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा प्रशासन. राष्ट्रीय हरित लवाद वेळोवेळी अहवाल मागवून अंमलबजावणीची समीक्षा करते.

**९. जैवविविधता आणि वनसंपदेचे संरक्षण** : राष्ट्रीय हरित लवाद वन्यजीव, जंगल, नैसर्गिक अधिवास आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. यामध्ये : संरक्षित वन क्षेत्रांचे संरक्षण, वन्यजीवांच्या अधिवासाचे रक्षण, अनधिकृत वृक्षतोड रोखणे, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे संवर्धन या बाबींवर विशेष लक्ष दिले जाते.

**१०. पर्यावरणीय जनहित याचिकांवर सुनावणी** : सामान्य नागरिक, सामाजिक संस्था आणि पर्यावरण कार्यकर्ते पर्यावरणाच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका दाखल करू शकतात. यामुळे : नागरिकांचा सहभाग वाढतो, पर्यावरणीय लोकशाही मजबूत होते, शासन आणि उद्योग अधिक उत्तरदायी बनतात.

**११. त्वरित आणि सुलभ पर्यावरणीय न्याय प्रदान करणे** : परंपरागत न्यायालयांच्या तुलनेत राष्ट्रीय हरित लवादामध्ये पर्यावरणीय विषयांचे विशेष ज्ञान असलेले न्यायिक व तज्ज्ञ सदस्य असतात. त्यामुळे : निर्णय अधिक वैज्ञानिक असतात. प्रकरणांचा निपटारा तुलनेने जलद होतो. पर्यावरणीय न्याय सुलभ होतो.

**राष्ट्रीय हरित लवादाची उल्लेखनीय कामगिरी :** महत्त्वपूर्ण प्रकरणे आणि त्यांचे परिणाम : राष्ट्रीय हरित लवादाने स्थापनेपासून पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात अनेक ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारे निर्णय दिले आहेत. या निर्णयांमुळे पर्यावरणीय न्यायशास्त्र (एनव्हारमेंटल ज्युरिसप्रुडन्स) अधिक समृद्ध झाले असून 'शाश्वत विकास', 'प्रदूषणकर्ता भरपाई तत्त्व' आणि 'पूर्वसावधगिरी तत्त्व' यांना अधिक बळकटी मिळाली आहे.

१. आर्ट ऑफ लिव्हिंग यमुना पूरक्षेत्र प्रकरण (२०१६)

राष्ट्रीय हरित लवादाच्या इतिहासातील हे एक अत्यंत चर्चित आणि महत्त्वपूर्ण प्रकरण मानले जाते. मार्च २०१६ मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशन या संस्थेतर्फे दिल्लीतील यमुना नदीच्या पुरक्षेत्र परिसरात 'वर्ल्ड कल्चर फेस्टिव्हल' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लाखो लोक सहभागी होणार असल्याने नदीच्या पूरक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर तात्पुरते बांधकाम, व्यासपीठे आणि इतर सुविधा उभारण्यात आल्या.

पर्यावरणप्रेमी आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी असा आरोप केला की, या कार्यक्रमामुळे यमुनेच्या नैसर्गिक पूरक्षेत्राचे नुकसान होईल, जैवविविधतेवर परिणाम होईल आणि नदीच्या परिसंस्थेला दीर्घकालीन हानी पोहोचू शकते. या विरोधात राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल करण्यात आली.

**राष्ट्रीय हरित लवाद समोरील मुख्य प्रश्न :** यमुना नदीच्या पूरक्षेत्रात इतक्या मोठ्या कार्यक्रमास परवानगी देता येईल का? कार्यक्रमामुळे पर्यावरणीय नुकसान होण्याची शक्यता आहे का? पर्यावरणीय नुकसान झाल्यास त्याची भरपाई कोण करणार?

**राष्ट्रीय हरित लवादाचा निर्णय** : राष्ट्रीय हरित लवादाने कार्यक्रमावर पूर्ण बंदी घालण्यास नकार दिला; मात्र पर्यावरणीय हानीची शक्यता लक्षात घेऊन आयोजक संस्थेला ५ कोटी रुपयांची पर्यावरणीय नुकसानभरपाई जमा करण्याचे निर्देश दिले. तसेच कार्यक्रमानंतर झालेल्या पर्यावरणीय नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्याचे आदेश दिले.

**तज्ज्ञ समितीचा अहवाल :** समितीने आपल्या अहवालात नमूद केले की पूरक्षेत्रातील वनस्पती आणि गवताळ भागांचे नुकसान झाले. नदीच्या नैसर्गिक भूभागात बदल झाला. परिसंस्थेच्या पुनर्स्थापनेसाठी मोठा खर्च अपेक्षित आहे. नुकसान भरून येण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात.

**या निर्णयाचे महत्त्व :** पूरक्षेत्रांचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित झाले. 'पोल्युटर पे प्रिंसिपल' (प्रदूषणकर्ता भरपाई तत्त्व) प्रत्यक्षात लागू करण्यात आले. मोठे धार्मिक, सांस्कृतिक किंवा व्यावसायिक कार्यक्रमही पर्यावरणीय कायद्यांपेक्षा वरचे

नाहीत, हे स्पष्ट झाले. नदी, तलाव आणि जलाशयांच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय हरित लवादाची कठोर भूमिका अधोरेखित झाली. विकास, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून आला.

**कायदेशीर महत्त्व :** हे प्रकरण भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्रामध्ये एक महत्त्वाचा संदर्भ मानले जाते. पर्यावरणीय नुकसान होण्याची शक्यता असतानाच हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचे पूर्वसावधगिरी तत्त्व या प्रकरणातून अधोरेखित झाले.

**२. स्टरलाइट कॉपर प्लांट प्रकरण, २०१८ (तामिळनाडू)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :** तामिळनाडू राज्यातील स्टारलाइन कॉपर हा तांबे उत्पादन करणारा प्रकल्प तुथुकोडी (पूर्वीचे तूतिकोरिन) येथे कार्यरत होता. हा प्रकल्प भारतातील सर्वात मोठ्या तांबे वितळणी प्रकल्पांपैकी एक होता. स्थानिक नागरिक, पर्यावरणवादी आणि सामाजिक संघटनांनी अनेक वर्षे या प्रकल्पामुळे हवा, पाणी आणि मातीचे प्रदूषण होत असल्याची तक्रार केली होती. स्थानिक रहिवाशांचा आरोप होता की प्रकल्पातून उत्सर्जित होणाऱ्या सल्फर डायऑक्साइड आणि इतर रासायनिक घटकांमुळे श्वसनविकार, भूजल प्रदूषण, शेतीचे नुकसान आणि सार्वजनिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत.

**वादाचा मुख्य मुद्दा :** पर्यावरणीय मंजुरी, प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. विविध तपासण्या आणि तक्रारींनंतर हे प्रकरण राष्ट्रीय हरित लवाद तसेच इतर न्यायिक मंचांपुढे गेले.

**राष्ट्रीय हरित लवादाची भूमिका :** राष्ट्रीय हरित लवादाने या प्रकरणात पर्यावरणीय नियमांचे पालन, प्रदूषण नियंत्रण यंत्रणांची कार्यक्षमता आणि स्थानिक पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा सखोल विचार केला. लवादाने पर्यावरणीय संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत उद्योगांना कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरणीय जबाबदारी, शाश्वत औद्योगिक विकास आणि 'प्रदूषणकर्ता भरपाई तत्त्व' (पोल्युटर पे प्रिंसिपल) यांचा पुनरुच्चार केला.

**प्रकरणाचे महत्त्व :** १. पर्यावरण विरुद्ध औद्योगिक विकास. या प्रकरणामुळे आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यातील समतोलाचा प्रश्न राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला. २. नागरिकांच्या पर्यावरणीय अधिकारांचे संरक्षण. स्वच्छ हवा आणि स्वच्छ पाणी हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे तत्त्व अधिक दृढ झाले. ३. उद्योगांची उत्तरदायित्व निश्चिती. औद्योगिक प्रकल्पांना केवळ नफा कमावणे नव्हे तर पर्यावरणीय नियमांचे पालन करणेही तितकेच आवश्यक असल्याचा संदेश मिळाला. ४. पर्यावरणीय न्यायशास्त्राला बळ. राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरणीय परिणामांचा विचार न करता उद्योगांना अमर्याद स्वातंत्र्य देता येणार नाही, हे स्पष्ट केले. ३. जी. श्रीनिवास वि.भारत संघ, २०२०(अवैध वाळू उत्खनन प्रकरण)

भारतातील नद्या, ओढे आणि जलस्रोतांमधून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अवैध व अनियंत्रित वाळू उत्खननामुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात येत असल्याची बाब राष्ट्रीय हरित लवादासमोर मांडण्यात आली. वाळू ही नदी परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक असून तिचे अतिरेकी उत्खनन झाल्यास नदीपात्राची रचना बदलते, भूजल पातळी खालावते, नदीकिनाऱ्यांची धूप वाढते आणि जैवविविधतेवर विपरीत परिणाम होतो.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, अनेक ठिकाणी पर्यावरणीय मंजुरी न घेता किंवा निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात वाळू उत्खनन केले जात आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ तसेच शाश्वत विकासाच्या तत्त्वांचे उल्लंघन होत आहे.

राष्ट्रीय हरित लवादाने या प्रकरणात महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदविताना स्पष्ट केले की, पर्यावरणीय मंजुरीशिवाय वाळू उत्खनन करणे बेकायदेशीर आहे. तसेच लघुखनिज (मायनर मिनरल्स) म्हणून वर्गीकृत असलेल्या वाळूच्या उत्खननालाही पर्यावरणीय नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे अधोरेखित केले. लवादाने राज्य सरकारे आणि संबंधित प्राधिकरणांना अवैध उत्खनन रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याचे निर्देश दिले.

निर्णयाचे महत्त्व : वाळू उत्खननासाठी पर्यावरणीय मंजुरी अनिवार्य असल्याचे तत्त्व अधिक दृढ झाले. नदी परिसंस्थेच्या संरक्षणाला कायदेशीर बळ मिळाले. अवैध खाणकामाविरुद्ध कठोर कारवाईसाठी प्रशासनाला मार्गदर्शन मिळाले. भूजल, नदीप्रवाह आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरला.

या प्रकरणानंतर देशातील विविध राज्यांनी वाळू उत्खननासाठी अधिक कठोर नियम लागू केले आणि पर्यावरणीय मंजुरीशिवाय उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हे प्रकरण भारतातील पर्यावरणीय न्यायशास्त्रात नदी आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांपैकी एक मानले जाते.

राष्ट्रीय हरित लवाद ही भारताच्या पर्यावरणीय न्यायव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावी संस्था आहे. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरणीय हानीग्रस्तांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने या संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे. स्थापनेपासून आजपर्यंत राष्ट्रीय हरित लवादाने दिलेले विविध पान ५० वर ▶▶



# वैचारिक ढोंगाचा शो थिएटर



दत्ता पवार

९२०९२३१३५६

**आजचा समाज कमालीचा अपडेटेड झाला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तंत्रज्ञानाच्या, प्रगतीच्या आणि आधुनिकतेच्या नवनवीन आवृत्त्या आपल्या हाताशी असतात. आपण सुशिक्षित झालो आहोत, जागतिक नागरिक झालो आहोत आणि मुख्य म्हणजे आपण प्रचंड संवेदनशील आणि विचारवंत झालो आहोत... असा एक गोड गैरसमज आपण सर्वांनी मिळून पाळला आहे पण या दिखावू झगमगाट असलेल्या आधुनिकतेचा आणि पुरोगामित्वाचा विळखा जसा जसा घट्ट होतोय, तसतशी आपल्यातील आंतरिक मानवी मूल्ये मात्र वेगाने ढासळत चालली आहेत.**

आजचा काळ हा वैचारिक क्रांतिचा नाही तर वैचारिक ढोंगाचा सुवर्णकाळ आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही कारण आज समाजात मूल्यांची जपणूक करण्यापेक्षा, 'मीच कसा श्रेष्ठ', 'माझ्याकडेच कशी उच्च मूल्ये आहेत' याचे प्रदर्शन मांडण्याची चढाओढ लागली आहे. आपण सारेच जण समाजाच्या या एका मोठ्या थिएटरमध्ये आपापले सोयीस्कर मुखवटे चढवून वावरत आहोत. स्टेजवर टाळ्या मिळवणारा विचार आणि प्रत्यक्ष जगण्यातला आचार या दोन्हीमध्ये जे अथांग अंतर निर्माण झाले आहे, त्यालाच आज आपण स्मार्ट संस्कृती म्हणू लागलो आहोत. दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ शोधताना स्वतःच्या डोळ्यातील मुसळ सोयीस्करपणे लपवण्याची ही कला म्हणजेच आजचे वैचारिक ढोंग आहे.

आजच्या वैचारिक ढोंगाचे सर्वात मोठे आणि हक्काचे व्यासपीठ कोणते असेल तर ते म्हणजे सोशल मीडिया. फेसबुक, इंस्टाग्राम आणि एक्स (ट्विटर) वर नजर टाकली तर समाज इतका सुधारलाय आणि संवेदनशील झालाय की जणू काही रामराज्य अवतरायला काही तासांचाच अवधी उरला आहे, असा भास

होतो. स्त्री स्वातंत्र्य, पर्यावरण रक्षण, जातीअंताच्या गप्पा आणि गरिबांविषयीची कणव या विषयांवर इथे रोज वैचारिक उकळ्या फुटत असतात पण दुर्दैव असे की, ही तथाकथित क्रांती केवळ स्मार्टफोनच्या स्क्रीनपुरती आणि हॅशटॅगपुरतीच मर्यादित आहे.

सोशल मीडियावरील या संवेदनशीलतेच्या मागे लाईक्स आणि शेअर्सची एक क्रूर भूक दडलेली असते. रस्त्यावर अपघात होऊन एखादा माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असतो तेव्हा त्याला उचलून हॉस्पिटलमध्ये नेण्यापेक्षा, त्याचा व्हिडिओ काढून 'बदलते जग आणि हरवलेली माणुसकी' या कॅप्शनसह रील बनवून सोशल मीडियावर टाकण्यात आजच्या पिढीला जास्त धन्यता वाटते. म्हणजेच, ज्या माणुसकीच्या नावाने आपण गळे काढतो, त्याच माणुसकीचा मरणपंथाला लागलेला खेळ आपल्यासाठी केवळ कॉन्टेंट ठरतो, यापेक्षा मोठे वैचारिक ढोंग ते कोणते?

दुसऱ्या बाजूला, स्त्री मुक्तीवर आणि समानतेवर फेसबुकवर पानापानांचे लेख लिहिणारे अनेक सुशिक्षित महाभाग, प्रत्यक्ष वैयक्तिक आयुष्यात किंवा स्वतःच्या घरात मात्र स्त्रीला दुय्यम स्थानच देत असतात. विचार मंचावर पुरोगामित्वाचा आव आणायचा आणि घरात मात्र जुनाट प्रतिगामी मानसिकतेचे चोचले पुरवायचे, हा दुटप्पीपणा आता आपल्या अंगवळणी पडला आहे. आपली सामाजिक मूल्ये आता विचारातून नाही तर व्हॉट्सअॅपच्या स्टेटसवरून ठरत आहेत. दिवसातून दहा वेळा स्टेटस बदलणारा माणूस स्वतःचे विचार बदलायला मात्र तयार नाही, हेच आजच्या काळाचे सर्वात विदारक सत्य आहे.

सामाजिक मूल्यांचा ढासळलेला बुरुज केवळ सार्वजनिक जीवनातच दिसतो असे नाही तर तो आपल्या उंबरठ्याच्या आत, म्हणजेच आपल्या कौटुंबिक आणि वैयक्तिक नात्यांमध्येही स्पष्ट जाणवू लागला आहे. एकेकाळी नातेसंबंधांचा पाया हा त्याग, विश्वास आणि निखळ जिव्हाळा हा असायचा. आज मात्र नात्यांची जागा व्यावसायिक गणितांनी घेतली आहे. 'या माणसाचा मला काही उपयोग वा फायदा आहे का?' या एकाच प्रश्नाभोवती आजची बहुतांश नाती गुंफली जात आहेत. उपयोग संपला की नात्यांचा डोलारा पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोसळतो.

या सगळ्यामध्ये सर्वात मोठे ढोंग उघडे पडते ते आपल्या सोयीच्या नैतिकतेमुळे. आज आपण नैतिकतेचे आणि मूल्यांचे नियम स्वतःसाठी वेगळे आणि जगासाठी वेगळे लावले आहेत. शेजाऱ्याच्या मुलाने प्रेमविवाह केला किंवा स्वतःच्या आवडीचे करिअर निवडले, की आपण समाज म्हणून त्यावर चर्वण करायला मोकळे होतो; पण तोच निर्णय जेव्हा आपल्या घरात घेतला जातो तेव्हा आपली पुरोगामित्वाची व्याख्या सोयीस्करपणे बदलते. भ्रष्टाचार वाईट आहे, असे आपण तावातावाने सांगतो; पण आपले एखादे सरकारी काम अडकले की, ते करून घेण्यासाठी लाच देणे आपल्याला गैर वाटत नाही. नात्यांमधील हा दुटप्पीपणा आता वृद्धाश्रमांच्या वाढत्या संख्येतून आणि तुटत चाललेल्या संसारांमधून समोर येत आहे. आई-वडिलांच्या संस्कारांवर सोशल मीडियात भाऊक पोस्ट टाकून हजारो लाईक्स मिळवणारी बरीचशी बोटे, प्रत्यक्षात घरातल्या वृद्ध आई-वडिलांशी चार शब्द प्रेमाने बोलायला मात्र कचरतात. आपण मूल्यांचा संकोच इतका केला आहे की, आता कर्तव्य आणि प्रेम या गोष्टीही आपण फक्त दाखवण्यापुरत्याच शिल्लक ठेवल्या आहेत. नात्यांमधला हा कृत्रिम सुसंवाद म्हणजेच आजच्या बदलत्या सामाजिक मूल्यांचे सर्वात मोठे अपयश आहे.

समाजातील अशिक्षित किंवा सामान्य माणसाकडून मूल्यांच्या रक्षणाची अपेक्षा ठेवण्यापेक्षा, जो वर्ग स्वतःला सुशिक्षित, प्रगल्भ आणि विचारवंत मानतो, त्यांच्यातील ढोंगीपणा अधिक भयानक आहे. आज मोठ्या मोठ्या व्यासपीठांवरून, चर्चासत्रांमधून समता, बंधुभाव आणि जातीअंताच्या गप्पा मारणारा एक मोठा पांढरपेशी वर्ग समाजात वावरत असतो. त्यांचे बोलणे इतके प्रभावी असते की, ऐकणारा माणूस भारावून जातो परंतु याच आधुनिक विचारवंतांच्या घरात डोकावून पाहिले तर तिथे आजही लग्नाचा बायोडाटा बनवताना जातीचे रकाने आवर्जून तपासले जातात. घरकामवाल्या मावशींना चहा देण्यासाठी आजही वेगळा कप वापरला जातो.

हा वैचारिक दुटप्पीपणा केवळ जातीपुरता मर्यादित नाही तर तो आपल्या एकूणच भूमिकेमध्ये ठासून भरला आहे. आजचा सुशिक्षित माणूस स्वतःच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अत्यंत सोयीस्करपणे मौन बाळगणे पसंत करतो. समाजात जेव्हा एखादी अन्यायकारक घटना घडते तेव्हा आपल्याला काय त्याचे? किंवा आपली नोकरी-व्यवसाय सांभाळा अशी सुरक्षित भूमिका घेतली जाते. अन्याय करणाऱ्यापेक्षा, अन्याय उघड्या डोळ्यांनी पाहूनही आपल्या पांढरपेशी सुखात मशगूल राहणारा हा वर्ग समाजाचा जास्त घात करत आहे.

व्यासपीठावर क्रांतिकारक विचार मांडायचे आणि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र प्रस्थापित अनिष्ट रूढींचे चोचले पुरवायचे, हा एक प्रकारचा वैचारिक व्यभिचारच आहे. आपण सुशिक्षित झालो म्हणजे नक्की काय झालो? केवळ पदव्या मिळवल्या आणि आर्थिक स्थैर्य मिळवले म्हणजे मूल्ये आली का? जर आपले शिक्षण आपल्याला माणसाला माणूस म्हणून पाहायला शिकवत नसेल तर त्या कागदी पदव्यांचा आणि वरवरच्या सुसंस्कृतपणाचा मुखवटा आता ओरबाडून काढण्याची वेळ आली आहे.

पण विचार करण्यासारखी गोष्ट अशी की, समाज अचानक इतका ढोंगी आणि दुटप्पी का झाला? मानवी मूल्यांची ही घसरण

केवळ काळाचा महिमा म्हणून सोडून देता येईल का? तर याचे उत्तर नाही असे आहे. याचे मूळ कारण माणसाच्या बदललेल्या मानसिकतेत आणि अति-आधुनिक होण्याच्या आंधळ्या शर्यतीत दडलेले आहे.

आज आपण अशा एका युगात जगत आहोत जिथे माणूस असण्यापेक्षा तो कसा दिसतोय याला जास्त महत्त्व आले आहे. इंग्रजीत ज्याला आपण  म्हणतो, म्हणजे इतरांकडून मिळणारी मान्यता किंवा कौतुक; त्या एका गोष्टीसाठी आजचा माणूस हपापला आहे. 'मी आतून कसाही असलो तरी चालेल पण जगाच्या नजरेत मी कसा ग्रेट, संवेदनशील आणि प्रगतशील आहे' हे दाखवण्याच्या नादात आजचा माणूस स्वतःचा खरा चेहरा विसरून गेला आहे. आपण स्वतःसाठी जगणे कधीच सोडले आहे, आपण जगतोय ते फक्त शेजाऱ्याला, नातलगांना किंवा सोशल मीडियावरील अनोळखी फॉलोअर्सना दाखवण्यासाठी!

जेव्हा समाज सत्यापेक्षा दिखाव्याला जास्त किंमत देऊ लागतो तेव्हा मूल्ये आपोआपच अडगळीत पडतात आणि ढोंगीपणाचे पीक जोमात येते. आज आपल्याला प्रामाणिक माणसापेक्षा, प्रामाणिकपणाचा अभिनय करणारा माणूस जास्त जवळचा वाटतो. हीच मानसिक गुलामी आणि सोयीची नैतिकता समाजव्यवस्थेला घातक ठरत आहे. जोपर्यंत आपण स्वतःशी प्रामाणिक होत नाही, जोपर्यंत आपण जग काय म्हणेल? या चौकटीतून बाहेर पडून स्वतःच्या विवेकबुद्धिला प्रश्न विचारत नाही, तोपर्यंत मूल्यांचे हे प्रदर्शन असेच सुरू राहील. आपण केवळ मुखवट्यांची एक मोठी फॅक्टरी बनत चाललो आहोत, जिथे माणसाची किंमत त्याच्या विचारांवर नाही तर त्याने चढवलेल्या मुखवट्यावर ठरत आहे. शेवटी प्रश्न असा उरतो की या वैचारिक ढोंगाच्या दलदलीतून बाहेर पडण्याचा काही मार्ग आहे का? की आपण केवळ प्रेक्षक बनून हा थिएटर शो पाहत राहायचा? यावर उपाय कोणताही कायदा, सरकार किंवा शिक्षण व्यवस्था करू शकत नाही. याचे उत्तर प्रत्येकाला आपापल्या पातळीवर शोधावे लागेल. जोपर्यंत आपण दुसऱ्याच्या चेहऱ्यावरचा मुखवटा ओढून काढण्यापूर्वी, स्वतःचा मुखवटा उतरवून आरशासमोर उभे राहण्याचे धाडस दाखवत नाही, तोपर्यंत समाजात कोणतीही खरी क्रांती घडू शकत नाही. वैचारिक प्रामाणिकपणा हा भाषणात किंवा स्टेटसमध्ये दाखवण्याचा विषय नसून, तो आपल्या दैनंदिन आचरणात उतरवण्याचा विषय आहे. व्यासपीठावरून बदल घडवण्याच्या मोठ्या गप्पा मारण्यापेक्षा, स्वतःच्या घरात आणि व्यक्तिगत आयुष्यात मूल्यांची छोटीशी का होईना प्रामाणिक जपणूक करणे, हे आजच्या काळातील सर्वात मोठे क्रांतिकारी पाऊल ठरेल. केवळ पोकळ शब्दांचा आव आणून समाज बदलत नसतो तर तो कृतितून बदलतो. चपराक फक्त दुसऱ्याच्या ढोंगावर ओढायची नसते तर ती कधीकधी स्वतःच्याच आत लपलेल्या दुटप्पीपणालाही लगावायची असते. चला, या बदलत्या जगात जगाला दाखवण्यासाठी जगणे थांबवूया आणि स्वतःच्या समाधानासाठी, स्वतःच्या मूल्यांशी प्रामाणिक राहून जगण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करूया. कारण शेवटी, मुखवटे कितीही आकर्षक आणि महागडे असले तरी माणसाची खरी ओळख त्याच्या खऱ्या आणि प्रामाणिक चेहऱ्यानेच होते.

# वैचारिक ढोंगांचा थिएटर शो

◀◀ पान ४७ वरून

निर्णय केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरले नाहीत तर त्यांनी पर्यावरणीय न्यायशास्त्राला नवी दिशा दिली आहे.

यमुना आणि गंगा नदी प्रदूषण, अवैध वाळू उत्खनन, औद्योगिक प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, खाणकाम आणि पर्यावरणीय मंजुरी यांसारख्या विविध विषयांवरील निर्णयांद्वारे राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. 'प्रदूषणकर्ता भरपाई तत्त्व', 'पूर्वसावधगिरी तत्त्व' आणि 'शाश्वत विकास' यांसारख्या तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी करून पर्यावरण आणि विकास यांच्यातील आवश्यक समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे.

आज हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट आणि वाढते प्रदूषण यांसारखी गंभीर आव्हाने मानवजातीसमोर उभी आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय हरित लवादाची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण ठरते. मात्र पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी केवळ न्यायालये, शासन किंवा प्रशासकीय यंत्रणांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार, नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर आणि पर्यावरणीय कायद्यांविषयी जागरूकता या माध्यमातूनच पर्यावरण संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करून भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्यासाठी योगदान देणे हीच काळाची गरज आहे कारण पर्यावरणाचे रक्षण म्हणजे केवळ निसर्गाचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या भविष्याचे रक्षण होय. निसर्गाचे जतन हीच भावी पिढ्यांसाठीची सर्वोत्तम गुंतवणूक आहे.